
# श्री. गुरुदेव रानडे -
# एक जीवनझलक




भावानुवादक

**श्री. प्र. श्री. आनिखिंडी**



आनंदाचे डोही, आनंद तरंग ।
आनंदचि अंग, आनंदाचे ।।

# श्री गुरुदेव रानडे - एक जीवनझलक

The Glimpses of
Shri Gurudev Ranade
Editor : Prof. B. R. Kulkarni
या पुस्तकाचा मराठी भावानुवाद

भावानुवादक : प्र. श्री. आनिखिंडी
२००४

**प्रकाशक -**
ॲकॅडमी ऑफ कंपॅरॅटीव्ह फिलॉसॉफी ॲंड रिलीजन (एसीपीआर)
गुरुदेव मंदिर, हिंदवाडी, बेळगाव - ५९० ०११
कर्नाटक, भारत

© सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

**प्रथम आवृत्ती - श्रावण २००४**

**अक्षरजुळणी -**
अशोक रवडे
४५, माधवबाग सोसायटी, शिवतीर्थनगर,
पौड रस्ता, पुणे - ४११ ०३८
दूरध्वनी - ५६२०१०७०

**मुद्रक -**
श्री. म. गो. नाईक,
सुहास मुद्रणालय,
२२, बुधवार पेठ, पुणे - ४११ ००२
दूरध्वनी - २४४५५०९६

**मूल्य - रु.७५**

# आशीर्वाद

श्री गुरुदेव रा. द. रानडे - माझे पिताश्री - यांच्या अनेक साधकांनी लिहिलेल्या इंग्रजीतील आठवणींचा श्री. प्र. श्री. आनिखिंडी, पुणे यांनी मराठी भावानुवाद केला आहे. 'भावानुवाद' या शब्दावरूनच त्यांच्या हृदयात श्री गुरुदेवांबद्दल असलेला 'भक्तिभावाचा कळवळा' दिसून येतो. श्री गुरुदेवांचे अनेक भक्त ज्ञानी आहेत, भावस्पर्शी आहेत, तर काही संशोधकही आहेत. सूर्याच्या सहस्त्र किरणांचे सहस्त्र लोकांनी वर्णन केले तरी ते अपुरेच पडणार ! जगन्मान्य अशा या श्री गुरुदेवांच्या, त्यांच्या सिटींग्ज मधल्या इंग्रजीतील आठवणी प्रा. बी. आर. कुलकर्णी यांनी संपादित करून जगावर फार मोठे उपकार केले आहेत.

या इंग्रजीतील साहित्याचा भावानुवाद करण्याची परवानगी, प्रा. बी. आर. कुलकर्णी यांनी सुरुवातीसच दिली आहे. प्रा. बी. आर. कुलकर्णी हे स्वतः प्रथम श्री गुरुदेवांचे विद्यार्थी, मग शिष्य व साधक आणि विद्वान आहेत. श्री गुरुदेवांच्या अनेकविध साधकांनी इंग्रजीतून जे विचारधन मांडले आहे, ते इंग्रजी न जाणणाऱ्या सर्व साधकांपर्यंत पोहोचावे या एकाच तळमळीने श्री. आनिखिंडी यांनी भावानुवादाचे काम हाती घेतले, ते स्तुत्यच आहे. यात त्यांचा भक्तिभाव बघून, श्री गुरुदेवांनी म्हटल्याप्रमाणे, 'परमार्थाला ज्ञानापेक्षा भक्तिभाव श्रेष्ठ आहे', याची जाणीव सतत होते. पुस्तकातील श्री गुरुदेवांचे विविध पैलू व 'सिटींग्ज' मधील आध्यात्मिक चर्चा, जास्तीत जास्त मराठी साधकांपर्यंत पोहोचावी ही श्री. आनिखिंडींची हार्दिक तळमळ पाहून मन भरून येते. या प्रामाणिक तळमळीपोटी मूळ पुस्तकातील रचनांमध्ये (content) काही फेरफार अनवधानाने झाले असले तरी हे कार्य स्तुत्यच आहे.

आगामी दोन-तीन वर्षात श्री गुरुदेवांची पन्नासावी पुण्यतिथी येत असल्याने, या मराठीतील साहित्य-पुष्पाचे आगमन सर्व साधकांना आध्यात्मिक आनंद देणारे होवो. श्री गुरुदेव समर्थ आहेत, त्यांचे शुभाशिर्वाद त्यांच्या साधकांना आहेतच ! मी श्री गुरुदेवांची कन्या म्हणून हार्दिक 'शुभेच्छा' इच्छिते. अशाच तऱ्हेचे बहुमोल लेखनकार्य श्री. आनिखिंडी यांचे हातून घडत राहो, ही देवाजवळ प्रार्थना !

श्रीमती विजया आपटे
(शकुताई रानडे)

# मनोगत

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्म परमोभव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धीमवाप्स्यसि ।।

भगवद्गीता अ.१२, श्लोक १०

'जर साधकाला अभ्यास (नेम) सतत करणे शक्य होत नसेल तर त्याने (मत्कर्म) माझ्याकरिता, म्हणजेच, 'देवकर्म' करीत राहिल्याने हळुहळू त्याची चित्तशुद्धी होऊन ज्ञानप्राप्तीस तो योग्य होईल' असे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीतेत उपदेशिले आहे.

श्री गुरुदेवांनीही स्पष्टपणे सांगितले आहे - 'चोवीस तास नेम करणे कोणालाही शक्य नाही; त्यामुळे नेमाव्यतिरिक्तच्या काळात देवाजवळ राहण्यासाठी ईश्वरकर्मे करीत राहणे आवश्यक आहे.'

१९९० मध्ये 'The Glimpses of Shri Gurudeo Ranade - Editor Shri B. R. Kulkarni, हे पुस्तक प्रकाशित झाले. त्या पुस्तकाची निर्मिती हा श्रीमती शकूताई (गुरुदेव कन्या) यांनी 'आशीर्वादा'त म्हटल्याप्रमाणे, श्री. बी. आर. कुलकर्णींनी जगावर केलेला मोठाच उपकार होय ! तसेच त्या पुस्तकाचे प्रकाशन एसीपीआर ट्रस्ट, वेळगाव यांनी करून या वहुमोल उपकारात सिंहाचा वाटा उचलला. त्यामुळे सदर ट्रस्टही निःसंशय कौतुकास पात्र आहे; कारण या पुस्तकाद्वारे प्रथमच, 'श्री गुरुदेवांची जीवन-झलक', त्यांच्या सान्निध्यात आलेल्या अनेक साधकांनी, विद्यार्थ्यांनी, विद्वानांनी एवढेच नव्हे तर त्यांच्या कन्येने अनुभव कक्षेत आणून दिली. अर्थात, श्री गुरुदेवांचे जीवनचरित्र - हिमनगाप्रमाणे जे दिसते - ते केवळ अल्पांशाने दृष्टीस पडणारे अगदी एक दशांश हिस्साही नव्हे ! पण तरी, जवळ जवळ पन्नास साधकांच्या दृष्टिकोनातून, 'दिसलेले गुरुदेव' दृग्गोचर करण्याचे श्रेय मूळ Glimpses चे संकलनकार श्री. बी. आर. कुलकर्णी यांना देणे सार्थ ठरेल. शिवाय Glimpsesच्या उर्वरित अर्ध्या विभागात श्री गुरुदेवांनी आपल्या जीवनकाळात निंबाळाश्रमात घेतलेल्या सिटिंग्जमधील मौलिक विचारधन संकलित झालेले आहे. म्हणजे, श्री. बी. आर. काकांच्या मूळ Glimpses मध्ये, 'श्री गुरुदेवांची जीवनझलक' ही त्या सुवर्ण नाण्याची एक बाजू, तर त्यांच्या सिटिंग्जमधील, 'आप पिए मोहिं प्यावे' असे अमृत विचार ही त्या सुवर्ण नाण्याची दुसरी वाजू - अशा एकाच नाण्याच्या दोन बाजू प्रथमच जगापुढे आणण्याचे महत्कार्य श्री. बी. आर. काकांनी करून आपणा सर्व साधकांना उपकृत करून ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांना सहस्त्रशः प्रणाम ! असे हे अप्रतिम पुस्तक लवकरच ते माझ्या वाचनात आले. श्री समर्थानी दासबोधात म्हटल्याप्रमाणे - 'काही गलबला काही निवळ । ऐसा कंटीत जावा काळ ।।' - असा माझा नेमाव्यतिरिक्तचा काळ 'Glimpses' च्या वाचनात

जात होता. त्यातील श्री गुरुदेवांवरील लेखांनी व 'सिटींग्ज' मधील विचारांनी मी प्रभावित झालो. ते पुस्तक माझ्या परमार्थमार्गावरील प्रारंभीच्या काळात पथदर्शक तर ठरलेच, शिवाय आयुष्यभर जतन करून ठेवावेत असे गुरुदेवांचे विचारधन त्यात होते. हृदयाच्या गाभाऱ्यात खोल खोल ठसणारे ते आत्मदर्शी विचार मायबोलीत - मराठीत - असावेत; त्यामुळे असंख्य मराठी साधक बंधू-भगिनींना नेमात भाव जागृती व शंका-निवारण होण्यास मदत होईल, असे विचार मनात चमकून गेले: विचारांनी मनाची पकड घेतली अन् लेखणीने हाताची ! बघता बघता संपूर्ण इंग्रजी पुस्तकाचा मराठी भावानुवाद गुरुदेवांनी करवून घेतला. अशा रीतीने, 'स्वान्तसुखाय' एक निर्मिती झाली आणि 'परहिताय' होण्याचे स्वप्न मी पाहात राहिलो.

वरील भावानुवादीत हस्तलिखित सहजच माझे साधक बंधू श्री. अशोक रवडे यांच्या वाचनात आले. त्यांना ते इतके भावले की, त्यांनी मला प्रोत्साहन देऊन हस्तलिखिताचे पुस्तकात रुपांतर करण्यास सुचविले - म्हणजे सर्व तांत्रिक बाबी आल्याच. म्हणून प्रथम इंग्रजी पुस्तकाचे संपादक श्री. बी. आर. कुलकर्णी यांना अनुमतीसाठी विचारणा केली, तेव्हा बी. आर. काकांनी Glimpses चे सर्व हक्क एसीपीआर ट्रस्ट, बेळगाव यांच्याकडे असल्याने, मराठी अनुवादित पुस्तक छापण्यास परवानगी साठी एसीपीआर ट्रस्टकडे अनुमतीसाठी पत्रव्यवहार करण्यास सुचविले.

एकदा श्री गुरुदेवांनी प्रेरणा दिल्यावर कार्य सिद्धीस नेण्यास तेच समर्थ आहेत, हे मी मनोमन ओळखून होते आणि तसेच झाले. बेळगावच्या एसीपीआरच्या ट्रस्टीज्‌बरोबर सविस्तर चर्चा होऊन ट्रस्टींनी मला सदर पुस्तक छापण्यास अनुमती दिली. त्यांच्या या अनुमतीमुळेच श्री गुरुदेवांचे हे विचारधन साधकांसमोर मराठीत पुस्तकरूपाने येऊ शकत आहे. त्यामुळे एसीपीआरच्या ट्रस्टीज्‌नी मला जो पाठिंबा दिला त्याबद्दल मी त्यांचा मनापासून अत्यंत ऋणी आहे.

कोणतेही मोठे कार्य भक्कम पाठिंब्यावाचून सिद्धीस जाऊच शकत नाही. 'श्री सद्‌गुरूसारिखा असता पाठीराखा' सगुण स्वरूपात कोणाला तरी निमित्त करून कार्य करवून घेतो. माझ्या पुस्तकाच्या बाबतीत श्री. नरेन्द्र देऊळकर, विश्वस्त श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ, यांनी अथपासून इतिपर्यंत 'आपले पुस्तक' या जिव्हाळ्याने सर्वतोपरी सहकार्य केल्यानेच माझे स्वप्न सत्यात उतरू शकले. त्यामुळे श्री. नरेन्द्र देऊळकर यांचा मी आजन्म ऋणी राहीन.

श्री. अशोक व सौ. मनीषा रवडे यांनी अत्यंत सुबकरितीने व वेळेत पुस्तकाचे डीटीपी करून दिले, एवढेच नव्हे तर वेळोवेळी प्रोत्साहित केले, त्यामुळे या साधक पती-पत्नींचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची कल्पना मा. डॉ. हरिभाऊ पाटणकर यांच्या एका प्रवचनातून मला मिळाली. त्यात त्यांनी म्हटल्याप्रमाणे, "लाल, पांढरे, काळे व निळे अशी एकाच्या आत एक वर्तुळे साधकाला ध्यानात दिसणे, हे 'पूर्ण ब्रह्माचे' दर्शन होय." ही

कल्पना त्यांच्याकडून मिळाल्याने मी मा. डॉ. हरिभाऊ पाटणकरांचा ऋणी आहे.

वरील 'पूर्ण ब्रह्म'च्या आध्यात्मिक अनुभवाची कल्पना मी श्री. जी. के. देशपांडे,मालाड, यांना सांगून, तसे मुखपृष्ठ करण्यास सुचविले. त्यांनी ते अत्यंत कमी वेळेत व अगदी कल्पनेबरहुकूम करून सद्‌गुरूसेवा म्हणून मला दिले. त्याबद्दल त्यांचेही किती व कसे आभार मानावेत हे मला कळत नाही.

पुस्तकाची उत्कृष्ट छपाई व बांधणीचे कार्य अत्यंत तत्परतेने करून दिल्याने वेळेवर पुस्तक प्रकाशन होऊ शकले. त्याबद्दल श्री. म. गो. नाईक यांचा मी हार्दिक आभारी आहे.

श्री गुरुदेव कन्या श्रीमती शकूताई यांनी आशीर्वादपर पुरस्कार देऊन माझ्या सद्‌गुरूंच्या वतीने मला उपकृत करून ठेवलेले आहे. त्यांचे ऋण शिरी वागविण्यात मी धन्यता मानतो.

श्री समर्थ निंबरगी महाराजांचे पणतू, "धन्य हा सद्‌गुरू महिमा हो" हे पद भरदार आवाजात म्हणत. (या नावाचे श्रीमती शकूताईंचे पुस्तकही आहे). अशा धन्य धन्य सद्‌गुरूंनी मजकडून ही भाव-सेवा स्वचरणी रुजू करून घेतली. पुस्तकातील गुरुदेवांचे विचार-किरण दीपस्तंभाप्रमाणे साधकांना दिशादर्शक व्हावेत ही सद्‌गुरूचरणी विनम्र प्रार्थना !

**पुणे, श्रावण २००४**

**प्र. श्री. आनिखिंडी,**
२, गुंफा, आयाकर मार्ग,
एरंडवणे, पुणे - ४११ ००४
दूरध्वनी - २५४४ ५५२१

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय व लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| | **अ. आठवणींच्या प्रदेशात** | |
| १. | प्रशांत आणि सात्त्विक आनंदाचा झरा - डॉ. व्ही. एस. झा, जबलपूर | १ |
| २. | मी पाहिलेले माझे परमपूज्य पिताश्री - विजया आपटे, पुणे | २ |
| ३. | भूतकाळाच्या गाभाऱ्यात - पी. आर. खाडीलकर, सांगली | ६ |
| ४. | पुनरुज्जीवनाचा अग्रदूत - डॉ. व्ही. के. गोकाक, बंगलोर | ८ |
| ५. | गुरू ही प्रेमाची खाण - एम. ए. बोंगले, हुबळी | ८ |
| ६. | गुरुकृपा अडचणीच्यावेळी केलेली मदत म्हणून येते - डॉ. आर. व्ही. चिटणीस, सांगली | ९ |
| ७. | भक्ताची कामनापूर्ती - शंकरराव बापट, पुणे | १० |
| ८. | ते आले, त्यांनी पाहिले, त्यांनी शुभाशीष दिले - श्रीपाद जोशी, शेडबाळ | १२ |
| ९. | मला माझे सद्गुरू कसे दिसले - डॉ. एन. एस. खिश्चन, औरंगाबाद | १२ |
| १०. | एक श्रेष्ठ स्वर्गीय अनुभव - पद्मश्री काकासाहेब कारखानीस, विजापूर | १४ |
| ११. | गुरुदेव माझ्या जीवनात कसे आले - व्ही. जी. अपसंगी, जमखंडी | १५ |
| १२. | संतांच्या सान्निध्यात - डॉ. आय. पी. सिंग | १७ |
| १३. | दैवी आधार - डॉ. एन. एस. खिश्चन, औरंगावाद | २० |
| १४. | वेषावरून माणसाची पारख नेहमीच होत नाही - वि. स. पागे, मुंवई | २१ |
| १५. | हिऱ्याला स्वतःची किंमत सांगता येत नाही - वसुधा बी. मोडक, धारवाड | २२ |
| १६. | विद्यार्थ्यांची गुणवत्ता पारखून त्याला उत्कृष्ट करीअर मिळवून देणे - डॉ. पंढरीनाथ हरी प्रभू | २३ |
| १७. | आठवते, मला आठवते - के. पी. कुलकर्णी | २६ |
| १८. | बुद्धीमंतांना प्रोत्साहन - प्रा. ए. सी. बोस, धारवाड | २९ |
| १९. | नाम मिळणे काय एवढे सोपे आहे ? - व्ही. जी. जमखंडी, धारवाड | २९ |
| २०. | केवळ नामस्मरणानेच दिव्य आनंद प्राप्त होईल - बी. डी. गोडवोले, मुंवई | ३१ |
| २१. | गुरू कोणाला म्हणावे ? - एम. एल. वैकुंठे | ३२ |
| २२. | सद्गुरू ऐहिक आणि पारमार्थिक क्षेत्रात कल्याण करतात - डॉ. बी. आर. मोडक, धारवाड | ३४ |
| २३. | डॉ. राधाकृष्णन यांची गुरुदेवांना आदरांजली | ३५ |
| २४. | वेळगावला डॉ. राधाकृष्णन यांनी गुरुदेव मंदिराचे उद्घाटन केले, त्या प्रसंगीचा त्यांचा संदेश (८ डिसेंवर १९६५) | ३५ |

| अ.क्र | विषय व लेखक | पृष्ठ |
|---|---|---|


२५. भविष्यकाळात डोकावले तर..... - पद्मश्री काकासहेब कारखानीस, विजापूर ३६
२६. भूतकाळ आणि भविष्यकाळ, दोहोंचे ज्ञान
- पद्मश्री काकासहेब कारखानीस, विजापूर ३७
२७. दुसऱ्यांच्या मनात डोकावणे - डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ३८
२८. जगाचे भवितव्य तत्त्ववेत्त्यांच्या आधारानेच घडते
- डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ३७
२९. मेटा-कांट (कांटच्या पलीकडे) - डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ३९
३०. देवदूताचे व्यक्तीमत्व - डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ४०
३१. आत्यंतिक विनम्रता....पराकोटीची नम्रता - डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ४०
३२. चौरंगी व्यक्तीदर्शन - व्ही. जी. अपसंगी, जमखंडी ४१
३३. खऱ्या भारतीय तत्त्ववेत्त्याचे उदाहरण - डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ४१
३४. द्रौपदी घाटावर संध्याकाळचा नेम - डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव ४२
३५. मानवी स्वभावाचे अत्युत्कृष्ट दर्शन त्यांनी घडविले
- प्रो. जॉर्ज बी. बर्च, मेटफर्ड, मॅसॅच्युसेटस् ४३
३६. संत रानडे - एस. के. गुप्ता, बारीपाडा, ओरिसा ४७
३७. गुरुदेव - एक शिक्षक - एस. के. गुप्ता, बारीपाडा, ओरिसा ४८
३८. आत्मसाक्षात्कारी संताचे परमेश्वरावर विवेचन
- एस. के. गुप्ता, बारीपाडा, ओरिसा ४९
३९. त्यांच्या ध्यानाने व संदेशाने त्यांना अमर केले
- प्रो. संगमलाल पांडे, अलाहाबाद ४९
४०. अपराविद्या हे पराविद्येचे साधन आहे - डॉ. धीरेंद्र मोहन दत्त, शातिनिकेतन ५१
४१. गुरुदेव - एक उत्तुंग व्यक्तिमत्व - जी. व्ही. सराफ, बेळगाव ५२
४२. मला विरोधक नाहीत - एस. व्ही. दाभाडे, विजापूर ५३
४३. जठरात अमृत स्रवत असते, तेव्हा तहानभूक हरपते
- जे. व्ही. परुळेकर, बेळगाव ५४
४४. श्री गुरुदेवांचे आध्यात्मिक सामर्थ्य - जे. व्ही. परुळेकर, बेळगाव ५५
४५. श्री गुरुदेव - एक स्थितप्रज्ञ -पद्मश्री काकासाहेब कारखानीस, विजापूर ५६
४६. साधू दुसऱ्यासाठी जगतात - पद्मश्री काकासाहेब कारखानीस, विजापूर ५७
४७. वीरशैव साहित्यातील आध्यात्मिक आविष्कार ५७
४८. महान कार्यासाठी सांघिक शक्तीची गरज आहे ५८
४९. वोधसुधे ५८
५०. वियोगाचा क्षण आला - डॉ. पी. डी. खानोलकर, सोलापूर ६०

| अ.क्र | विषय | पृष्ठ |
|---|---|---|

## व (१). तत्त्वज्ञानविषयक चर्चा


| | | |
|---|---|---|
| ५१. | तत्त्वज्ञान आणि साक्षात्कारशास्त्र | ६२ |
| ५२. | केवळ बौद्धिक ज्ञानाची अपूर्णता | ६२ |
| ५३. | विवेक आणि प्रतिभा | ६३ |
| ५४. | ईश्वरी अंशाची खोली कोण जाणू शकेल ? | ६३ |
| ५५. | वासनारहीत चित्तात परमेश्वराचा वास | ६४ |
| ५६. | भावना आणि विवेक | ६५ |
| ५७. | नैतिकता आणि साक्षात्कार | ६५ |
| ५८. | ध्यानगीता | ६६ |
| ५९. | आध्यात्मिक जीवनातील प्रगती | ७० |
| ६०. | पारमार्थिक जीवनात प्रगती केव्हा शक्य आहे ? | ७१ |
| ६१. | चक्रे व कुंडलिनी | ७१ |
| ६२. | आत्म्याचे स्थान | ७१ |
| ६३. | आत्मसाक्षात्काराच्या मार्गाचा एक दृष्टीकोन | ७२ |
| ६४. | संमोहन आणि आत्मानुभव | ७२ |
| ६५. | चमत्काराचे स्वरूप | ७३ |
| ६६. | नेमाची गुणवत्ता | ७४ |
| ६७. | आत्मानुभवात क्रम नसतो | ७४ |
| ६८. | भक्ती उचंबळली पाहिजे | ७५ |
| ६९. | देवाचे राज्य (रामप्रेमपूर) आणि आध्यात्मिक लहरी | ७५ |
| ७०. | सगुण व निर्गुण यांचा समन्वय | ७६ |
| ७१. | वस्तू एकमेव असते | ७६ |
| ७२. | वस्तूमधील आकर्षणाची शक्ती | ७७ |
| ७३. | त्रिवेणी संगम | ७८ |
| ७४. | शून्य (निर्बयलु) चा अनुभव | ७८ |
| ७५. | आत्मसाक्षात्कारातील अत्युच्च आनंद | ७९ |
| ७६. | जिभेवरील अमृत | ८० |
| ७७. | माझे तत्त्वज्ञान | ८० |
| ७८. | एक विलक्षण दृश्य | ८१ |
| ७९. | आध्यात्मिक जीवन आणि शरणागती | ८२ |
| ८०. | श्री गुरुदेवांचा नाम देण्याचा अधिकार | ८२ |

| अ.क्र | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ८१. | गुरुदेवांचा नेम | ८३ |
| ८२. | शांती आणि आनंद | ८३ |
| ८३. | भविष्यदर्शन | ८४ |
| ८४. | आध्यात्मिक शक्तीचे स्वरूप | ८४ |
| ८५. | दुःखहारक स्पर्श | ८५ |
| ८६. | दैवीशक्तीमध्ये संतांचा सहभाग | ८६ |
| ८७. | गृहीतक म्हणून ठेवलेली श्रद्धाही पुरे आहे ! | ८६ |

✲✲✲✲✲✲✲

## व (२). व्यावहारिक सूचना


| | | |
|---|---|---|
| ८८. | देवाच्या कृपेने भारत वाचला | ८८ |
| ८९. | देहासाठी शेती, आत्म्यासाठी संस्कृती | ८९ |
| ९०. | तुम्ही देवाची आणि दानवाची एकदम सेवा करू शकत नाही | ८९ |
| ९१. | देवाच्या भक्तीसाठी सर्व शक्ती एकत्रित करा | ९० |
| ९२. | सद्‌गुणांवरील ध्यान | ९१ |
| ९३. | नामस्मरण, एकमेव मार्ग | ९१ |
| ९४. | नामाचे स्वरूप | ९२ |
| ९५. | आसनापेक्षा एकाग्रता अधिक महत्त्वाची | ९२ |
| ९६. | एकाग्रता कशी वाढवावी ? | ९३ |
| ९७. | आध्यात्मिक जीवनाविषयीचे प्रेम कसे वाढवावे ? | ९४ |
| ९८. | ध्यान (नेम) व शारीरिक वेदना | ९४ |
| ९९. | आध्यात्मिक जीवन म्हणजे सुखाची शय्या नव्हे | ९५ |
| १००. | मनःशांतीसाठी एका साधकाची प्रार्थना (दि. १८ डिसेंबर १९५१ रोजी सांगली येथे, श्री गंगाधरराव देशपांडे यांनी केलेले भाषण) | ९६ |
| १०१. | श्री गुरुदेवांचे आश्वासन | ९९ |

✲✲✲✲✲✲✲

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट - | दोन घटनांवरील टिपणे | १०१ |

## अ. आठवणींच्या प्रदेशात

# १. प्रशांत आणि सात्त्विक आनंदाचा झरा

**डॉ. व्ही. एस. झा**
**जबलपूर**

प्रा. आर. डी. रानडे यांच्याबरोवर माझी पहिली भेट योगायोगानेच झाली. तरीसुध्दा माझ्या आयुष्यातील ती एक अत्यंत आनंददायक आठवण आहे. मला वाटते १९२७ मध्ये एकदा, प्रा. रानडे जबलपूर स्टेशनवर नागपूरला जाणाऱ्या गाडीमध्ये प्रथम वर्गाच्या डब्यात चढले. त्या काळात अरुंद मीटर गेज गाडीने प्रवास करणे फारच त्रासाचे होते. कारण मीटर गेज लोहमार्गामुळे गाडीचे डबे असे धक्के देत असत की, बर्थवर झोपलेला माणूस खालीच आला पाहिजे. परंतु मला वाटते, प्रा. रानडे असे धक्के तत्त्वज्ञान्याच्या शांततेने पचवीत असावेत. शुभ्र धोतर नेसलेले व शर्ट घातलेले प्रा. रानडे आपला छोटा बिछाना खालच्या बर्थवर पसरून, स्थितप्रज्ञतेने बसले होते आणि त्यांचा लांब कोट व पगडी एका खुंटीला टांगलेली होती. त्यांच्या समोर पायातील पुणेरी जोडा त्यांनी काढून ठेवला होता.

मी जेव्हा गाडीत चढलो, तेव्हा गाडी सुटावयाच्या बेतातच होती. मला प्रा. रानडे अपरिचित होते. त्यांच्याबद्दल मी काही ऐकलेलेही नव्हते. तथापि, प्रा. रानडे यांची शांत सोज्वळ आणि प्रेमळ मूर्ती पाहून माझे हात आपोआपच जोडले गेले. मी त्यावेळी नुकताच लंडनमधून शिक्षण संपवून, नोकरीच्या शोधार्थ मायदेशी परतत होतो. त्या काळात मायदेशी नोकरी मिळणे सोपे नव्हते. मी त्या दिवशी भरपूर टेनिस खेळून आणि रात्रीचे भरपूर जेवून गाडीत बसलो होतो. त्यामुळे अर्थातच मला खूप झोप आली होती आणि त्यामुळे रात्रीच्या झोपेत कोणाचाही व्यत्यय न येण्याच्या दृष्टीने मला प्रा. रानडे यांच्या वरची बर्थच हवी होती. मला हवी ती बर्थ मिळाल्याने, मी अंथरुणावर पडताच मला गाढ झोप लागली.

त्या गाडीतील बर्थ इतके अरुंद होते की, कधी माझा हात तर कधी माझा पाय, बर्थ बाहेर लोंबकळत असे. एवढेच नव्हे तर कधी एखाद्या धक्क्याने माझा अखंड देहच खाली कोसळण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. माझी झोप इतकी गाढ होती की, मला या सर्व शक्याशक्यतेचे भान नव्हते. पण माझ्या खालच्या बर्थवरच बसलेले दयाळू प्रा. रानडे, जे गाडीतील मंद दिव्यांमुळे वाचू शकत नव्हते, आणि गाडीच्या धक्क्यांमुळे झोपूही शकत नव्हते, एक सारखे माझ्यावर लक्ष ठेवून होते. प्रत्येक जोरदार धक्क्याच्यावेळी ते माझा देह सावरीत आणि मला बर्थवर नीट राहू देत. त्यांनी ही कसरत संपूर्ण रात्र जागून केली. पण म्या पामराला गाढ निद्रेमध्ये काहीच कल्पना नव्हती की, देशातील एक महान

तत्त्ववेत्ता, रात्रभर जागून माझ्या गाढ निद्रेची चिंता वाहात आहे. मी पहाटे लवकरच उठून दाढी-अंघोळ आटोपून ताजातवाना झालो आणि प्रा. रानडे यांच्यासमोर येऊन बसलो. त्यांनी माझ्या गाढ निद्रेचे कौतुक करून, रात्रभर जो आटापिटा केला त्याचे वर्णन केले. ते ऐकताच मी अत्यंत ओशाळलो आणि त्यांच्या दयाळूपणाने भारावूनही गेलो.

आम्ही दोघांनी गोंदियाला गाडी बदलली. या खेपेस पूर्वी पेक्षा गाडी चांगली होती आणि गंमत म्हणजे याही वेळेस डब्यात आम्ही दोघेच होतो. आम्ही दोघे वाचनात रंगून गेलो. मी 'माईंड' (Mind) या तत्त्वज्ञानाच्या जर्नलचे वाचन सुरू केलेले पाहून, प्रा. रानडे यांचे लक्ष आपोआपच मजकडे खेचले गेले. त्यांनी अर्थातच माझी आस्थेवाईकपणे चौकशी केली - मी कोण? मला तत्त्वज्ञानात इतकी रुची कशी काय ? वगैरे वगैरे. त्या वेळच्या आमच्या संभाषणातून, एक प्रकारे त्यांनी माझी प्रकट मुलाखतच घेतली. त्यातून त्यांना मी, प्रो. जी. डॉवेज हीक्स (Prof. G. Dawes Hicks) - एक असामान्य तत्त्ववेत्ते - यांचा विद्यार्थी असल्याचे कळल्यावर तर फारच आनंद झाला. आमच्या वैचारिक देवाणघेवाणीतून त्यांना तर स्वतःला अपरिमित आनंद झाल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसतच होते; एवढेच नव्हे तर मला या विचार मंथनातून (तत्त्वज्ञान विषयक चर्चेतून) किती आनंद होत आहे, याचेही कौतुक त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होते. तो कौतुकपूर्ण चेहरा मला आजही आठवतो. पण आमचा तो अपूर्व, संवाद-परिप्लुप्त काळ नागपूरला गाडी थांबताच अचानक संपला. आत्ता कोठे मला प्रा. रानडे हे कसे उत्तुंग व्यक्तिमत्व आहे, हे कळले होते. मी त्यांची व्याख्याने नागपूरला ऐकली. ते नागपूरलाच एक दिवस माझ्याकडे राहिले आणि त्यांनी मला उपकृत केले. त्यांची साधी राहणी व उच्च विचारसरणी यामुळे त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकाला ते प्रसन्न करीत असत. त्यांना चहा फार आवडत असे; आणि दर अर्ध्या तासाला एकदा, असा दिवसभर त्यांचा चहा चालत असे. मी जेव्हा जेव्हा अलाहाबादला जात असे, तेव्हा तेव्हा हा चहाचा प्रसाद आणि माझी प्रकट मुलाखत, असे ठरलेलेच होते. ज्या भाग्यवंतांना हा लाभ मिळे, त्यापैकी मी एक होतो. ते आम्हाला सोडून गेल्याचे जेव्हा कळले, तेव्हा फार वाईट वाटले. अशा महान तत्त्ववेत्त्याची जगाला फार गरज आहे.

✲✲✲✲✲✲✲✲✲✲✲

## २. मी पाहिलेले माझे परमपूज्य पिताश्री

**विजया आपटे**
**पुणे**

गुरुदेवांचा जीवनविषयक दृष्टिकोन - अर्थातच, आत्मसाक्षात्कार हेच जीवनाचे ध्येय - हे त्यांच्या बालपणापासूनच निश्चित होते, हे सर्वांना ज्ञात आहेच. त्यांचे जीवन

चरित्र, मराठी, कन्नड, इंग्लिश इ. भाषातून प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती न करता, मी थोडक्यात, त्यांनी आपले जीवन - साधी राहणी, परंतु थोड्या चाकोरीबाह्य पद्धतीने - कसे व्यतीत केले, याचे कथन करणार आहे. जे गुरुदेवांच्या सान्निध्यात आले, त्यांना त्यांच्या अत्यंत प्रेमळ व गोड स्वभावाचा अनुभव घेता आलाच आहे. अगदी घरातल्या गरिबातल्या गरीब नोकरा-चाकरांनासुद्धा ! ते कधीकधी थोडे चिडत असत, पण तितक्याच लवकर शांतसुद्धा होत. त्यांनी त्यांच्याजवळ पोहोचलेल्या प्रत्येकाच्या छोट्याश्या यशाचेही वारेमाप कौतुक केले, तर मग त्यांच्या एकुलत्या एक कन्येचे करतील, यात नवल ते काय ? मी जेव्हा पहिली पदवी परीक्षा पास झाले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरून आनंद अगदी ओसंडून वाहात होता. खरंच ! केवढं कौतुक केलं त्यांनी माझं ! जरी ते नेहमी जगाच्या चाली-रीतीची फारशी फिकीर करीत नसत, तरी काही आवश्यक रिती-रिवाज त्यांनी सोडले नव्हते. एकदा मी. जेव्हा त्यांच्याकडे, ग्वाल्हेरमध्ये एका व्याख्यात्याची नोकरी पत्करावी की नाही, या बद्दल विचारले होते. तेव्हा त्यांनी मला माझ्या श्वशुरांची - सरदार एम. एस. आपटे यांची - प्रथम परवानगी घेण्यास सांगितले होते. जमखंडीत (गुरुदेवांच्या जन्मस्थानी) १९५६ मध्ये मी स्त्रियांच्या एका सभेमध्ये व्याख्यान दिले. श्रोतृवर्ग बराच जमलेला पाहून, ते गमतीने म्हणाले, "शके, (मला ते याच नावाने हाक मारत), अगं, माझ्या सभांपेक्षा तुझ्याच सभेला जास्त गर्दी खेचली जाते की काय ?"

माझ्या साडेतीन महिन्याच्या एकुलत्या एक भावाच्या मृत्यूने आम्हा सर्वांनाच प्रचंड धक्का बसला. माझी आई तर त्या वेळी फारच आजारी पडली. मी एकटीच होते. बाबा (गुरुदेव) एकदम आले आणि माझी पाठ थोपटत म्हणाले, "शके, देवाच्या योजना अनाकलनीय असतात. का रडतेस ? मी आहे नां ?" खरोखर बाबा म्हणजे धैर्याचा मूर्तिमंत डोंगरच होते. 'धीरोदात्त' हा शब्दही त्यांचे यथार्थ वर्णन करायला अपुरा पडेल. त्यांच्या चेहेऱ्यावर आत्मप्रभेचे तेज विलसत होते. हा प्रसंग मी आयुष्यात कधीच विसरणार नाही.

अभिज्ञान शाकुंतलात, शकुंतला सासरी जाते त्यावेळचे भावनोत्कट वर्णन मी बी.ए. ला संस्कृत शिकताना वाचले होते. मी जेव्हा लग्नानंतर सासरी निघाले, तेव्हा कण्वमुनींच्या शकुंतलेप्रत केलेल्या भाष्याचे स्मरण मला पुढील श्लोकातून झाले

यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संस्पृष्टमुत्कंठया ।
कण्ठस्तंभितबाष्पवृत्ति कलुषश्चिंतताजडं दर्शनम् ।।
वैक्लव्यं मम तावदीदृश्यमिदं स्नेहदारण्यौकसः ।
पीडियंते गृहीणः कथं नु तनया विश्लेष दुःखैर्नवैः ।।

(अंक ४, श्लोक ६)

कण्वमुनींना, मानलेल्या कन्येच्या सासरी जाण्याने झालेले दुःख, एवढे ते अरण्यवासी ऋषी असून, सहन करणे कठीण गेले, तर माझ्या बाबांचे काय सांगावे ?

**उच्च नैतिक मूल्ये -**

उच्च नैतिक मूल्ये जपण्याच्या आदर्शांवर गुरुदेवांचा किती कटाक्ष होता, हे गुरुदेवांच्या शिष्यांना चांगले माहीत आहे. नैतिकता हे पूर्ण जीवनाचे अविभाज्य अंग आहे- किंबहुना जीवनाच्या इमारतीचा नैतिकता हा पायाच आहे, असे त्यांचे स्पष्ट मत, नव्हे तो त्यांचा मूलभूत सिद्धान्त होता. त्यांना दिखाऊ, बेगडी जीवनाचा अत्यंत तिटकारा होता- त्यांचे जीवन म्हणजे साक्षात, मूर्तिमंत नम्रता होते. शिवाय, एकांत, सत्य, तप, अंतर्मुखता सहनशीलता, धैर्य आणि आदर्शांच्या दिशेने योग्य वाटचाल, ही तर त्यांच्या जीवनाची महत्त्वाची अंगे होती. त्यांचे स्वतःचे स्पष्ट मत होते की, जोपर्यंत वरील नैतिक गुणांची जोपासना केली जात नाही, तोपर्यंत आत्मसाक्षात्काराच्या मार्गावरील प्रवास अपूर्णच राहतो. (ते कधीच कोणालाही आपला जीवनविषयक दृष्टिकोन किंवा आपण कोण, हे सांगत नसत; तर इतर संतांच्या जीवनावरून ते अप्रत्यक्षरितीने सांगण्याची त्यांची पद्धत होती.) केवळ नैतिकतेची शिकवण ते कोणालाही देत नसत. पण त्यांच्या सिटींगजमधून जे विचार मंथन व्हावयाचे, त्यातून ते सहजगत्या त्यांच्या शिष्यांच्या व जमलेल्या श्रोतृवृंदाच्या मनावर ठसवत असत. अशा तऱ्हेने त्यांनी त्यांच्या शिष्यांना, मित्रांना जे नैतिकतेचे पाठ दिले, ते अर्थातच माझ्या जीवनावर कायमचा परिणाम करून गेले. त्यांचे स्वतःचे जीवन नैतिकतेच्या अत्युच्च शिखरावर होते आणि त्या उत्तुंग शिखरावर पोहोचणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती.

आपल्या सद्गुरूंकडून आपल्याला किती आत्मिक पाठबळ मिळाले आहे, हे गुरुदेवांच्या सर्व शिष्यांना अनुभवाने चांगलेच ज्ञात आहे. मग मी किंवा माझी आई, हे अशा पाठबळाचे विशेष अधिकारी होतो, हे सांगणे नलगे. अर्थात आम्हाला त्यांच्या आत्मज्ञानाबद्दलचे विश्लेषण, मग ते कितीही गुप्त असो, त्यांच्याकडून ऐकण्याचे भाग्य लाभले आणि त्यामुळे मार्गदर्शनही मिळाले. अशी चर्चासत्रे वरचेवर होत आणि बाबा कधी कधी अचानक मला आणि आईला, पूर्वी झालेल्या चर्चेबद्दल विचारीत, फक्त आमचे लक्ष किती असते हे तपासून बघण्यासाठी आणि आम्हाला योग्य मार्गावर, साक्षात्कार पथावर ठेवण्यासाठी. कधी कधी आम्हाला ते श्री भाऊसाहेब महाराजांच्या जीवनातील काही घटना सांगून किंवा कधी आत्मानुभव सांगून आमचे जीवन उजळून टाकत.

एकदा १९५६ मध्ये, जमखंडीला जाण्यापूर्वी, निंबाळला साधकांसह त्यांचे सिटींग चालू होते. मी तेथे होते आणि अचानक मला वाटले की, अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने, गुरुदेव निंबाळहून जमखंडीला जात आहेत तर निंबाळचे संरक्षण कोण करणार ? मनात

विचार येतो न येतो तोच त्यांच्या (गुरुदेवांच्या) चेहऱ्याभोवती मला एक अत्यंत तेजस्वी वलय दिसले आणि ते माझ्याकडे पाहून सात्विकपणे स्मित करीत होते. अशी त्यांनी माझी संकटातून किंवा काळजीतून अनेकवेळा मुक्तता केली आहे.

शेवटी मी गुरुदेवांचे, 'साक्षात्कारी संत' म्हणून जीवन विश्लेषण करू इच्छिते. त्यांनी असे म्हटले आहे की, 'Mysticism is a way of spiritual life, which binds all humanity together'. (PGKL. P1) मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, गुरुदेवांना जग थोर साक्षात्कारी संत म्हणून किंवा आत्मज्ञानी (God-realiser) म्हणून मानते. ते बौद्धिक काम करण्यात जेवढा वेळ व्यतीत करीत, तेवढा सोडला तर इतर सर्व वेळ नेमच करीत असत. जगरहाटीप्रमाणे इतर गोष्टी करण्यात ते मुळीच वेळ दवडीत नसत. ते इतके पूर्णतेला पोहोचले होते की, त्यांच्या निर्याणापूर्वी त्यांनी (आपल्या ग्रंथाच्या) संपूर्ण पानाचे पुनःकथन (सुधारित मसुदा - redrafting) केले.

म्हणूनच डॉ. राधाकृष्णन यांनी म्हटलेले बरोबरच आहे की, 'He not merely taught philosophy, but lived it.' त्यांचे पूर्ण जीवन तत्त्वज्ञानी संताचे होते आणि संपूर्ण जीवनभर त्यांनी आत्मसाक्षात्कारासाठी आयुष्याचा कण न कण आणि क्षण अन् क्षण वेचला आणि नित्य नूतन प्रत्यक्ष आत्मानुभवाच्या वाटेवर त्यांची अखंड वाटचाल चालू होती. त्यांचे कार्य - A Constructive Survey of Upanishadic Philosophy, three Pathways, namely, Karnataka, Hindi and Maharashtra literature, The Bhagwadgita as a Philosophy of God Realisation, इ.इ. सुप्रसिद्ध तर आहेतच. शिवाय, या ग्रंथसंपदेवरून त्यांचा तत्त्वज्ञान विषयक गाढा व्यासंग, चिकित्सक, निरंतर अभ्यास व प्रत्यक्ष आत्मानुभूतीवर आधारित तत्त्वज्ञान, यावरही हे ग्रंथ प्रकाश टाकतात. गुरुदेवांनीच म्हटले आहे की, 'Mind is purified, intellect is clarified, and sole is sanctified by the study of Gita.' (BGPGR. P190) त्यांनी दुसऱ्या एका ठिकाणी म्हटले आहे की, 'A state of beatificism is itself our liberation. It is not to be found after death, but here and now.' किंवा, 'Mysticism denotes that attitude of mind, which involves a direct, immediate, first hand intuitive apprehension of God.' (MM, Preface, P1). हे सर्व गुरुदेव स्वतःच्या आत्मानुभवाच्या बलावरच लिहितात. परंतु, गुरुदेवांनी आर्जवपूर्वक, पुन्हा पुन्हा हे प्रतिपादिले आहे की, आत्मसाक्षात्कार किंवा आत्मदर्शन हे केवळ सद्गुरूंच्या कृपेवरच अवलंबून आहे. म्हणून अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, 'सत्याचे गुप्त रूप दाखवतो तो सद्गुरू'. हे तत्त्व अर्थातच जागतिक सर्व थोर संतांनी - ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, महिपती, पुरंदरदास, मदर टेरेसा,

प्लॉटीनस इ.इ. सर्वांनी मान्य केलेले आहे. श्री गुरुदेवांनी आपले संपूर्ण जीवन विशुद्ध साक्षात्कारासाठी आणि परिपूर्ण नैतिकतेसाठी वेचले. तसेच त्यांची ग्रंथसंपदा पाहता, ते खऱ्या अर्थाने 'परमार्थ पाणिनी' होते. मी माझ्या संत पिताश्रींकडून जे परमार्थाचे तत्त्वज्ञान शिकले, ते केवळ त्यांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळेच. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, 'तुका म्हणे अंगे व्हावे ते आपण । तरीच महिमान येईल कळो ।।' मी भाग्यवान आहे की, अशा संतश्रेष्ठ पित्याची कन्या म्हणून त्यांच्या सहवासात आयुष्यातील अनेक मौल्यवान वर्षे व्यतीत केली. माझ्या आईला तर हे सद्भाग्य चाळीस वर्षे लाभले. सर्वसामान्य माणसाला त्यांचे महिमान कळणे केवळ अशक्यच आहे. येथेच मला वाटते, आता हा लेख मी संपवला पाहिजे. कारण बाबांच्या आठवणी, विशेषतः बाबांच्या सान्निध्यातले मौलिक क्षणांचे स्मरण खरोखर अनंत आहे, आणि येथे मला 'लाँगफेलो' (Longfellow) कवीच्या पुढील अविस्मरणीय ओळी आठवतात -

"Life of great men all remind us,
We can make our lives sublime,
And departing leave behind us
foot-prints on the sands of time"

माझ्या परमपूज्य पिताश्रींनी आत्मसाक्षात्काराचा मार्ग उजळून तो अत्यंत तर्कशुद्ध विचारसरणीने आक्रमण्यास उद्युक्त केलेले आहे. तोच मार्ग आपण सर्वजण 'डोळस नामसाधनेने' चोखाळून, विश्वबंधुत्वाच्या दिशेने वाटचाल करुया.

✲✲✲✲✲✲✲✲✲✲✲

## ३. भूतकाळाच्या गाभाऱ्यात

पी. आर. खाडीलकर
सांगली

गुरुदेव रानडे यांची आध्यात्मिक बाजू मला पूर्णपणे अज्ञात आहे. माझा संबंध केवळ व्यक्तिगत स्वरूपाचा होता.

मी जेव्हा दहा वर्षांचा होतो, (१९०० मध्ये) तेव्हा खूप आजारी होतो आणि माझे शाळेचे एक वर्ष वाया गेले. माझ्या वडिलांनी मला घरीच इंग्रजी आणि गणित स्वतः शिकविले. त्यावेळी गुरुदेव मला स्वतः म्हणाले, "तात्या, मी तुमच्या वडिलांचा लाडका विद्यार्थी आहे आणि तुम्ही त्यांचे पुत्र आहात. त्यामुळे आपणा दोघांनाही फायदा होतो." माझे वडील आम्हाला, 'Macaulay's Essays' समजावून देत.

१९०२ च्या डिसेंबरमध्ये, मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रीक परीक्षेला आम्ही दोघे

बसलो. गुरुदेवांना जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती (संस्कृतमध्ये पहिले आल्याबद्दल) मिळाली आणि विद्यापीठात ते दुसरे आले. (पहिले नाडकर्णी - ज्यांच्या वडिलांनी ते पहिले यावेत म्हणून, त्यांना तीन वर्षे मॅट्रीकला थोपवून धरले होते. ते पुढे एल्फिन्स्टन कॉलेजला गेले. पण त्यांची पुढील करीयर इतकी काही चमकली नाही.)

गुरुदेव असे म्हणत असत (असे मी ऐकले आहे) की, 'ऊर्जेचे कॅलरी व्यतिरिक्त इतरही स्रोत आहेत. मला ते माहीत आहेत. तुम्हाला ते अद्याप माहीत नाहीत." मी असेही ऐकले आहे की, एकदा श्री अंबुराव महाराज, रबकवीच्या रामण्णा आनिखिंडी यांचेकडे गेल्यावेळी जेवण होण्यापूर्वीच त्यांना पोट भरल्यासारखे समाधान वाटत होते. त्यांनी यमनाक्कांना (रामण्णांची बहीण) विचारले की, खरोखरच ते जेवले नव्हते का ? तेव्हा यमनाक्कांनी त्यांना स्वयंपाक घरातील अन्नाने भरलेली सर्व भांडी दाखवली. श्री अंबुराव महाराज म्हणत असत - तीन तास सतत नेम केला म्हणजे अर्धाशेर दूध प्यायल्यासारखे वाटते.

मार्च १९५७ मध्ये, नारायणराव गाडगीळ आणि मी असे निंबाळला गुरुदेवांकडे गेलो. त्यांनी आमचे स्वागत केले. नंतर नारायणरावांनी गुरुदेवांना अशा विनंती केली की, त्यांनी स्वतः नाम द्यावे. (गुरुदेव काकांमार्फत नाम देत असत तसे नको) गुरुदेव आमच्याशी मोकळेपणाने बोलत असत, त्यामुळे नारायणरावांना हे तसे सोपे वाटले. पण गुरुदेवांनी ते मान्य केले नाही. (गुरुदेव काकासाहेब तुळपुळे किंवा काकासाहेब कारखानीस यांच्यापैकी कोणाकडून तरी नाम देत.)

मी जेव्हा १९०८-०९ मध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये एम.ए. करत होतो, तेव्हा कधी कधी शनिवार पेठेतील, नातू चाळीतील गुरुदेवांच्या घरी रात्री मुक्काम करीत असे व सकाळी परतत असे. एकदा रात्री दहा वाजता मी आणि गुरुदेवांच्या मातोश्री खालच्या मजल्यावर झोपलो होतो आणि गुरुदेव व सांगलीचे गणू करंदीकर वरच्या मजल्यावर होते व ते गुरुदेवांना प्रश्न विचारीत होते. तेव्हा गुरुदेवांच्या मातोश्री मला म्हणाल्या, "रामूने प्रश्नोत्तरे बंद करून आता झोपावे, हे बरे. 'रामू शहाणा, रामू शहाणा', असे म्हणून त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवितात व हे खुळे चढते."

गुरुदेव एकदा मला म्हणाले, "तात्या, दररोज काही मिनिटे तरी नेम केलाच पाहिजे. तुम्ही करता का ?" मी म्हणालो की, मी कधी कधी करतो. पण दररोज न चुकता करतोच असे नाही. गुरुदेवांनी यावर मला विचारले, "तुला दररोज नेम केलाच पाहिजे. हे लक्षात रहावे म्हणून एक चपराक ठेवून देऊ का ?" मी हसलो आणि गप्प बसलो.

## ४. पुनरुज्जीवनाचा अग्रदूत

डॉ. व्ही. के गोकाक
बंगलोर

गुरुदेवांच्या सहवासात असण्याचे सद्भाग्य काहीवेळा मला लाभले. १९२८ मध्ये मी जेव्हा, अद्याप पदवीधर नव्हतो, तेव्हा त्यांच्या उपनिषदावरील व्याख्यानांनी (धारवाडला) मला मंत्रमुग्ध केले. त्यांच्या निकटवर्ती स्नेह्यांकडून, तसेच प्रा. दामले यांच्याकडून (जे माझे स्नेही होते), मला श्री गुरुदेवांच्या प्रकांड पांडित्याची झलक व्याख्यानाद्वारे अनुभवता आली. श्रीमंत राजेसाहेब, सांगली, यांच्या निवासस्थानी मी एकदा श्री अरविंद यांच्यावर श्री गुरुदेवांच्या उपस्थितीत व्याख्यान दिले. मी तेव्हा कर्नाटक विद्यापीठाचा डीन या नात्याने त्यांना व्याख्यानांसाठी निमंत्रितही केले होते. मी त्यांना धारवाडला माझ्या घरीही निमंत्रित केले व त्यांचे माझ्या घरी स्वागत करण्याचे सद्भाग्य मला लाभले. आश्चर्य म्हणजे, गुरुदेवांच्या निर्याणाची बातमी सकाळच्या वृत्तपत्रात वाचण्यापूर्वीच मला पहाटे स्वप्नात तसे वृत्त कळले होते. अशा अनेक स्मृती माझ्या मनात दाटून येत आहेत. तशा त्या साधकांच्या मनातही उचंबळून येत असाव्यात.

पुनरुज्जीवनाची पहाट निश्चितपणे दिवसामध्ये रूपांतरित होत आहे. मी डॉ. रानडे यांना अशा उषःकालाचा अग्रदूत म्हणून वंदन करतो.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ५. गुरू ही प्रेमाची खाण

एम. एम. बोंगले
हुबळी

प्रा. आर. डी. रानडे, आम्हाला दोन पुस्तके शिकवत असत - Heroes and Hero-worship आणि Unto This Last. त्यावेळी मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी.ए. च्या वर्गात शिकत होतो. मला प्रा. रानडे यांच्याबद्दल अतीव आदर होता. पण अनेक विद्यार्थ्यांपैकी मी एक विद्यार्थी असल्याने दाट परिचय नव्हता.

नंतर बऱ्याच वर्षांनी मला गुरुदेवांचा आश्रम, आश्रमातील कार्यक्रम, प्रा. रानडे यांची पारमार्थिक थोरवी, तसेच ईश्वर साक्षात्काराच्या मार्गावरील साधकांना त्यांचे होणारे बहुमोल मार्गदर्शन इ.इ. माहिती समजली. १३ डिसेंबर १९५४ रोजी नाम मिळून माझा भाग्योदय झाला. तो माझ्या आयुष्यातील सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याचा दिवसच होय. मला पूज्य काकासाहेब तुळपुळे यांच्यामार्फत नाम मिळाले.

नंतर कार्तिकवारीला मी पंढरपूरला जाताना, श्री गुरुदेवांच्या दर्शनार्थ निंबाळला गेलो. आम्ही बोलत बसल्यावेळी पू. काकासाहेब तुळपुळे यांनी, मी ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला असल्याचे सांगितले. गुरुदेवांनी मला एक प्रवचन करण्यास सांगितले. पण मला संकोच वाटत होता. गुरुदेवांसारख्या प्रकांड पंडितासमोर माझ्यासारखा सामान्य माणूस काय बोलणार ? पण गुरुदेवांनी आग्रहच धरला आणि मी पुढील प्रमाणे बोललो -

'ईश्वर साक्षात्कारासाठी भक्ती, वैराग्य आणि ज्ञान यांची आवश्यकता असते आणि यांच्या अभावी ईश्वर साक्षात्कार शक्य नाही. नामदेवांची भक्ती किती उत्कटतेला पोहोचली ते त्यांच्या एका अभंगातून दिसते. नामदेव विठ्ठलाला म्हणतात की, तुझ्या देवळाच्या उंबरठ्यावर मला कोणत्याही रुपात ठेव.'

मी एवढे बोललो आणि तेवढ्यात गाडीची वेळ झाली. गुरुदेवांनी एका नोकराला सिग्नल पडला आहे का, हे पाहण्यास पाठवले. माझ्या चहा पानाची व्यवस्था करवून, गुरुदेव अंघोळीसाठी गेले - मला बसायला सांगितले होते. जेव्हा ते अंघोळीहून आले, तेव्हा त्यांनी एक लांब शर्ट घातला होता आणि ते जवळ जवळ उन्मनी अवस्थेत होते. त्यांची ती अवस्था आजही माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. गाडीचा सिग्नल पाहण्यास गेलेला नोकर सांगत आला की, गाडी निघून गेली होती. गुरुदेव म्हणाले, "छान झाले, चांगले, जेवण करा, संध्याकाळच्या गाडीने जा."

## ६. गुरुकृपा अडचणीच्या वेळी केलेली मदत म्हणून येते

**डॉ. आर. व्ही. चिटणीस**
**सांगली**

माझ्या आयुष्यातील दोन प्रसंग असे आहेत, जेव्हा गुरुदेवांची कृपा - अडचणीच्या वेळी नेमका दिलेला मदतीचा हात म्हणून - अनुभवाला आली. मी १९४८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या बी.ए. च्या परीक्षेला बसणार होतो आणि जे सात पेपर्स होते, त्यात एक पेपर (मराठी प्रिन्सिपलसाठी), 'रामदास वचनामृत' हे गुरुदेवांचे पुस्तक होते. ते पुस्तक कोल्हापूरला पुस्तकांच्या दुकानात उपलब्ध नव्हते. मला तर ते पुस्तक तातडीने पाहिजे होते. कै. श्री. शंकरराव धर्माधिकारी, माझे पुतणे, जे गुरुदेवांचे एकेकाळचे टायपिस्ट होते, त्या काळी विजापूरला वास्तव्य करून होते. मी त्यांना माझी पुस्तकाची गरज सांगितली आणि त्यांनी मला निंबाळला जाऊन श्री गुरुदेवांना विनंती करण्यास सांगितले. मी तसे केले. मी जेव्हा निंबाळला पोहोचलो, तेव्हा गुरुदेव नेमात होते आणि आणखी दोन तास भेटणार नव्हते. नेमातून उठून बाहेर आल्याबरोबर गुरुदेवांना मी

साष्टांग नमस्कार केला आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण गुरुदेव पाच मिनिटे माझ्याकडे निरखून पाहात राहिले आणि बोलले, "असं क्वचित मिळतं. वाहवा ! असं क्वचित सापडतं !" त्यांनी मला लगेच पाहिजे असलेले पुस्तक आणवून दिले. ते त्यावेळी जे बोलले, त्याचा अर्थ मला तेव्हाही उमगला नाही आणि आजही मला समजत नाही.

दुसरा एक प्रसंग असाच खरोखर विरळा आहे. १९६५-६६ मध्ये, श्री. भाऊराव आपटे, निवृत्त न्यायमूर्ती, यांनी मला, Sufism या विषयावर दोन व्याख्याने देण्यास जमखंडीस निमंत्रित केले होते. तो श्रावण महिना होता. गुरुदेव मंदिरात त्यांनी व्याख्यानमालाच आयोजित केली होती. मी माझ्या व्याख्यानाच्या आधी एक दिवस पोहोचलो आणि व्याख्यानाची चांगली तयारी केली होती. पण ऐन व्याख्यानाच्या दिवशी सकाळी माझा घसा बसला आणि मी एक शब्दसुद्धा उच्चारणे अशक्य झाले. औषध घेतले तरी काही उपयोग होईना आणि बहुतेक व्याख्याने रद्द करावी लागण्याची चिन्हे दिसू लागली. पण प्रत्यक्ष व्याख्यानाच्या वेळेपर्यंत काहीच जाहीर केले नाही आणि श्री. आपटे यांची आज्ञा झाली की, मी व्यासपीठावर यावे. मी श्री. गुरुदेवांना नमस्कार करून व्यासपीठावर आलो आणि आम्ही सर्वजण आश्चर्याने स्तंभित झालो. कारण दोन तास अखंड प्रवचनात, मला कोठेही घसा बसल्याचे जाणवलेही नाही. दोन्ही दिवसांची व्याख्याने सुरळीतपणे पार पडली. विशेष आश्चर्य म्हणजे, व्याख्यानापूर्वी आणि नंतर, दोन्ही दिवस घसा बसलेला चांगलाच जाणवत होता. फक्त व्याख्यानाच्या काळात चांगले स्पष्ट बोलता यायचे. ही गुरुदेवांची कृपा नाही तर काय ? श्री. आपटे, प्रा. एन. जी. देशपांडे, जमखंडीच्या कॉलेजमधील त्यावेळचे मराठीचे प्राध्यापक, त्यांच्या पत्नी आणि इतर पुष्कळांना ही घटना पक्की ठाऊक आहे.

जसे घडले तसे मी कथन केले आहे आणि त्यात थोडाही अतिशयोक्तीचा अंश नाही.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७. भक्ताची कामनापूर्ती

शंकरराव बापट
पुणे

श्री गुरुदेवांच्या परमार्थ सोपान या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाकरिता १९५४ मध्ये उपराष्ट्रपती, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, यांनी सांगलीला येण्याचे मान्य केले होते. गुरुदेव निंबाळला होते आणि सांगलीचे राजेसाहेब त्यांना निंबाळहून सांगलीला आणण्यासाठी गाडी पाठविणार होते. त्याच वेळी मातुश्री काकूसाहेब रानडे, आपल्या

आई-वडिलांकडे इस्लामपूरला जाणार होत्या. मी आणि पांडुतात्या (माझे वडील बंधू) गुरुदेवांचा निंबाळहून सांगलीला जाण्याचा व इतर सविस्तर कार्यक्रम, तसेच काकूसाहेबांचा इस्लामपूरला जाण्याचा कार्यक्रम आखण्यासाठी एक दिवस अगोदर निंबाळला पोहोचलो.

त्या दिवशी दुपारचे सिटींग संपताच, श्री गुरुदेवांनी असा निर्णय घेतला की, विजापूरला न जाता ते निंबाळहून सरळ सांगलीला जातील आणि त्यांच्या बरोबर कारमध्ये प्रा. तात्यासाहेब दामले, (गुरुदेवांचे भाचे) असतील. त्यामुळे ते विजापूरला माझ्या घरी न येता, तसेच पुढे जाणार होते. मातुश्री काकूसाहेब यांनी आगगाडीने विजापूरला जावे व तेथून इस्लामपूरला मी व पांडुतात्यांनी त्यांना पोहोचवून मग आम्ही सांगलीला यावे असेही ठरले. श्री. वासुदेवराव रानडे (गुरुदेवांचे एक नातेवाईक) यांनीही आमच्या कारमधून इस्लामपूरपर्यंत यावे, असेही ठरले. असा कार्यक्रम ठरल्यावर आम्ही दोघे बंधू विजापूरला परतलो.

दुसऱ्या दिवशी पहाटे मला एक स्वप्न पडले की, श्री गुरुदेव विजापूरला आमच्या घरी आले आहेत आणि चहा घेऊन मग पुढे ते सांगलीला प्रयाण करीत आहेत. त्याच दिवशी प्रल्हाद कुलकर्णी (गुरुदेवांचे एक विद्यार्थी साधक) यांनीही येऊन सिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे गुरुदेव सांगलीला सरळ जातील (श्रीमंत राजेसाहेबांच्या कारने) आणि मातुश्री काकूसाहेब ट्रेनने विजापूरला येतील असेच सांगितले. मी प्रल्हादना माझे स्वप्न सांगून, कदाचित गुरुदेव स्वप्नदृष्टान्ताप्रमाणे माझ्या घरी येतील आणि चहा घेऊन मग पुढे सांगलीला जातील असे म्हटले. मातुश्री काकूसाहेब ट्रेनने विजापूरला येणार असल्याने, आम्ही जेवण आटोपून, रेल्वे स्टेशनवर त्यांच्या स्वागतासाठी जाण्याचे ठरले.

मी जेवायला जाण्यापूर्वी माझ्या घरातील नोकर दुर्गाप्पा याला हॉल वगैरे झाडून थोडे तयारीत राहण्यास सांगितले. कारण न जाणो, माझ्या स्वप्नाप्रमाणे अचानक गुरुदेव आले तर आम्ही त्यांच्या स्वागतास सज्ज असावे. आम्ही चहाचीही तयारी करून ठेवली. मी जेवण झाल्यावरोबर स्टेशनवर जाण्याची तयारी करू लागलो. आणि पाहतो तर काय ? सांगलीच्या राजेसाहेबांनी दिलेली गाडी अचानक आमच्या दारात उभी राहिली आणि गाडीतून स्वतः श्री गुरुदेव, मातुश्री काकूसाहेब, प्रा. दामले इ. सर्वजण उतरले. गुरुदेव घरात आले आणि सर्व तयारी पाहून, पहिला प्रश्न त्यांनी मला केला, "काय, मी तुमच्याकडे येणार हे तुम्हाला माहीत होते की काय ?" आणि एवढे बोलून ते माझ्याकडे हसत पाहात राहिले. मी उत्तर दिले, "आपण प्रल्हादबरोबर निरोप पाठविला त्या प्रमाणे आता येणार नव्हता; पण मला स्वप्नात असा संदेश मिळाला की, तुम्ही आता येणार आणि चहा घेणार." गुरुदेव पुन्हा हसले. ते नंतर ध्यानमग्न झाले. नेमातून उठल्यावर

त्यांनी चहा घेतला. नंतर ते प्रा. दामले यांच्यासह सांगलीकडे रवाना झाले. मी, मातुश्री काकूसाहेब आणि वासुदेवराव रानडे यांच्यासह इस्लामपूरकडे प्रयाण केले.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ८. ते आले, त्यांनी पाहिले, त्यांनी शुभाशीष दिले

**श्रीपाद जोशी**

**शेडबाळ**

१९५१ मध्ये गुरुदेव निंबाळहून बेळगावला निघाले होते. मी वाटेत शेडबाळला त्यांची वाट पाहात थांबलो होतो. मला पाहताच गुरुदेवांनी थांबण्यास सांगितले. मी त्यांच्या जवळ जाऊन पायावर डोके ठेवून नमस्कार केला आणि बेळगावहून परत जाताना घरी येण्याची विनंती केली. गुरुदेवांनी क्षणभर माझ्याकडे निरखून पाहिले आणि येण्याचे मान्य केले. पण त्यांच्या बरोबर असलेल्या इतरांनी, 'फार तयारीत राहू नका, ते येतीलच अशी खात्री नाही', असे सांगितले.

परत जाताना मोटार कागवाडपर्यंत आली आणि गुरुदेवांनी विचारले की, येथून शेडबाळ किती लांब आहे ? येथून दोन मैलच आहे, असे सांगताच, त्यांनी ड्रायव्हरला गाडी शेडबाळला नेण्यास सांगितले. संध्याकाळी साडेसहा वाजता ते आमच्या घरी पोहोचले. मी काहीच तयारी केली नव्हती. मी पळतच गेलो आणि त्यांना घरात घेऊन आलो. मी जेथे भाऊसाहेब महाराजांचा फोटो ठेवला होता, तेथे ते व्हरांड्यात बसले. सौ. काकूसाहेबही त्यांच्याबरोबर होत्या. १९२६ मध्ये शेडबाळला आल्यावेळी श्री अंबुराव महाराज जेथे नेमाला बसले होते, ती खोली पाहून त्यांना फार आनंद झाला. श्री गुरुदेवांनी भजन करण्यास सांगितले. त्यांनी स्वतःच चहा बनवला आणि तेथे असलेल्या सर्वांना दिला. नामस्मरणाशिवाय पारमार्थिक प्रगती शक्य नाही हे त्यांनी आमच्या घरी आवर्जून सांगितले. आमच्या कुटुंबियांवर आशीर्वादाचा कटाक्ष टाकून ते परत गेले.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ९. मला माझे सद्‌गुरू कसे दिसले ?

**डॉ. एन. एस. ख्रिश्चन**

**औरंगाबाद**

मी पुस्तकाचा आधार घेऊन, कुंडलिनी योगाचा अभ्यास, गुरू शिवाय करत होतो. एके रात्री मी नेम करत असताना, कुंडलिनी शक्ती जागृत होऊन मला जबरदस्त मानसिक धक्का बसला आणि त्या वेळेपासून माझी विचित्र मानसिक अवस्था म्हणजे,

गुंगीत असल्यासारखे वाटण्यापासून ते मृत्यूच्या भितीपर्यंत आणि तदनुषंगिक, नाडीचे ठोके बदलणे इत्यादी शारीरिक बदल होत राहिले. माझी झोप पार उडाली आणि योगी लोकांप्रमाणे, मी तूर्यावस्थेत जाणे वगैरे प्रकार होऊ लागले. माझे मित्र जेव्हा मला जीपमधून गणेशपुरीला घेऊन निघाले होते, तेव्हा मी तूर्यावस्थेत गेल्याचे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. आम्ही संध्याकाळी स्वामी नित्यानंदांना भेटलो आणि मला उपदेश देण्याची विनंती केली. त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि ते हिंदीत बोलले, "अच्छा जाव. अभी मिलेगा जाव." आम्ही रात्री मुंबईला पोहोचलो आणि शीवच्या विश्रामगृहात राहिलो. दुसऱ्या दिवशी आषाढी एकादशी होती. मी पहाटे चार वाजता उठलो आणि ललिता सहस्रनाम म्हणत होतो. माझे मित्र गेल्या रात्रभर धो धो पावसात अडीचशे मैलाचा जीपने प्रवास करून थकून गेल्यामुळे घोरत पडले होते. मी स्तोत्र संपवतच आणले होते इतक्यात, मी तूर्यावस्थेत गेलो आणि त्या अवस्थेत मला देवीचे दर्शन झाले. माझे मित्र जागे झाले, तेव्हा त्यांना माझा चेहरा उत्तेजित आणि डोळ्यातून अश्रूधारा वाहत असल्याचे दिसले. जवळ जवळ अर्धा तास मी त्या अवस्थेतच होतो. तो सबंध दिवस मी खूप उल्हसित होतो. डॉ. बी. एस. कुलकर्णी यांनी माझी नाडी अनियमित पाहून दादरच्या सुप्रसिद्ध कार्डियॉलॉजिस्ट आणि जे. जे. मेडिकल कॉलेजमधील प्रोफेसर ऑफ मेडिसिन, डॉ. टी. एच. तुळपुळे यांच्याकडे नेले. कार्डिओग्राम, एक्स-रे इत्यादी काढून माझे हृदय अगदी व्यवस्थित काम करीत असल्याचा निर्वाळा डॉक्टरसाहेबांनी दिला. मी गुंगीत असल्यासारखे आणि माझे शरीर फुटून जाईल, अशी काहीतरी भावना मी अनुभवत होतो. मी डॉक्टरांना औषध देण्यास सांगितले. डॉ. तुळपुळे यांनी निंबाळच्या गुरुदेव रानडे यांना भेटण्याचा सल्ला दिला. मी घरी आलो आणि मला दोन स्वप्न दृष्टान्त झाले. पहिल्यात मी नित्यानंदांच्या मांडीवर बसलो होतो आणि ते मला थोबाडीत देण्याची धमकी देत होते. दुसऱ्यात मला गुरुदेव रानडे, ज्यांना मी कधी पाहिले नव्हते, स्वप्नात दिसले आणि म्हणाले, "डॉक्टर ! तुम्ही निंबाळला या, मी तुम्हाला समाधीयोग दाखवतो."

तीन आठवड्यांनी मी निंबाळला गेलो. माझे मित्र, श्री. एम. एन. देशपांडे यांच्यासह मी निंबाळला पोहोचलो. तेथे जाताच श्री गुरुदेवांच्या आध्यात्मिक स्पर्शाने, माझे परमार्थ मार्गातील सर्व अडथळे तत्काळ दूर झाले. गुरुदेवांनी माझे आपुलकीने स्वागत करून, मला माझ्या इष्ट देवतेनुरूप ख्रिश्चन नामच दिले आणि त्यांच्या विशाल पारमार्थिक कुटुंबाचा एक घटक करून घेतले.

गुरुदेवांच्या त्या दिवशीच्या दुपारच्या सिटींगमध्ये अनेक साधक होते. अचानक गुरुदेवांनी माझ्याकडे प्रेमळ नजरेने पाहून जवळ बोलावले आणि एखादे पद म्हणण्यास सांगितले. मी शैव सिद्धान्तातील एक पद म्हणता म्हणताच अचानक तूर्यावस्थेत गेलो. गुरुदेवांनी स्वप्नात ज्याचे मला आश्वासन दिले होते, तशी समाधी मला लागली. जेव्हा मी

समाधीतून जागा झालो, तेव्हा माझ्या डोळ्यातून घळघळ अश्रूधारा वाहत होत्या. माझे मस्तक श्री गुरुदेवांच्या मांडीवर होते आणि ते आपला हात माझ्या पाठीवरून फिरवत होते. मी उठून बसताच त्यांनी मला विचारले, "तुम्हाला हेच पाहिजे होते ना ?" मी उत्तर दिले, "मला माहीत नाही. पण गुरुदेव, तुम्ही जे दिले आहे, तो तुमचा आशीर्वाद आहे." यानंतर मी घरी परतलो. नंतर एक दिवस नेमात, अर्धवट निद्रावस्थेत असताना, गुरुदेव मला दिसले आणि म्हणाले, "डॉक्टर ! तुमच्या डोक्यात किडे भरलेले आहेत, ते मी काढतो." असे म्हणत त्यांनी माझ्या डाव्या कानातून लांब दोऱ्यासारखे किडे बाहेर काढले आणि फेकून दिले. त्या अविस्मरणीय दृष्टान्तानंतर, माझ्या मनावर आणि शरीरावर कुंडलिनी योगामुळे जो परिणाम होऊन पारमार्थिक मार्गात जो अडथळा निर्माण झाला होता, तो संपूर्ण दूर झाला. त्यामुळे माझी गुरुदेवांवरील श्रद्धा अधिकच दृढ झाली. असे माझे गुरुदेव मला भेटले.

असे आमचे गुरुदेव, उगवत्या सूर्याप्रमाणे, तेजःपुंज चेहेऱ्याने जेव्हा सिटींगमध्ये त्यांची आवडती हिरवी शाल पांघरून बसलेले असत, तेव्हा मला ते नेहमी एखाद्या आत्मसाक्षात्कारी पोपटाप्रमाणे वेदपठण करीत असल्यासारखे भासत. 'विवेकचूडामणि'मध्ये श्रीमद् शंकराचार्यांनी वर्णन केल्याप्रमाणे ते आदर्श गुरू मला दिसतात. त्यांच्यामध्ये अहंकाराचा अंशसुद्धा नव्हता. ते नम्रतेचे मूर्तिमंत प्रतीक होते.

गुरुदेवांच्या अशक्त शरीरात जणू विश्वातले मूर्तिमंत चैतन्य ठासून भरलेले होते. ते पिसे काढून ठेवलेल्या पक्ष्याप्रमाणे भासत की ज्याचे डोळे ईश्वर दर्शनाच्या धुंदीने चमकत आहेत आणि ज्यांच्या जीवनभराच्या तपश्चर्येने जे साक्षात ब्रह्मानंदाचे प्रतीक आहेत. गुरुदेव, जे रक्तमांसाचे साक्षात परमेश्वर होते.

आता गुरुदेव ज्यांच्याशी समरस, एकरूप झाले होते, त्या परमेश्वराच्या वसतीस्थानात आहेत. ते आता विश्वात्मक देवाशी एकरूप झालेले आहेत, की ज्यांचा स्वर झुळझुळत्या वाऱ्यावर स्वार होऊ येतो, जे उगवत्या सूर्यामध्ये, तसेच दैदिप्यमान ताऱ्यांमध्ये, एवढेच नव्हे तर, 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' अशा स्वरूपात सर्वंकष सर्वव्यापी होऊन राहिलेले आहेत.

✲✲✲✲✲✲✲✲✲✲✲

## १०. एक श्रेष्ठ स्वर्गीय अनुभव

पद्मश्री काकासाहेब कारखानीस

विजापूर

एकदा आळंदीला वारकरी शिक्षण संस्थेमार्फत गुरुदेवांना वार्षिक समारंभाचे

निमंत्रण आले होते. पुण्यातील 'अध्यात्म भुवन' या त्यांच्या निवासस्थानापासून आळंदीला जाण्यास ते टांग्याने निघाले. मी त्यांच्यासोबत होतो.

काही वर्षानंतर प्रसिद्ध नट व संगीतकार मास्टर कृष्णराव पुण्यात गुरुदेवांना भेटण्यासाठी आले. गुरुदेवांनी त्यांना भजन म्हणण्यास सांगितले. त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांचा, 'तुझिये निढळी । कोटी चंद्रप्रकाशे ।' हा सुप्रसिद्ध अभंग म्हटला.

एकदा त्या अभंगाचा संदर्भ देऊन गुरुदेव निंबाळला मला म्हणाले, "गणपतराव ! आपण आळंदीच्या वारकरी शिक्षण संस्थेच्या समारंभासाठी टांग्यातून आळंदीला गेल्याचे तुम्हाला आठवते ना ? या अभंगात ज्या अनुभवाचे वर्णन आहे तो अध्यात्म भुवनापासून आळंदीला पोहोचेपर्यंत सतत माझ्या डोळ्यासमोर होता."

ही घटना १९१८ सालची आहे. या घटनेतून त्या वयातसुद्धा गुरुदेव परमार्थात किती पुढे गेलेले होते, हे लक्षात येते. एकदा गुरुदेव मला म्हणाले, "असा अभंग ज्ञानेश्वरांशिवाय कोणीही लिहू शकणार नाही." गुरुदेव हा अभंग जेव्हा जेव्हा गुणगुणत, तेव्हा तेव्हा त्या अभंगाच्या भावात हरवून जात. असे वाटते की, प्रत्यक्ष श्रीकृष्ण त्यांच्यासमोर उभा राहून त्यांना हाक मारत असे.

एकदा गुरुदेवांनी त्या अभंगावर संतसभेत मला बोलण्यास सांगितले. मला गुरुदेवांच्यासमोर - की ज्यांना त्या अभंगाचा प्रत्यक्ष अनुभव होता - बोलणे फारच कठीण वाटले. पण गुरुदेवांची आज्ञा म्हणून मी त्या अभंगावर बोललो.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ११. गुरुदेव माझ्या जीवनात कसे आले

**व्ही. जी. अपसंगी**
**जमखंडी**

जेव्हा जेव्हा मी भवन्स जर्नल्सच्या मालिकेचे लेख वाचले (How God came in to my life या बद्दल) तेव्हा तेव्हा माझ्या मनात एक विचार चमकून जाई. तो म्हणजे, आपण असेच आपल्या आयुष्यातील एका अनुभवाबद्दल, की जो माझ्या जीवन प्रवासाचा एकमेव आधार आहे, जे माझ्या आयुष्याचे एकमेव स्फूर्तिस्थान व मार्गदर्शक तत्त्व आहे, त्या बद्दल जरूर जरूर लिहावे.

मला अशा एका घटनेचे स्मरण येथे होते की, रामकृष्ण परमहंसांना त्यांच्या समाधी अवस्थेत अत्युत्कट आनंदाचा अनुभव येत असे. तो इतका उत्कट असायचा की, तो त्यांच्यात सामावून ठेवणे, त्यांना शक्य नव्हते. म्हणून ते कालीमातेच्या मंदिराच्यावर गच्चीत जाऊन मोठ्याने ओरडत, "माझ्या शिष्यानो ! मातेची इच्छा आहे की, मी तुम्हाला

अनुग्रहीत करावे. या लवकर या, उशीर करू नका." आणि मग सर्व दिशांनी स्त्री-पुरुष, सर्वांच्या झुंडीच्या झुंडी येत. त्यात सुशिक्षित, अशिक्षित, योगी, भक्त सर्वांचा भरणा असे आणि रामकृष्णांना त्या सर्वांची आधीच कल्पना असायची की, कोण कोणत्या पातळीवर आहे व कोणाची किती श्रद्धा आहे. म्हणूनच स्वामी विवेकानंदांच्या पहिल्या भेटीतच रामकृष्ण परमहंसांना अतिशय आनंद होऊन, जणू त्यांनी त्यांच्यावर कृपेचा वर्षावच केला. अशाच कृपेचा वर्षाव माझ्या सद्‌गुरूंनी कसा केला, याचे वर्णन, जसे घडले तसे, मी पुढे दिले आहे.

सांगलीला कॉलेजमध्ये असताना, श्री गुरुदेवांचा तत्त्वज्ञान विषयाचा शिष्य होण्याचे सद्‌भाग्य मला लाभले. मला आजसुद्धा त्यांच्या तत्त्वज्ञानातील ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल दिलेली व्याख्याने आठवली की शरीरावर रोमांच उभे राहतात. पण त्यावेळी वयाने फारच लहान असल्याने, त्यांची कित्येक व्याख्याने डोक्यावरून जात. पण त्यांच्या विचारांचा ठसा मात्र कायमचा मेंदूवर कोरला गेला आहे. त्या काळात गुरुदेव फक्त रामभाऊ रानडे होते. पण त्याही काळात त्यांचे अत्यंत प्रकांड पांडित्य आणि तत्त्वज्ञान विषयक सखोल अभ्यासू दृष्टिकोन हे सर्वश्रुत होते. ते त्या काळात साधक म्हणून साधना करीत होते आणि अद्याप गुरूपदावर विराजमान झाले नव्हते.

ते एकदा जमखंडीला, त्यांच्या जन्मगावी, जेथे त्यांचे शालेय शिक्षण झाले, आले होते. त्यांनी मला त्यांच्या भेटीला गेल्यावेळी, पुरंदरदासांचे एक पद म्हणण्यास सांगितले. त्यांच्यासाठी पद म्हणणे हा एक फार मोठा आनंद होता. मी म्हटलेले पद त्यांना इतके आवडले की, त्यांनी मला विचारले की, मी त्यांचा सेक्रेटरी म्हणून निंबाळास येण्यास तयार आहे का ? पण माझे नुकतेच लग्न झाले होते व माझ्यावर चार लहान भावांची जबाबदारी होती. त्यामुळे मी तेव्हा नकार दिला. याचा मला नंतर खूप पश्चात्ताप झाला. काळ निघून गेला आणि मी सर्व विसरत चाललो. मला जमखंडीच्या बऱ्याच लोकांनी गुरुदेवांकडून नाम घेतल्याचे समजले. मी माझ्या चुकांमुळे म्हणा किंवा माझ्यातील दुबळेपणामुळे म्हणा, गुरुदेवांकडून नाम घेण्यास बिचकत होतो.

गुरुदेवांच्या निर्याणापूर्वी एक वर्ष, अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी, गुरुदेव माझ्या स्वप्नात आले आणि म्हणाले, "काय, कधी जागे होणार ? केस पांढरे झाले, माझ्याकडे कधी येणार ?" तोच स्नेहपूर्ण, मायाळू आवाज. त्यांच्या डोक्यावर पगडी ऐवजी फेटा होता आणि गुरुदेव थोडे वेगळेच (पूर्वी मी पाहिले होते त्यापेक्षा.) स्वप्नात दिसले. मी विचार करीत होतो की, हा मनाचा खेळ आहे की खराच गुरुदेवांचा आदेश आहे. मी त्यांना येण्यास नकार दिला होता, त्यामुळे त्या दिवशी मी बेचैन होतो. मी माझ्या काही ज्येष्ठ मित्रांना सल्ला विचारला. त्यांनी मला निंबाळला जाण्याचा सल्ला दिला.

आम्ही एका तासातच मोटारने निंबाळला निघालो आणि अनंत चतुर्दशीला

निंबाळला पोहोचलो. गुरुदेवांकडे जाताना माझ्या हृदयाचे ठोके वाढले होते. मी गुरुदेवांना पाहिले आणि जसे ते मला स्वप्नात दिसले होते, तसेच हुबेहूब दिसले. एवढेच नव्हे तर, त्यांनी स्वप्नात जे शब्द उच्चारले होते, तेच शब्द आता उच्चारले, "काय कधी जागे होणार ? केस पांढरे झाले. पण छान, शेवटी तुम्ही इकडे आलात." मला जन्मभराच्या घाणीतून बाहेर काढून, नाम देऊन माझा उद्धार करण्यास सज्ज असलेल्या गुरुदेवांना पाहून मी किती भाव विव्हल झालो असेन, याची तुम्ही कल्पनाच करा. मी पूर्वी नकार दिला असूनही, आता माझा उद्धार करण्यास ते तत्पर होते आणि मी खरोखर भाग्यवान की त्यांनी मला नाम दिले.

असे गुरुदेव माझ्या स्वप्नात आले. पुढे मी त्यांच्या निकट सान्निध्यात आलो. त्यांनी माझ्यावर खूप प्रेम केले. आता मी त्यांना देहरूपात भेटू शकत नाही; पण त्यांची रक्षण करणारी संजीवन शक्ती सतत माझ्या पाठीशी असल्याची जाणीव मला असते. त्यांनी मला मार्ग दाखवून दिला आहे आणि त्या मार्गावर चालत राहणे एवढेच माझे काम आहे. आपण असे म्हणूया की, ज्या शिष्याचे कल्याण करायचे असते, अशा शिष्यासाठी गुरू नेहमी वाट पाहात थांबलेले असतात.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## १२. संतांच्या सान्निध्यात

**डॉ. आय. पी. सिंग**

१९५१ मधील ते वसंत ऋतूचे दिवस होते. अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे माझे एक सहकारी मला सांगत होते की, डॉ. आर. डी. रानडे यांचे 'Mysticism in Hindi Literature' या विषयावर संध्याकाळी व्याख्यान होते. मी डॉ. रानडे यांच्याबद्दल,अलाहाबाद विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सेलर व तत्त्वज्ञान विभागाचे डीन म्हणून पुष्कळच ऐकले होते. त्यांची काही पुस्तकेही वाचली होती. पण अद्याप त्यांना पाहण्याचा योग आला नव्हता. त्यामुळे प्रा. रानडे यांना भेटण्याची इच्छा इतकी तीव्र होती की, मी काहीही करून त्यांच्या व्याख्यानाला हजर राहण्याचे ठरविले. काही कारणाने मला व्याख्यानाच्या जागी पोहोचण्यास थोडा उशीरच झाला. मी हॉलमध्ये शिरलो तेव्हा मीराबाईंचे प्रसिद्ध भजन, 'जोगी मत जा...' यावर व्याख्यान चालू होते. प्रा. रानडे त्या भजनातील एक अत्यंत महत्त्वाची ओळ समजावून सांगत होते. त्या ओळीचा आधीचा भाग, 'भक्ती आणि प्रेम यांचा मार्ग फार विलक्षण आहे', असा होता आणि त्या नंतरच्या भागाचे दोन अर्थ निघत होते. 'हमको गैल बता जा' आणि 'हमको गैल लगाता जा' (म्हणजे, 'तू मला मार्ग दाखव' आणि 'तू मला मार्गावर सोबत कर') प्रा. रानडे यांनी या

दोन भिन्न अर्थांतून पारमार्थिक संप्रदायांचे दोन स्पष्ट प्रकार - १) ज्ञानमार्ग आणि २) पूर्ण शरणागतीचा म्हणजे देवाशी एकरूप होण्याचा मार्ग, कसे अस्तित्वात आहेत, ते फारच छान समजावून दिले.

त्या व्याख्यानातील अत्यंत मार्मिक, तर्कशुद्ध स्पष्टीकरणाने मी इतका प्रभावित झालो की, मला जणू काही प्रत्यक्ष संतश्रेष्ठाच्या सान्निध्याचा परमानंद प्राप्त झाला. त्यानंतर मी त्यांची व्याख्याने कधी होतात यावर लक्षच ठेवून राहिलो आणि त्यातील एकही चुकणार नाही, याची दक्षता घेऊ लागलो. एवढ्यानेच समाधान होईना म्हणून मी माझ्या एका निकटवर्ती मित्रामार्फत श्री रानडे यांना भेटण्याचे ठरवून, त्यांच्या व्याख्यानाच्या ठिकाणी प्रथमच भेटीस गेलो. त्यानंतरही मी त्यांना भेटतच गेलो. संध्याकाळच्या वेळी त्यांच्या दिवाणखान्यात बडी बडी मंडळी आलेली असायची. ज्येष्ठ अधिकारी, हायकोर्टांचे न्यायमूर्ती, मोठे राजकीय पुढारी इ.इ. पण अशा मिटींग्जमध्ये कोणतेही गूढतेचे वलय नसायचे, हे त्याचे वैशिष्ट्य होते.

अशारीतीने श्री रानडे यांचे व्यक्तिमत्व मी दोन वर्षे न्याहाळत होते. पण श्री रानडे यांना जाणून घेण्याची माझी तीव्र इच्छा १९५४ पर्यंत अपूर्णच राहिली. मी जेव्हा तत्त्वज्ञान विभागात दाखल झालो, तेव्हा गंगानाथ झा हॉस्टेलमधील जागा, मी आता विद्यार्थी नसल्याने, सोडावी लागणार होती. मला माझ्या बऱ्याच मित्रांनी राहण्यास येण्याचे आमंत्रण दिले. पण मी माझे स्नेही, सतीशचंद्र शर्मा यांना श्री रानडे यांचेकडे राहणे कितपत शक्य आहे, हे शोधून काढण्यास सांगितले. त्याच दिवशी संध्याकाळी सतीश सांगत आला की, श्री रानडे यांनी माझी विनंती मान्य केली आहे. ती थोडी विश्वास न बसण्यासारखीच गोष्ट होती. श्री रानडे यांचे घरात राहणे म्हणजे आश्रमात राहण्यासारखे कडक शिस्तीचे आहे, याची मला जाणीव होती. अगदी पातळ सतरंजीवर झोपणे व साधे अन्न खाणे, या गोष्टी सक्तीच्या नसल्या तरी त्यांच्या घराच्या शिस्तीच्या होत्या. अशा घरात राहता राहता मी मनोमन श्री रानडे यांना गुरुस्थानी मानले.

गुरुदेव दिवसातून बहुतेक सर्व वेळी नेमातच असत. कधी कधी मधू कुमठेकर मला विशेष अतिथींना गुरुदेवांकडे घेऊन जाण्यास सांगत. मी अशा संधीची वाटच पहात असे. कारण एकदा अतिथींना गुरुदेवांकडे घेऊन गेल्यानंतर, मी गुरुदेवांच्या सान्निध्यात जितका वेळ राहता येईल तितका वेळ राहण्याची संधी गमावत नसे. गुरुदेव त्यांच्या खाजगी बैठकीत, दिवाणखान्यातील बैठकीपेक्षा अगदीच भिन्न भासायचे. त्यांच्या असाधारण अस्तित्वाचा जबरदस्त प्रभाव त्यांच्या सान्निध्यातील व्यक्तीवर पडायचा. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या व्यक्तीशी बोलायचे, त्या व्यक्तीकडे क्षण, दोन क्षण ते निरखून बघायचे. त्या कालावधीत, ते जेव्हा शांतपणे न्याहाळत, जणू काही ते त्या व्यक्तीशी संपर्क साधत.

अ. आठणींच्या प्रदेशात

गुरुदेवांचे व्यक्तिमत्वातील सर्वात आगळे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या व्यक्तीशी संपर्क साधायचा, त्या व्यक्तीच्या पातळीवरून त्यांची वागण्याची व विचार करण्याची पद्धत. अनेकविध व्यक्तिमत्वाच्या व्यक्तींशी ते अत्यंत अवघड प्रश्नांची चर्चा करताना दिसायचे. त्यांच्या घरातील अगदी वयोवृद्ध सेवकाशी - भगवान दीनशी - बोलताना ते कधी कधी घरगुती बाबींवरून चिडलेले दिसायचे. भगवान दीनची गाय सापडत नाही किंवा त्याच्या पुतण्याला परीक्षेत कमी मार्क पडले, अशा क्षुल्लक कारणांवरून त्यांना वैतागलेले पाहून, कधी कधी गंमत वाटायची आणि अशा तक्रारींचे निवारण झाल्याबरोबर गुरुदेवांच्या चेहऱ्यावरून बालिश आनंद ओसंडताना दिसे. अशाच काही तक्रारींच्या बाबी, त्यांच्या व्यक्तिगत किंवा कार्यालयीन असल्या तरी, त्यांचे निवारण करतानाही ते दिसायचे.

युनिव्हर्सिटीत व्याख्याता म्हणून काम करत असतानाच मी, IAS आणि IFS परीक्षांची तयारी करीत होतो. माझ्या तयारीबद्दल गुरुदेव अधून मधून आस्थेवाईकपणे चौकशी करत. १९५५ च्या सुरुवातीस त्या परीक्षांचे निकाल लागले आणि आयएफएसमध्ये उत्तीर्णांमध्ये माझा पहिला क्रमांक लागला. मला कळेना की, फॉरेन सर्व्हिसमध्ये जावे की आयएएसच्या नोकरीत रहावे. मी लागलीच मार्गदर्शनासाठी गुरुदेवांकडे गेलो. त्यांनी मला फॉरेन सर्व्हिसमध्ये जाण्याचा सल्ला दिला. मी त्यांचे आशीर्वाद घेऊन तसे उत्तर पाठविले. एप्रिलमध्ये त्यांनी मला भावपूर्ण निरोप दिला. त्यानंतर एका वर्षाने मी गृहस्थाश्रमात प्रवेश करायचे ठरविले. मी गुरुदेवांना पत्र पाठवून आशीर्वाद घेतले. लग्नानंतर मी पत्नीसह अलाहाबादला गुरुदेवांच्या दर्शनाला गेलो. त्यांची ती भेट शेवटचीच ठरली. कारण मी पुढील शिक्षणासाठी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीला गेलो. गुरुदेवांचे आशीर्वाद घेऊन निघताना, त्यांनी परदेशात उच्च भारतीय सांस्कृतिक मूल्यांचे जतन करण्यास सांगितले.

१९५६-५७ मध्ये, ऑक्सफर्डमध्ये असताना, मधू कुमठेकर अधून मधून गुरुदेवांच्या, Mysticism in Marathi आणि Kannad Literature च्या लिखाणाबद्दल कळवित असत. एकदा मी ऑक्सफर्डमधील Blackwells या प्रसिद्ध पुस्तक विक्रेत्याकडे गेलो आणि गुरुदेवांच्या सर्व पुस्तकांच्या संचाची माझ्यासाठी मागणी नोंदवली. त्याच दिवशी मधू कुमठेकर यांचे खोलीवर पत्र येऊन पडले होते की, गुरुदेवांचे निर्याण झाले. मी अक्षरशः लहान मुलासारखा ढसाढसा रडलो.

आपल्या देशात संतांची एक अखंड मालिका असलेली दिसते. मला अशा संतांबद्दल एक प्रकारचा नितांत आदर सतत वाटतो. माझे असे मत आहे की, एखाद्या सामान्य माणसाला संतासारखे भासवणे सोपे आहे; पण एखाद्या श्रेष्ठ संताला सामान्य माणूस असल्याचे भासवणे अवघड आहे. गुरुदेवांचे असामान्यत्व या त्यांच्या सामान्यत्व दाखवण्यामध्ये होते. त्यांच्यामधील 'संतत्वाने' कधीही 'माणुसकीला' बाजूला सारले नाही.

# १३. दैवी आधार

डॉ. एन. एस. ख्रिश्चन
औरंगाबाद

आमच्या प्रिय गुरुदेवांनी मला नाम देताना म्हटले होते, "डॉ. ख्रिश्चन ! मी तुम्हाला या विश्वासाने नाम देत आहे की, तुम्ही तुमच्या ख्रिस्ताला एक दिवस प्रत्यक्ष पाहिले पाहिजे." गेल्या रविवारी अंथरुणातून उठताना, मी अर्धवट झोपेत असताना, अचानक मला ख्रिस्ताचे दर्शन झाले आणि त्यांनी म्हटले, "मी सतत तुझ्याबरोबरच आहे." मी डोळ्यावरील झोप उडवीत नीट निरखून पाहिले तर, मला ख्रिस्ताचे निराळ्या अवस्थेत पुन्हा दर्शन झाले आणि त्यांनी म्हटलेले मी ऐकले, "मी तुला ज्या बद्दल आश्वासन दिले आहे, त्या सर्वांची पूर्तता मी अवश्य करेन." मी अंथरुणावर उठून बसत नीट पाहू लागलो तर मला तिसऱ्यांदा ख्रिस्ताचे दर्शन झाले आणि त्यांनी अखेरचे सांगितले, "सागर आणि पर्वत एकवेळ अदृश्य होतील, परंतु माझे शब्द खोटे ठरणार नाहीत." वीस वर्षापूर्वी मला प्रभू येशू ख्रिस्ताचे असेच दर्शन झाले होते आणि त्याने मला विचारले होते, "तुला काय पाहिजे ?" मी उत्तर दिले होते, "मला एक निष्णात डॉक्टर बनव." आणि मी जागा झालो होतो. माझ्या ध्यानाच्या खोलीत, येशू ख्रिस्ताचे एक मोठे पोर्ट्रेट आहे. जेव्हा गुरुदेव प्रत्यक्ष होते, तेव्हा त्यावद्दल मी त्यांच्याशी बोललो नव्हतो. पण नंतर त्यांनी स्वप्नात येऊन सांगितले की, तुझ्या इष्ट देवतेचे चित्र, तुझ्या ध्यानाच्या खोलीत लाव. सर्वच गोष्टी फार आश्चर्यकारक वाटतात.

एक ऑगस्टला, मला शहरातील लोकांनी, लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्य सकाळी व संध्याकाळी समारंभासाठी पाचारण केले. (१ ऑगस्ट १९६२) मी कितीही नकार दिला तरी लोकांनी आग्रह सोडला नाही. फार मोठी सभा झाली. माननीय शंकरराव चव्हाण प्रमुख वक्ते होते. मी चांगल्या मराठी वक्त्याला सभेसाठी निमंत्रण देण्यास लोकांना विनवले. पण लोक ऐकेनात. शेवटी मी सभेसाठी गेलो. मला गुरुदेवांचे सान्निध्य जाणवत होते. मी मराठीत उत्कृष्ट बोलू शकलो आणि टाळ्यांच्या गजरात माझे भाषण संपले. श्रोते खूष होते. मी काय व कसे बोललो हे माझे मलाच आठवत नाही. पण ते एक उत्कृष्ट भाषण झाले. कसे झाले ? काय घडले ? एवढे उत्कृष्ट भाषण कोणी केले ? निश्चितच मी हे केले नाही. कर्ते करविते गुरुदेव होते.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

# १४. वेषावरून माणसाची पारख नेहमीच होत नाही.

वि. स. पागे
मुंबई

मी सांगलीच्या गणपती मंदिरात डॉ. श्री गुरुदेव रानडे व डॉ. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत एका समारंभाला हजर होतो. तेव्हा डॉ. राधाकृष्णन भारताचे उपराष्ट्रपती होते. मला काही कारणाने श्री गुरुदेवांनी सांगलीच्या राजेसाहेबांच्या माळ बंगल्यावर बोलावले. मी, निश्चलदासांच्या 'विकार सागर' या पुस्तकातील वेदांताच्या तत्त्वज्ञानाबद्दल माझी मते मांडावीत म्हणून मला बोलावण्यात आले होते. मला असे वाटते की, श्री गुरुदेवांच्याजवळ माझ्याबद्दल कोणी तरी बोलले असावे, म्हणूनच मला बोलावण्यात आले होते. तरी मलाच का बोलावले याचे मला आश्चर्य वाटत होते. मला दुपारी तीन वाजता, माळ बंगल्यावर बोलावले होते. मी जेव्हा गेलो तेव्हा श्री गुरुदेव काही लेखन कार्यात मग्न होते. माझ्याबरोबर माझे मामा, स्व. श्री. डी. एम. वरदकर होते. बाहेरच्या खोलीत काही साधक बसले होते आणि गुरुदेव केव्हा बाहेर येतील, याचे काही सांगता येणार नाही, असे ते म्हणाले. पण बरोबर तीन वाजता श्री गुरुदेव बाहेर आले. मी गुरुदेवांना बऱ्याचवेळा पाहिले असले तरी त्यांना त्या अवस्थेत पाहून मी जरा चमकलोच. त्यांच्या उजव्या हातात पिकदाणी होती. त्यांच्या डाव्या बगलेत शर्टाच्या घड्या होत्या. त्यांना बहुतेक वरचेवर शर्ट बदलायला लागायचे. त्यांनी अगदी सैलसर धोतर नेसले होते. त्यांनी बाहेर येताच मला विचारले, "आपणच पागे का ?" मी म्हणालो, "होय. मीच पागे." माझ्या मनात विचार चमकून गेला, हेच ते विद्वान गृहस्थ काय, ज्यांचे वागणे असे विचित्र वाटते. ते मला घेऊन पॅलेसच्या प्रमुख हॉलकडे चालू लागले. माझ्या मनात पूर्वीचा तो विचार आला तेव्हाच त्यांनी माझ्याकडे एकटक पाहिले आणि विचारले, "जॉर्ज ॲलेन आणि अनविन यांनी प्रसिद्ध केलेले, Contemporary Indian Philosophy तुम्ही वाचले आहे का ?" मी म्हटले, "नाही, मी वाचले नाही." ते म्हणाले, "ते वाचा." मी विचारले, "त्यातले नेमके काय वाचावे ?"गुरुदेव म्हणाले, "मी त्यात एक लेख लिहिला आहे. तो जरूर वाचा. त्यात तुम्हाला तुमच्या प्रश्नांची उत्तरे जरूर मिळतील" मी अवाक झालो. त्यानंतर काय घडले ते सांगायलाच नको. आम्ही प्रमुख हॉलमध्ये गेलो. मी एक छोटेसे भाषण केले. गुरुदेवांना ते आवडले. ते म्हणाले की, वेदांतावर मी जे भाष्य केले आहे, ते अगदी बरोबर आहे. त्यानंतर मी घरी परतलो. मी गुरुदेवांनी सांगितलेले पुस्तक आणवले. त्यातील त्यांचा लेख वाचला. त्या लेखात त्यांच्या वागण्याच्या पद्धतीबद्दल त्यांनी लिहिले होते. श्री ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवरील टीकेत लिहिल्याप्रमाणे त्यांच्या वागणुकीची पद्धती होती.

मला वाटते, यापेक्षा जास्त लिहिण्याची आवश्यकता नाही. जरी गुरुदेव सामान्य माणसासारखे वागत होते, तरी त्यांची प्रत्येक कृती हेतुपूर्वक असायची आणि त्यांचा मुख्य हेतू आध्यात्मिक असायचा. माझ्या मनात विचार येताच, त्यांनी तो तत्काळ ओळखला आणि त्याला लागलीच उत्तर दिले. सामान्य योग्याला हे शक्य नाही. ज्यांचे देवाशी एकरूपत्व झाले आहे, त्यांनाच हे शक्य आहे. यावरून श्री गुरुदेवांच्या उंचीची कल्पना येऊ शकते आणि तिचा ठसा माझ्या मनावर कायमचा उमटला आहे. तेच मी येथे थोडक्यात मांडले आहे. १९५०-५१ मधील घटना जशी घडली, तशी मी वाचकांसमोर मांडली आहे. वाचकांनी सूज्ञपणे योग्य तो अर्थ लावावा.

## १५. हिऱ्याला स्वतःची किंमत सांगता येत नाही.

**वसुधा बी. मोडक**
**धारवाड**

१९५५ मध्ये गुरुदेवांना भेटण्याची संधी मला प्राप्त झाली. १६ किंवा १७ मार्च असेल. आमचे नुकतेच लग्न होऊन आम्ही पुण्याच्या वाटेवर असताना निंबाळला गेलो. तोपर्यंत मला गुरुदेवांबद्दल काहीच माहिती नव्हती. ते कोण होते ? त्यांचे सामर्थ्य काय होते ? याची मला काहीच कल्पना नव्हती. मला फक्त निंबाळला श्री गुरुदेव आश्रमाला भेट द्यायची आहे, एवढेच माहीत होते. निंबाळला एका वैशिष्ट्यपूर्ण संताचे दर्शन घडेल एवढ्याच अपेक्षेने मी गेले होते.

आम्ही निंबाळला सकाळी पोहोचलो. रेल्वे स्टेशनपासून आश्रमापर्यंत आम्हाला बरेच लोक भेटले. माझ्या यजमानांची व त्यांची ओळख होती. आमचे आश्रमात प्रेमाने स्वागत झाले. आश्रमातसुद्धा लोक इतक्या आपुलकीने माझ्याशी बोलत होते की, मी प्रथमच आश्रमात येत आहे हे विसरूनच गेले. मी जणू माझ्या नातेवाईकांच्यातच होते असे वाटत होते. नंतर आम्ही नेमासाठी असलेल्या जागेत गेलो. 'नेम' हा प्रकार मला नवीन होता. आतापर्यंत भक्ती करणे म्हणजे काय तर देवाची पूजा करणे, स्तोत्रे म्हणणे इ. मी समजत होते. पण येथे तर तासनतास लोकांना 'नेम' करत बसलेले पाहून मला थोडे आश्चर्यच वाटले. पण त्या वातावरणाने मी भारावून गेले. नेमात मधून मधून भक्तीपर पदे म्हटली जात होती. त्या सर्व वातावरणाने मला फारच आनंद झाला.

मला इतर साधकांच्या बोलण्यातून कळले की, सांगलीचे राजेसाहेब आले आहेत आणि गुरुदेवांच्या घराला लागून असलेल्या त्यांच्या घरात उतरले आहेत. सगळीकडे एकच धावपळ होती कारण गुरुदेव अलाहाबादला जाणार होते. माझी गुरुदेवांना भेटण्याची

उत्सुकता विलक्षण वाढली होती. मी मनोमन त्यांची पूजा करत होते.

साधारण पाच वाजता गुरुदेवांच्या नव्या घरासमोरील मोकळ्या जागेत जेवणे सुरू झाली. सर्वकाही व्यवस्थित होते आहे की नाही याची एक किडकिडीत वृद्ध गृहस्थ चौकशी करत होते. जेवणानंतर बहुतेक जण फिरायला बाहेर पडले. रात्री आम्हाला पुण्याला जायचे होते. मी आश्रमातील सर्व कार्यक्रम पाहिले पण गुरुदेवांना भेटले नाही. म्हणजे देवळात जाऊन देवाचे दर्शन न घेता येण्यासारखे झाले होते. पण गुरुदेवांच्या भेटीबद्दल कोणाला कसे विचारावे या संभ्रमात मी होते.

रात्री आठ वाजता गुरुदेवांच्या नव्या घरात 'सिटींग'साठी सर्वांना बोलावण्यात आले. तेथे गुरुदेव सर्वांशी बोलतील असे सांगण्यात आले. गुरुदेवांनी 'सिटींग'च्या जागेत प्रवेश करताच सर्वांची कुजबुज थांबली. मला आश्चर्याचा धक्काच बसला की मघाशी जेवणाच्या वेळी जे किडकिडीत, वृद्ध गृहस्थ सर्वांच्या जेवणाची चौकशी करत होते, ते स्वतः गुरुदेवच होते. मी त्यावेळी त्यांना कोणीतरी व्यवस्थापनातील व्यक्ती समजले होते.

गुरुदेवांच्या उपस्थितीने वातावरण एकदम पवित्र, शांत व प्रसन्न झाले. मी अवाक होऊनच सर्व पाहात, ऐकत होते. माझ्या कल्पनेतल्यापेक्षा गुरुदेव फारच भिन्न होते. मी, कोणी भगवी वस्त्रे परिधान केलेले साधू दिसतील अशा कल्पनेत होते. पण गुरुदेव चारचौघांसारखेच दिसत होते, मोकळेपणाने सर्वांशी बोलत होते. म्हणूनच जेवणावळीत मी त्यांना पाहिले, पण ओळखले नव्हते. गुरुदेव 'सिटींग' मध्ये प्रत्येकाशी बोलत होते. अडचणी ऐकून त्यांचे निवारण करत होते, पदे म्हटली जात होती.

गुरुदेवांच्या डोळ्यातील तेज आणि वागण्यातील मार्दवाने मी त्या सामान्य दिसणाऱ्या माणसापाठीमागचे असामान्यत्व जाणले. अर्थातच मी त्यांच्यापुढे नतमस्तक झाले. एवढेच नव्हे तर एका प्रेमळ वृद्ध पित्याच्या छत्राखाली लाभावी तशी मनःशांती लाभली.

## १६. विद्यार्थ्यांची गुणवत्ता पारखून त्याला उत्कृष्ट करिअर मिळवून देणे.

**डॉ. पंढरीनाथ हरी प्रभू**

मुंबई विद्यापीठातून फिलॉसॉफी घेऊन पदवीधर झाल्यानंतर माझी नेमणूक १९३३ मध्ये युनिव्हर्सिटी रीसर्च स्कॉलर या नात्याने युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड सोशॉलॉजी मधील, सोशॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये झाली. डॉ. जी. ए. टूथी, D.Phil (Oxon) हे माझे त्यावेळचे सोशॉलॉजीमधील रीडर असलेले, गाईड होते. मी माझे नाव

त्यांच्या मार्गदर्शनाखाली एम. ए. साठी दाखल केले आणि सोशल सायकॉलॉजीमध्ये कार्य करण्याचा मनसुबा रचला. डॉ. जॉन मॅकेन्झी - विल्सन कॉलेजचे तेव्हाचे प्राचार्य - यांनी एक पत्र पाठवून डॉ. टूथी यांच्याकडे माझी शिफारस केली होती.

डॉ. टूथी यांनी एम. ए. साठी रीसर्च करताना कोणता विषय निवडायचा आहे, त्याचे स्वातंत्र्य मला दिले. मी संस्कृतचा बऱ्यापैकी अभ्यासू होतो आणि त्यामुळे संस्कृत वाङ्मयातून पद्धतशीरपणे निवड करून, माझ्या रीसर्चसाठी विषय निवडायचे मी ठरविले. त्या काळात ज्याचा माझा इंग्रजीमधून सखोल अभ्यास झाला होता व ज्याचा परिणाम माझ्यावर फार खोलवर झाला होता, असे इंग्रजी साहित्य म्हणजे, प्रो. रानडे यांचे 'Constructive Survey of Upanishadic Philosophy' आणि डॉ. राधाकृष्णन यांचे 'Indian Philosophy'. वरील दोन ग्रंथ आणि त्यांचे Hindu view of life.' मी एस. एन. दासगुप्ता यांचेही तत्त्वज्ञानावरील पुस्तक वाचले होते. गुरुदेव रानडे यांच्या 'Constructive Survey' प्रमाणे संशोधनात्मक लिहिण्याची माझी तीव्र इच्छा होती. त्यांच्या पुस्तकाचा माझ्यावर इतका खोलवर परिणाम झाला होता की, संशोधनपर लेखनात 'मौंजीबंधन' या विषयात डॉ. रानडे व डॉ. टूथी हे माझे गुरू होते. मी गुरुदेव रानडे यांच्याबद्दल माझ्या सांगलीच्या कॉलेजातील पहिल्या वर्षात, तसेच मुंबई, पुणे येथे शिकताना बरेच ऐकले होते. अखेर मी विल्सन कॉलेज, मुंबई मधून पदवीधर होऊन बाहेर डलो.

सुरुवातीच्या काळातील माझ्या एम. ए. च्या रीसर्च कार्यामध्ये मी संस्कृत वाङ्मयातील The Ideological and Psychological Foundation of Hindu Social Institutions' हा प्रमुख विषय निश्चित केला. मी जवळ जवळ दीड वर्ष केलेल्या संशोधनपर कार्यानंतर त्याचा अहवाल माझे गाईड डॉ. टूथी यांच्याकडे सादर केला. माझे कार्य लक्षात घेऊन त्यांनी असे सुचविले की मी एम. ए. साठी नाव नोंदविले असले तरी सरळ पीएच. डी. साठी सर्व कार्यांची मांडणी सादर करावी. मुंबई विद्यापीठाने त्याच वर्षी पीएच. डी. डीग्री देणे सुरू केले. अर्थात पीएच. डी. साठी मी जो संशोधनपर प्रथम अहवाल सादर केला होता, त्यात बरीच भर घालणे व ते कार्य उत्कृष्ट दर्जाचे होणे आवश्यक होते. अशी रीतीने डॉ. टूथी यांच्या मार्गदर्शनाखाली मी पीएच. डी. साठी प्रबंध चार वर्षात पूर्ण केला.

वैदिक काळातील संस्कृत साहित्यापासून सुरुवात करून अगदी आधुनिक काळापर्यंतच्या साहित्याचा प्रबंध लिहिण्यात साडेतीन वर्षे गेली आणि अखेर १९३७ मध्ये पी. एच. डी. साठी प्रबंध सादर केला. मला वाटले डॉ. टूथी यांनी डॉ. राधाकृष्णन आणि इतर दोन ब्रिटिश प्रोफेसरांची नावे माझ्या प्रबंधाच्या परीक्षणासाठी सुचविली होती. पण त्या काळात युनिव्हर्सिटीमध्ये डॉ. टूथी यांना पाण्यात पाहणारे जे विद्वान होते, त्यांनी माझा

पीएच. डी. चा प्रवंध प्रा. रानडे यांच्याकडे परीक्षणासाठी पाठवावा, असे ठरविले. कारण, प्रा. रानडे संस्कृतचे गाढे विद्वान असल्याने, माझा प्रवंध ते अमान्य करून, पीएच. डी. नाकारतील व त्यायोगे डॉ. टूथी हे युनिव्हर्सिटीमध्ये गाइडचे कार्य करण्यास अपात्र ठरतील, अशी त्यांची समजूत होती.

गुरुदेव रानडे माझ्या पीएच. डी. च्या प्रबंधाचे परीक्षण करणार हे आम्हाला (मी व डॉ. टूथी यांना) कळल्यावर, जरी मी प्रबंध लेखनाचे व संशोधनकार्य सखोल अभ्यासानंतर सादर केले होते, तरी आम्ही दोघेही थोडे बावचळलोच.

दोन महिने निघून गेले आणि तरी प्रा. रानडे यांच्याकडून माझ्या प्रबंधाविषयी काहीच अहवाल पाठवला गेला नाही. त्यामुळे आम्हाला चिंता वाटू लागली. मी जेव्हा रजिस्ट्रारना याबद्दल विचारले तेव्हा त्यांनी प्रा. रानडे यांना एक्स्प्रेस पत्र पाठविण्याचे आश्वासन दिले. प्रा. रानडे यांना त्या नंतर तारही पाठविली गेली. त्यानंतर त्यांचे उत्तर आले की तीन महिन्याच्या आत माझ्या प्रबंधाच्या परीक्षणाचे काम होऊ शकणार नाही. माझ्या मनात उलट सुलट शंकांचे काहूर माजले. पण एकीकडे आशाही वाटत होती की, प्रा. रानडे योग्य उत्तर देतील.

शेवटी साडेतीन महिन्यानंतर प्रा. रानडे यांचा अहवाल रजिस्ट्रारना मिळाला. डॉ. टूथी यांनी लागलीच मला बोलावून घेतले. गुरुदेव रानडेंनी माझ्या प्रबंधावर जो अहवाल पाठविला होता, तो असा -

"I have great pleasure in bearing testimony to the scholarship and academic abilities of Dr. P. H. Valavalkar, whose Ph.D thesis on 'Hindu Social Institutions' I have read with satisfaction and great interest in the capacity of the sole refer appointed by the University of Bombay. The very attractive style of his thesis coupled with a laud presentation of facts, keeps me intensely absorbed while one is reading through the work. (डॉ. वालावलकर हे पूर्वीचे आडनाव बदलून मी डॉ. प्रभू हे आडनाव नंतर घेतले.)

मला व डॉ. टूथी यांना गुरुदेव रानडे यांच्या या अहवालाने किती आनंद झाला असेल याची आपण कल्पनाच करावी. नंतर मी माझ्या प्रबंधाचे पुस्तकात रूपांतर केले. त्या पुस्तकाला डॉ. एस. राधाकृष्णन यांनी प्रस्तावना लिहिण्याची विनंती मान्य झाली, हा विशेष आनंदाचा भाग.

गुरुदेव रानडे यांचे जे महान कार्य पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले, त्याच्यापासूनच मला पुढे प्रेरणा मिळत गेली आणि मी त्यांचा सदैव ऋणी आहे. गुरुदेवांसारख्या महान संताचा व विद्वानाचा आशीर्वाद मला लाभला, हे मी माझे सद्भाग्य समजतो.

# १७. आठवते, मला आठवते !

**प्रा. के. पी. कुलकर्णी**

प्रा. रानडे हे आमचे अगदी लाडके प्राध्यापक होते. ते आम्हाला कार्लाईलच्या हिरोज्बद्दल शिकवित. श्री. बापूराव रानडे, त्यांचे सावत्र बंधू, हे ही आमचे शिक्षक होते आणि रामभाऊ कोल्हापूरला त्यांना भेटण्यासाठी वरचेवर जात. रामभाऊ हे श्री. नरहरी दामले यांचे मामा होते. प्रत्येक विद्यापीठीय परीक्षेत रामभाऊंचा पहिला क्रमांक असायचा आणि ढीगभर बक्षिसे व शिष्यवृत्त्या यांचे ते मानकरी असायचे. त्यामुळे दामले यांच्याकडे ते भेटीला आले की, त्यांचे खूप कौतुक व्हायचे. आम्ही अर्थातच या 'स्कॉलर'ची चालण्याची, बोलण्याची, वागण्याची पद्धत कशी आहे, हे नेमके टिपायचो. आमची मान उंचावेल आणि आनंद द्विगुणित होईल, असेच त्यांचे एकंदर वागणे असायचे. त्या वर्षी तर रामभाऊंनी एम. ए. साठी असलेले 'चॅन्सेलर्स गोल्ड मेडल' मिळविले होते. बुद्धिमत्तेची तीव्रता, वागण्यातील गोडवा, स्वभावातील नम्रता यामुळे ते प्रथम भेटीतच मन जिंकीत. फर्ग्युसन कॉलेजमध्ये तेव्हा दोन आकर्षणे होती. एक डॉ. गुणे व दुसरे रामभाऊ रानडे. फक्त ते अशक्त दिसत. पण त्याची भरपाई ते सौजन्यपूर्ण वागणुकीने करीत. त्यांचा वेष अगदी साधा होता. स्वच्छ शुभ्र धोतर, पुणेरी जोडा, सैलसर सदरा - त्याला कापडी गुंड्या असायच्या, कडक कॉलरचा घट्ट कोट व त्यावर गळ्याभोवती उपरणे - जे गळ्याभोवती सैलसर गुंडाळलेले असायचे. कपाळावर गंधाचा टिळा, डोक्यावर पुणेरी पगडी, गडद रंगाचा कोट, असा त्यांचा वेष असे.

ते वर्गात प्रवेश करत, अतिशय घाईघाईने पावले टाकतच. एक-दोन पुस्तके त्यांच्या हातात असायचीच. त्यांचे व्यक्तिमत्व बरोबर तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाला शोभेलसे होते. संपूर्ण तास होईपर्यंत वर्गात त्यांचा वाक्प्रवाह अखंड वाहत असायचा. त्यांचे इंग्रजी बोलणेही अत्यंत जलद होते. पण अतिशय माधुर्य त्यात असायचे. त्यांच्या भाषेमध्ये गंगेचे पावित्र्य व गांभीर्य होते. प्रत्येक व्याख्यानाला विद्यार्थ्यांना आपण काहीतरी नाविन्यपूर्ण व असामान्य विद्वत्ताप्रचुर ऐकत असल्याचे अनुभवास येई. त्यांच्या सर्वच व्याख्यानात 'रानडे स्टाईल' - विशेषतः: कार्लाईल शिकविताना - जाणवायची आणि त्यांचे वाङ्मयीन प्रेम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवताना शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये एक अतूट बंध निर्माण व्हायचा. आज पंचेचाळीस वर्षांनंतरही त्यांनी शिकवलेल्या गोष्टींची स्मृती मनःपटलावर चिरंतन स्वरूपात कोरली गेली आहे.

**उपनिषद काळातील संत -**

गुरुदेव नेहमी विद्यार्थ्यांना निबंध लिहिण्यास सांगत आणि त्यावर आपल्या सूचना लिहून, दुरुस्त्या सुचवून, ते परत करत. कधीकधी ते निबंधाच्या विषयावर चर्चा

करण्यासाठी विद्यार्थ्यांना बोलवत. फर्ग्युसन कॉलेजच्या होस्टेल बाहेरच त्यांनी दोन खोल्या बांधून घेतल्या होत्या. पण त्यांचे कौटुंबिक वसतीस्थान शनिवार पेठेत होते. आपल्या खोल्यात ते अभ्यासात मग्न असायचे. आम्ही त्यांच्या खोल्यांना 'कार्लाईल कॉटेज' असे टोपण नाव दिले होते. रामभाऊ रानडे यांच्याकडून चर्चेला पाचारण केले जाणे, हा विद्यार्थ्यांत बहुमानाचा विषय होता. ते विद्यार्थ्यांत अगदी लहान मुलांसारखे मिसळत. मुलांनाच संकोच वाटायचा. रंगराव दिवाकर (जे नंतर विहारचे गव्हर्नर झाले.) त्यांचे विद्यार्थी होते. तसेच कधीकधी मलाही त्यांच्या 'कॉटेज'मध्ये जाण्याची संधी मिळे.

**कोणता निबंध लिहावा बरे !**

एकदा गुरुदेवांना माझा एक निबंध फार आवडला म्हणून त्यांनी मला बोलावून घेतले. मला वाटले की माझे नशीबच उघडले. आमच्या कोल्हापूर कंपूत माझे वजन बरेच वाढले. मी जेव्हा कार्लाईल कॉटेजमध्ये पोहोचलो तेव्हा गुरुदेवांनी नेहमीच्या प्रथेने, "या, देव तुमचे भले करो' म्हणत स्वागत केले. 'खरेच, काय उत्तम लिहिलेत हो !" त्यांच्या कौतुकाने मी अगदी भारावून गेलो. माझा निबंध त्यांच्या आवश्यक दुरुस्त्यांसह मोठ्यांदा वाचण्यात आला. माझा निबंध, आता वाटते की एवढा काही असाधारण नव्हता. पण रामभाऊंचे हृदयच इतके विशाल होते की त्याने माझी वारेमाप स्तुती केली होती.

**खरेच, फार कुशल आहे तो -**

खरेच, गुरुदेव मनाचे किती मोकळे होते ! त्यामुळेच प्रत्येकजण त्यांना अगदी सज्जन वाटायचा. प्रत्येक माणसामध्ये काही दैवी सद्गुण असतात यावर त्यांचा अगदी प्रगाढ विश्वास होता. म्हणूनच कोल्हापूर कंपूतील आमच्या सदा पाध्येने मलाही बोलावले होते. 'इंग्लिश क्लब' मधील स्वयंपाक्याचा आमटी करण्यात विशेष नावलौकिक होता. त्याच्या आमटीला क्लबच्या बाहेरही मागणी असायची. रामभाऊ त्या दिवशी जेवायला आहेत, हे ऐकल्यावर तर त्या स्वयंपाक्याने आपले सर्वस्व पणाला लावून आमटी केली. खरंच अगदी ए-वन् आमटी झाली होती. सुपारी खाता खाता रामभाऊंनी त्या स्वयंपाक्याला बोलावले. त्याची थोडावेळ इकडची तिकडची चौकशी केली आणि त्याला म्हणाले, "खरेच, अगदी कुशल आणि मुरब्बी आहेस हं !"

**निंबाळचे संत -**

चाळीस वर्षानंतर, एकदा रामभाऊ रानडे आणि मी एका विद्यार्थ्याच्या पीएच. डी. च्या 'A Critical Survey of the Abhangas of Tukaram' या प्रबंधाचे परीक्षक होतो. त्या प्रबंधावर चर्चा करण्यासाठी गुरुदेवांनी मला निंबाळला बोलावून घेतले. कारण निंबाळला त्यांनी आता आपले वास्तव्य केले होते. मी तर निंबाळला जाण्यास दोन कारणांनी उत्सुक होतो. एक तर मला माझ्या सद्गुरूंचे दर्शन होईल आणि दुसरे म्हणजे,

गुरुदेवांच्या पत्नीचे जे माहेर - इस्लामपूर - तेथे मी त्यांचा बालपणापासूनचा सवंगडी असल्याने, त्यांची जुनी स्मृती जागृत होईल. मी श्री. वैद्यांच्या अंगणात लहानपणी खेळलेला - बागडलेला. बहुधा रामभाऊ हे सारे विसरून गेले असणार. त्यामुळे फक्त प्रबंधाचा सहाय्यक परीक्षक, एवढेच त्यांच्या डोक्यात असणार. मी रात्री आठ वाजता निंबाळला पोहोचलो. माझे स्वागत निंबाळ स्टेशनपासूनच होऊन, माझी खोलीही उत्तम सजवून ठेवली होती. रात्री दहा वाजता रामभाऊ खोलीत आले आणि येताच एकदम उद्‌गारले, "अरे, तूच का कुलकर्णी, माझा फर्ग्युसनचा विद्यार्थी ? मला अजून तुझा उत्कृष्ट निबंध आठवतो हं !" मी त्यांचे स्वागत आणि स्नेहपूर्ण शब्द ऐकून स्तंभितच झालो. मी त्यांच्या आगतस्वागताने दोन दिवस जास्तच मुक्काम ठोकला. निंबाळच्या पवित्र वातावरणात ते दिवस कसे गेले ते कळलेच नाही.

**"सज्जनहो, ते आता उन्मनी अवस्थेत आहेत" -**

निंबाळचा आश्रम रेल्वे स्टेशनपासून अर्ध्या फर्लांगावर आहे. रामभाऊंनी आपल्या गुरूंची समाधी येथून जवळ (इंचगिरीला) आहे. म्हणून निंबाळ हे ठिकाण निवडले. येथील एकांतासाठी त्यांनी येथे आश्रम उभा केला. येथे जास्त घरेही नाहीत. त्यांनी स्वतःचे प्रशस्त घर, मुख्यतः नेमाची खोली, प्रवचनासाठी (sitting) जागा, स्वयंपाकघर इ. बाधले असून, त्यांच्या शिष्यांसाठी काही खोल्या, ऑफिस, जेवणाचा हॉल एवढेच बांधकाम आहे. सांगलीचे राजेसाहेब हे त्यांचे अत्यंत चाहते आहेत. सध्या युवराज तेथे येतात. त्यांचे पंधरा-वीसपेक्षा जास्त विद्यार्थी त्यांच्याकडे नेहमी असतात. आश्रमातील व्यवस्था व कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध असतात. सकाळी हलका नाष्टा दिला जातो. दुपारचे जेवण व रात्री 'प्रसाद' दिला जातो. साधकांना स्वतःच्या चहाची व्यवस्था स्वतःच करावी लागते. नेहमीचा आश्रमाचा खर्च 'कोठी-फंड' नावाच्या निधीतून केला जातो. सायंकाळी चार ते पाचच्या दरम्यान, अतिथी, पाहुणा असेल तर त्याचे प्रवचन आयोजित केले जाते. एकदा सकाळी व एकदा संध्याकाळी, गुरुदेव स्वतः उपस्थित राहून सिटींग घेतात. सिटींग नंतर व दरम्यान पदे गायली जातात.

मी तेथे गेल्यावेळी 'विवेक-सिंधू'वर बोलण्यास मला पाचारण केले गेले. माझ्याशिवाय तेव्हा तेथे, डॉ. एन. एस. ख्रिश्चन आणि एम. एन. देशपांडे हेही उपस्थित होते. डॉ. ख्रिश्चन यांना स्वप्नात गुरुदेव दिसले होते आणि म्हणून ते प्रथमच दर्शनाला आले होते. गुरुदेव त्यांना जसे स्वप्नात दिसले, तसेच त्यांना निंबाळला दिसले. औरंगाबादचा एवढा मोठा डॉक्टर, पण येथे साळसूदपणे, नम्रपणे हात जोडून बसला होता. रामभाऊ सिटींगमध्ये, नेहमीप्रमाणे कार्यक्रम चालू आहेत, हे पाहत होते. शेवटी डॉक्टरांची पाळी आली. त्यांनी कोणत्याही भाषेत पद म्हणावे असे सांगण्यात आले. त्या दिवशी ते मनाच्या वेगळ्याच पातळीवर होते. ते त्या भक्तियुक्त वातावरणात अत्यंत भावपूर्णतेने गाऊ

लागले. गाऊ लागताच एका पाठोपाठ एक हुंदके आणि त्यांची अवस्था थेट उन्मनीत गेल्यासारखी होऊ लागली. बसलेल्या अवस्थेतील डॉक्टर एकदम जमिनीवर पडू लागले. तेवढ्यात रामभाऊंनी आपली मांडी त्यांना देऊन, मांडीवर त्यांचे डोके ठेवले. त्यांनी म्हटले, "डॉक्टर, शांत व्हा, शांत व्हा !" तेवढ्यात दातारांनी पाणी आणले व डॉक्टरांच्या तोंडावर शिंपडले. डॉक्टर भानावर आले. आम्ही काहीजणांनी डॉक्टरांना खोलीत नेऊन अंथरुणावर झोपवले. मी चक्रधरांचे लीलासूत्र म्हटले. त्या दिवशी डॉ. शं. गो. तुळपुळेही तेथे होते. त्यांनी म्हटले, "खरोखर, जे घडले, ते अगदी शब्दातीत आहे. मी इतकी वर्षे निंबाळला येतोय; पण आजचा प्रसंग अगदी अभुतपूर्व होता खरा !"

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## १८. बुद्धिमंतांना प्रोत्साहन

**प्रा. ए. सी. बोस**
**धारवाड**

श्री गुरुदेव रानडे यांचे व्याख्यान ऐकण्याची संधी मला एकदा राजाराम कॉलेज हॉल, कोल्हापूर येथे मिळाली आणि त्यानंतर बहुतेक दरवर्षी मी अलाहाबादला जात राहिलो. 'भारतीय संस्कृती आणि धर्म' यावरील लेखनात त्यांनी मला मोलाचे साहाय्य केले. १९३६ मध्ये डब्लिनला 'मिस्टीसिझम इन पोएट्री'च्या (संदर्भ व उदाहरणे - W. B. Yeats, A. E. and Ravindranath Tagore) संशोधन कार्यासाठी जाण्यापूर्वी प्रा. रानडे यांनी 'Constructive Survey of Upanishadic Philosophy' ची एक प्रत श्री. डब्ल्यू. वी. यीटस् यांना अर्पण करण्याची इच्छा प्रदर्शित केली. मी ती मुंबईला नेऊन, आयरिश कवी यीटस् यांना अर्पण केली. जे. एम. होन (J. M. Hone) यांनी लिहिलेल्या यीटस् यांच्या चरित्रग्रंथात याचा संदर्भ आहे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## १९. नाम मिळणे काय एवढे सोपे आहे ?

**व्ही. जी. जमखंडी**
**धारवाड**

१९५४ च्या नोव्हेंबर महिन्यात एकदा श्री गुरुदेव रानडे धारवाडला, युनिव्हर्सिटीच्या निमंत्रणावरून आले होते. त्यांची व्याख्याने, "'पाथवे टू गॉड इन कन्नड लिटरेचर', यावर होती. या काळात श्री गुरुदेवांच्या सानिध्यात असण्याची दुर्मिळ संधी मला प्राप्त झाली. मी नुकतेच जुलैमध्ये नाम घेतले होते आणि मला गुरुदेवांची जीवन पद्धती तसेच नेमाविषयी काहीच माहिती नव्हती. तरी ज्येष्ठ साधकांकडून, गुरुदेव

कारमधून नेमाला जातात अशी माहिती मिळालेली होती. त्याप्रमाणे एक कार ते मागतील तेव्हा मिळावी या दृष्टीने तयार ठेवली होती.

पहिल्याच दिवशी धारवाडला आल्याबरोबर त्यांनी सकाळी सव्वा अकरा वाजता, नेमाला बाहेर जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी बरोबर भाऊराव निंबरगी या साधकास घेण्यास सांगितले आणि त्यांना सोबत म्हणून मलाही बोलावले. गुरुदेव मागच्या सीटवर उजव्या बाजूला व मी डाव्या बाजूला बसलो आणि भाऊराव कारमध्ये पुढच्या सीटवर बसले. बेळगाव रस्त्याला मैलभर गाडी गेल्यानंतर, गुरुदेवांनी एकदम थांबण्यास सांगितले. ते वाटेमध्येसुद्धा ड्रायव्हरला भराभर डावी उजवीकडे वळण्यास, तसेच अचानक थांबण्यास सांगत. फक्त तरबेज ड्रायव्हरच त्यांच्या सूचनांचे पालन करू शकेल. एकदा तर असे झाले की त्यांनी एका मार्गावर कार नेमासाठी थांबविली. पण वाटेतच कार थांबली होती तरी त्यांचा नेम होईपर्यंत त्या वाटेने कोणतेही वाहन आले नाही. बेळगाव रस्त्यावर कार थांबवून गुरुदेवांनी ड्रायव्हर व निंबरगीला उतरण्यास सांगितले आणि मला मात्र त्यांच्याबरोबर नेमास बसण्यास सांगितले. केवळ दोनतीन फूटांवर गुरुदेवांजवळ नेमाला बसायला मिळणे ही केवळ अपूर्व संधी होती. पण 'खरा नेम' त्या वेळेपर्यंत माहीत कोठे होता ? मला त्यानंतर 'न भूतो न भविष्यति' असे दृश्य पहावयास मिळाले. श्री गुरुदेव 'नारायण नारायण' असे सद्‌गुरूंनी दिलेले नाम मोठ्याने म्हणत असल्याचे व नंतर मिनिटभरातच उन्मनी अवस्थेत जात असल्याचे पाहण्याचे सद्‌भाग्य मला लाभले. मी त्या दृश्याने अक्षरशः भारावून गेलो. मी त्या वेळेपर्यंत फक्त रामकृष्ण परमहंसांसारखे संत 'समाधी' अवस्थेत जातात इत्यादी वाचले होते. पण येथे श्री गुरुदेवांना प्रत्यक्ष 'समाधी'त जाताना पाहण्याचा सुवर्णयोग लाभला. जवळ जवळ वीस मिनिटांनी गुरुदेवांनी डोळे उघडले आणि म्हणाले, "फार चांगला नेम झाला." मग त्यांनी ड्रायव्हरला बोलावण्यास सांगितले आणि परत जायचे म्हणाले. वाटेत गाडीत त्यांनी भाऊराव निंबरगीला पद म्हणण्यास सांगितले आणि मला आश्चर्य वाटले की, पुरंदरदासांच्या त्या पदात (सुम्मने दोरकुवदे रामन दिव्यनामवु), माझे नाम ही होते, तसेच नाम मिळणे ही काही सामान्य गोष्ट नव्हे, हे कथित केले होते. पद संपेपर्यंत आम्ही घरी पोहोचलो.

या सर्व घटनेचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. मी काही सर्वच गोष्टींचे स्पष्टीकरण करू शकत नाही. पण त्या दिवशी श्री गुरुदेवांच्या कृपेने मला, स्वतः सद्‌गुरू, नामाच्या दिव्यशक्तीने प्रत्यक्ष समाधी अवस्थेत कसे जातात, याचे जणू प्रात्यक्षिकच पाहण्याचे सद्‌भाग्य लाभले. तसेच त्यानंतर गायले गेलेल्या पुरंदरदासांच्या पदातून श्री गुरुदेवांनी नामाची शक्ती किती दिव्य आहे, याचे जणू अप्रत्यक्षपणे कथन केले. या सर्व गोष्टींचा माझ्यावर इतका खोलवर ठसा उमटला की, पुढील जीवनात तो माझ्या जीवनाचा अविभाज्य अंगच बनला आहे.

## २०. केवळ नामस्मरणानेच दिव्य आनंद प्राप्त होईल.

श्री. बी. डी. गोडबोले
मुंबई

माझ्या आध्यात्मिक वृत्तीचे निरीक्षण करून माझे स्नेही, श्री. गोपाळराव आसंदी, श्री गुरुदेवांचे वर्गमित्र, एकदा म्हणाले की, इंचगिरीला जाऊन या. त्यांनी गुरुदेवांना देण्यासाठी एक पत्रही दिले. १९२६ च्या जानेवारीत मी निंबाळला पोहोचलो आणि गुरुदेवांच्या सूचनेप्रमाणे पायी इंचगिरीला निघालो. तेथे मी श्री अंबुराव महाराजांना भेटलो. त्यांच्याबरोबर थोडे दिवस राहिलो. मुख्य दरवाज्याजवळच्या दगडी चौथऱ्यावर मी झोपत असे. बाबा मला दासबोध, गीता व मनाचे श्लोक वाचावयास सांगत. एक दिवस बाबा म्हणाले, "मी तुम्हाला नाम देणार नाही." त्यावर मी म्हणालो, "मग नाम मिळेपर्यंत मी धारवाडला जाणार नाही."

एकदा पहाटे पाच वाजता, भाऊसाहेब महाराज घोड्यावर बसून आलेले स्वप्नात दिसले. त्यांनी घोडा तेथील कडुनिंबाच्या झाडाला बांधला. मी उठलो आणि त्यांना वाकून नमस्कार केला. लगेच ते अदृश्य झाले. मला असे स्वप्न पडल्याने खूप आनंद झाला. सकाळ झाल्याबरोबर बाबा बाहेर आले आणि म्हणाले, "बळवंतराव, आज तुम्हाला भाऊसाहेब महाराजांचे दर्शन झाले; त्यामुळे आज मी तुम्हाला नाम देईन." मला बाबांचे शब्द ऐकून आश्चर्यच वाटले. मी बाबांना विचारले, "महाराज पांढऱ्या घोड्यावर बसत असत का ? आश्रमात लिंबाचे झाड असायचे का ? महाराज ठिपक्या ठिपक्यांचा डिझाईनचा फेटा वापरत का ?" बाबा या सर्व प्रश्नांच्या उत्तरादाखल 'हो' म्हणाले. तो गुरुवार होता. मी अंघोळ करून बाबांना वाकून नमस्कार केला. ते म्हणाले, "माझ्या सद्गुरूंनी तुम्हाला नाम दिले आहे; मी फक्त निमित्तमात्र आहे." अशा रीतीने बाबा अहंकारापासून अगदी अलिप्त होते. मी बाबांची पाठ चोळून देऊन त्यांना अंघोळीला पाणी दिले आहे. तसेच त्यांची सुपारी कुटून दिली आहे. नंतर मी आणि बाबा विजापूर, होटगी, सोलापूर, गदग, कुंदगोळ आणि हुबळी मार्गे धारवाडला आलो. आम्ही धारवाडला पोहोचलो आणि टांग्याने घरी येण्यास निघालो. "बळवंतराव, मी तुमच्या पत्नीला नाम दिले आहे हे तुम्हास माहीत आहे का ?" मला बाबांनी विचारले. मी नकारात्मक उत्तर दिले. आम्ही घरी पोहोचतास बाबांनी माझ्या पत्नीला बोलावून विचारले, "तुम्हाला नाम मिळाले आहे ना ?" ती म्हणाली 'होय' "कोणाकडून?" "तुमच्याकडूनच, बाबा." "कोठे?" 'बेळगावला' "तुमचे तेव्हा लग्न झाले होते का ?" 'नाही' मी हे संभाषण ऐकून थक्कच झालो. बाबांना कसे माहीत होते की त्यांनी ज्या बाईला नाम दिले होते, ती माझी बायको होती. हे कळणे माझ्या बुद्धीच्या पलीकडचे होते.

एकदा आम्ही धारवाडच्या प्रसिद्ध दत्तमंदिरात गेलो. बाबांनी सांगितले की, त्यांना गाभाऱ्यात स्वच्छ प्रकाशाशिवाय दुसरे काही दिसले नाही. बाबा काय म्हणत आहेत हे कळण्याइतपत माझी आध्यात्मिक प्रगती तेव्हा झाली नव्हती. पुष्कळ वर्षांनी १९७० च्या फेब्रुवारीत, मी पावसला गेलो होतो. तेथे श्री स्वरूपानंदांचे दर्शन घेतले. मी त्यांना त्यांच्या समवेत ध्यानाला बसण्याची परवानगी मागितली. तेवढ्यात स्वामीजी तुर्यावस्थेत (trance) गेले. मी बाहेर आलो आणि वाट पाहत थांबलो. अर्ध्या तासाने ते भानावर आले आणि त्यांनी माझ्याकडे पाहून मला आत बोलावले. मला त्यांच्यासह, जवळ ध्यानाला बसण्यास सांगितले. मी बसलो. आम्ही दोघेच खोलीत होतो. काही वेळाने माझे डोळे आपोआप उघडले आणि मला खोलीत स्वच्छ चंद्रप्रकाशाशिवाय काहीही दिसले नाही. स्वामीजी सुद्धा नाही. काही वेळानंतर त्यांची सस्मित मुद्रा मला दिसली. तेव्हा मला बाबांची आठवण झाली.

गुरुदेव ६ जून १९५७ मध्ये समाधिस्थ झाले. १९६१ च्या डिसेंबरमध्ये मी धारवाडला रहात असताना, पहाटे स्वप्नात गुरुदेव माझ्या घरी येत आहेत असे दिसले. "तुम्ही म्हणता ना येत नाही म्हणून, म्हणून मी आलोय." त्यांच्या एका हातात इंग्रजी पुस्तक होते आणि दुसऱ्या हातात तुळशीचे रोप होते. ते कॉटवर पडून मोठ्याने वाचू लागले. मी विचारले, "काय वाचताय ?" त्यांनी मला जवळ बोलावून म्हटले, "आजकाल भाषणे करता की नाही ?" मी म्हणालो, "कधी कधी". ते म्हणाले, "असल्या गोष्टीत सापडू नका. त्यामुळे अहंकार वाढतो आणि आध्यात्मिक प्रगतीत त्याचा अडसर येतो. भक्तीने आणि श्रद्धेने रोज नेम करा. फक्त नेमानेच दिव्य आनंद प्राप्त होऊ शकेल." त्या वेळेपासून गुरुदेवांच्या कृपेने माझा नेम नियमित चालू आहे आणि मी अगदी आनंदात आहे.

## २१. गुरू कोणाला म्हणावे ?

**श्री. एम्. एल. वैकुंठे**

१९५२ मध्ये श्री गुरुदेवांची माहिती होऊन, त्यांच्या दर्शनासाठी मी निंबाळला गेलो. त्या वेळेपर्यंत मला उपदेश मिळाला नव्हता आणि गुरुपरंपरा इत्यादींच्या मी विरुद्ध होतो. गुरुदेवांचे शिष्य जेव्हा गुरुमहात्म्याची पदे म्हणत, तेव्हा ते मला पसंत पडत नव्हते. कारण गुरूच्या योग्यतेबद्दल माझ्या मनात काही शंका असायच्या. अशा शंका मनात घेऊन असतानाच, अचानक सिटींगची घंटा वाजली आणि आश्चर्य म्हणजे, त्या दिवशी श्री गुरुदेवांनी गुरूच्या योग्यतेबद्दल व सद्‌गुरूंच्या लक्षणांवरच प्रवचन केले. त्यात त्यांनी

पुढील मुद्दे मांडले -

१. गुरूला स्वतःला आत्मसाक्षात्कार झाला असला पाहिजे आणि शास्त्रात त्याची सूक्ष्म व खोल अभ्यासू दृष्टी असली पाहिजे.

२. खऱ्या गुरूला शिष्याकडून काहीही अपेक्षा नसते. तो सतत शिष्याचे हितच चिंतीत असतो.

३. गुरूचे व्यक्तिगत जीवन अत्यंत उच्च पातळीवरचे असते.

४. गुरू हा देवाप्रमाणेच सर्वव्यापी असून, सदैव त्याच्या शिष्यांच्यामागे त्यांचे पारमार्थिक कल्याण करण्यासाठी उभा असतो.

श्री रानडे महाराजांचे हे प्रवचन ऐकताच मी लगेच त्यांच्याकडून उपदेश घेण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळी मला सद्भाग्याने नाम मिळाले. दुपारी गुरुदेवांसह इतर साधक नेमाला बसले होते. अचानक विजेचा लोळ त्या जागेवर पडला आणि जवळ जवळ साधकांच्या डोक्याला वीज चाटूनच गेली. पण इतका प्रकार होऊनही सर्व साधक शांतपणे साधन करीत बसले होते. एका तासानंतर गुरुदेव ध्यानातून उठले आणि त्यांनी सहज काय घडले ते विचारले आणि त्यांनी घरावर विद्युत-निवारक बसविण्यास सांगितले. ते घडलेल्या प्रसंगाने थोडेही विचलीत झालेले दिसले नाहीत.

गुरुदेव, साधकांना जे जेवण दिले जायचे त्याकडे दृष्टिक्षेप टाकत व मगच ते प्रसाद म्हणून सर्वांना दिले जायचे. ते स्वतः: अतिशय कमी जेवत. भरपूर जेवून नेम कसा होणार ? असे ते म्हणत असत.

त्या काळात प्रथम सब-डिव्हिजनल ऑफिसर आणि सेक्रेटरी म्हणून काम केल्यानंतर, माझी नेमणूक तहसीलदार या खालच्या पदावर केली गेली होती. मी आश्रमाचा निरोप घेण्याच्या वेळी गुरुदेवांनी आपण होऊन विचारले, "पुन्हा एस.डी.ओ. कधी होणार ?" मी काय उत्तर देणार ? पण मी आश्रमातून परत गेल्यानंतर लगेचच माझी नेमणूक एस.डी.ओ. म्हणून झाल्याचे पत्र अनपेक्षितपणे आले. गुरुदेवांच्या कृपेने आज देखील माझे सर्व प्रॉब्लेम सहजगत्या सुटतात. मी असिस्टंट कलेक्टर होऊनही मला कोणत्याच गोष्टीची चिंता किंवा ताण नसतो. हे सर्व गुरुदेव पाठीशी असतात, याची खात्री असल्याने होते. माझी पूर्ण श्रद्धा आहे की, गुरुदेव मला भगवंताचे प्रेमही देतील आणि त्यांच्याच कृपेने मी परमेश्वराप्रत एक दिवस पावेन.

# २२. सद्गुरू ऐहिक आणि पारमार्थिक क्षेत्रात कल्याण करतात.

डॉ. बी. आर. मोडक
धारवाड

१९५२ मध्ये श्री गुरुदेवांना मी प्रथम निंबाळला भेटलो. तत्पूर्वी, त्यांची पुस्तके वाचली होती व बरेच ऐकले होते. पण प्रत्यक्ष दर्शनाचा योग आला नव्हता. मी संस्कृत घेऊन कर्नाटक युनिव्हर्सिटीत फर्स्टक्लास फर्स्ट आल्याचे ऐकून गुरुदेवांना फार आनंद झाला. त्यांनी मला 'सिटींग'मध्ये एक पद म्हणण्यास सांगितले होते व मी, ईश्वरचरणी भक्ताची निस्सीम भक्ती कशी असावी, अशा भावाचे पद म्हटले होते.

पुढील वर्षी जेव्हा मी पुन्हा निंबाळला गेलो, तेव्हा गुरुदेवांनी त्यांच्या खोलीत बोलावून घेतले आणि चहा दिला. त्यांनी 'Vedanta as the culmination of Indian Thought' या पुस्तकाची तयार होत असलेली 'सिनॉप्सिस'ची फाईल पाहण्यास दिली. तेवढ्यात तेथे एक वृद्ध साधक आले आणि म्हणाले, "सौ. ला बरे वाटत नाही." गुरुदेव म्हणाले, "या सहा गोळ्या द्या." गुरुदेवांनी बाटलीतून गोळ्या हातावर घेतल्या. त्या बरोबर सहाच होत्या. मला गुरुदेव औषधही देतात हे माहीत नव्हते.

एकदा गुरुदेव मला म्हणाले, "तुम्ही आज भगवद्गीतेवर बोला." मी अर्धा तास बोललो असेन तेवढ्यात कोणीतरी खास व्यक्ती आली. मी त्याच रात्री पुण्याला जाणार होतो; पण गुरुदेवांनी दुसऱ्या दिवशी राहिलेला भाग पूर्ण करून जाण्याची आज्ञा केली. दुसऱ्या दिवशी काही कारणाने 'सिटींग' झाले नाही; त्यामुळे तिसऱ्या दिवशी मला माझे राहिलेले प्रवचन करावे लागले. मी गीतेचे रामानुज, मध्व, वल्लभ इ. पंडितांनी केलेले अनेक अर्थ स्पष्ट करून सांगितले.

श्री गुरुदेवांच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल, जमखंडीला १९५६ मध्ये, अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. रामतीर्थावर, गणपती मंदिरात, श्री गुरुदेवांच्या दर्शनासाठी देशाच्या विविध भागातून लोक आले होते. गुरुदेवांनी सर्वांना बसवून घेतले व श्री भाऊसाहेब महाराजांच्या आठवणी सांगण्यास एका साधकास सांगितले; त्या साधकाने सांगितलेला भाग पुढील प्रमाणे -

'एकदा एक साधक श्री महाराजांकडे आला आणि म्हणाला की, लग्न होऊन बरीच वर्षे झाली तरी त्याला मूलबाळ झाले नव्हते. महाराजांनी त्याला गूळ, मुगाचे पीठ आणि तूप समप्रमाणात घेऊन त्याचे लाडू करून खा आणि सहा महिने आश्रमातच रात्री झोपत जा, असे सांगितले. त्या साधकाने महाराजांनी सांगितल्याप्रमाणे केले आणि त्याला कालांतराने मूल झाले."

अशा रीतीने सद्गुरू शिष्याचे पारमार्थिक कल्याण तर करतोच, पण त्यावरोबरच साधकाच्या ऐहिक जीवनातील कल्याणाकडेही त्यांचा कृपाशिर्वाद लाभतो.

गुरू हा घाली ज्ञानांजन, गुरू हा दाखवी निजधन ।
गुरू हा सौभाग्य देऊन, स्वात्मबोध नांदवी ।।

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## २३. डॉ. राधाकृष्णन यांची श्री गुरुदेवांना आदरांजली

१९२५ मध्ये मी प्रथम श्री गुरुदेव रानडे यांना भेटलो. (कलकत्ता येथे Indian Philosophical Congress च्या प्रसंगी) तेव्हापासूनच मला त्यांचा सहवास अत्यंत प्रेमळ वाटला. त्यांची साधी राहणी, एकाग्रता, प्रेमळ वागणूक, लाघवी स्वभाव या सर्वांचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला.

पुणे, सांगली आणि अलाहाबाद येथे बरीच वर्षे त्यांनी 'तत्त्वज्ञान' या विषयावर ज्ञानदान केले. अर्थात तत्त्वज्ञान हा केवळ त्यांच्या शिकवण्याचा विषय नव्हता तर, ते त्यांचे जीवनाचे अंग होते. त्यामुळे त्यांचे ज्ञानदान केवळ बुद्धीद्वारा होत नसून, त्यांचे आयुष्य, त्यांचे संपूर्ण जीवन हे त्या ज्ञानदानाचे माध्यम होते.

श्री गुरुदेवांकडे अनेक भाषांतील ज्ञानभांडार होते. त्यांचे इंग्रजीवर तर प्रभुत्व होतेच, शिवाय ग्रीक आणि जर्मन भाषाही त्यांना अवगत होत्या आणि हिंदी, मराठी व कन्नड या तीन भाषांमध्येही ते पारंगत होते. त्यांनी मराठी, हिंदी आणि कन्नड साहित्यातील साक्षात्कार मार्गावर अत्यंत बहुमोल विवेचन केले आहे. त्या विवेचनाने त्यांचे सखोल, अभ्यासू तत्त्वज्ञान सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचले आहे.

(डॉ. एस. राधाकृष्णन, त्यावेळचे भारताचे उपराष्ट्रपती, यांनी ५ जून १९६०, श्री गुरुदेवांच्या तिसऱ्या पुण्यतिथीला, कन्नड साहित्यातील साक्षात्कार मार्ग - Pathway to God in Kannada Literature चे प्रकाशन निंबाळला झाले, त्यावेळी पाठविलेल्या संदेशातील उतारा.)

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## २४. गुरुदेव मंदिर, बेळगावचे, डॉ. राधाकृष्णन यांचे हस्ते उद्घाटन

श्री गुरुदेवांना मी गेली चाळीस वर्षे महान साक्षात्कारी संत म्हणून ओळखतो आणि त्यांच्या सन्मानार्थ श्री गुरुदेव मंदिराचे उद्घाटन आज होत असताना, मला उपस्थित राहण्याचे सद्भाग्य मिळत आहे, त्याचा मला फार आनंद होत आहे. १९२० च्या सुमारास

मी त्यांना भेटलो आणि ते अलाहाबाद युनिव्हर्सिटीत असताना तर त्यांचे महान कार्य झाले आहेच. पण त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे, श्री रानडे यांचे संपूर्ण जीवन नामस्मरणाने व्यापले होते. त्यांनी परमेश्वराला प्रत्यक्ष पाहिले, सत-तत्त्वाची त्यांची प्रत्यक्ष अनुभूती होती व ते त्या तत्त्वाशी एकरूप झालेले होते. आपल्या उपनिषद्कालीन साधू-संतांनी म्हटल्याप्रमाणे, आपल्या स्वधर्मांचे परमोच्च शिखर, म्हणजेच, जीवनाचे अंतिम सत्य त्यांनी उकलून पाहिले. रानडे ही एक अशी व्यक्ती होती की, ज्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यभरच्या अथक परिश्रमाने, भावपूर्ण, सतत, निरंतर अभ्यासाने, प्रत्यक्ष ईश्वर दर्शन, आत्मसाक्षात्कार करवून घेतला. हीच त्यांच्या जीवनातील सर्वात महान कामगिरी, जीवनाची ध्येयपूर्ती होय. या गुरुदेव मंदिरात येणाऱ्या, राहणाऱ्या साधकांनी जर गुरुदेवांच्या जीवनातील हा संदेश घेतला, त्यांनी जर लक्षात घेतले की, धर्म ही काही बौद्धिक कसरत नसून, ती अनुभुतीची कक्षा आहे, तर त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक केले, असे म्हणता येईल. मी या संस्थेस शुभेच्छा चिंतीतो.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## २५. भविष्यकाळात डोकावले तर-

पद्मश्री काकासाहेब कारखानीस
विजापूर

१९१५ मध्ये पुढील घटना घडली. मी तेव्हा डेक्कन कॉलेजमध्ये शिकत होतो. माझे सर्वात वडीलबंधू, बाळकृष्ण गोविंद उर्फ आण्णासाहेब कारखानीस (एल. एम. अँड एस.) हे तेव्हा जमखंडीला मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरी करत होते. एकदा ते जमखंडीचे राजेसाहेब श्रीमंत भाऊसाहेब यांच्याबरोबर मुंबईला गेले होते. ते मुंबईहून परत जाताना मी त्यांना पुणे रेल्वे स्टेशनवर भेटणार होतो. आमच्या बंधुंनी श्री देव्हारे या फोटोग्राफरने काढलेल्या श्री भाऊसाहेब महाराजांच्या छायाचित्राच्या दोन प्रती माझ्या हातात दिल्या आणि एक प्रत श्री रामभाऊ (गुरुदेव रानडे) यांना देण्यास सांगून, एक प्रत मी स्वतःजवळ ठेवावी, असे सांगितले. मी कॉलेजला गेलो आणि नंतर बरीच रात्र झाली म्हणून दुसऱ्या दिवशी महाराजांचा फोटो श्री रामभाऊंना दिला. ते तेव्हा हस्तलिखित ग्रंथालयाचे लायब्ररीयन म्हणून काम पाहत होते आणि डेक्कन कॉलेजच्या, पूर्व कक्षेत राहत होते. मी जेव्हा रामभाऊंना फोटोची एक कॉपी दिली आणि भावाने एक फोटो तुम्हाला आणि एक मला दिला आहे असे सांगितले, तेव्हा ते म्हणाले, "मला काल रात्रीच माझ्यासाठी फोटो पाठवण्यात आल्याचे समजले होते."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## २६. भूतकाळ आणि भविष्यकाळ - दोहोंचे ज्ञान

पद्मश्री काकासाहेब कारखानीस
विजापूर

गुरुदेवांनी एकदा मला त्यांचा एक अनुभव सांगितला. तो असा -

"मी जेव्हा साधनेत प्रगतिपथावर होतो, तेव्हा अशी अवस्था आली की, माझ्यासमोर बसलेल्या व्यक्तीचे भूत व भविष्य मला दिसू लागले. त्यामुळे अस्वस्थ होऊन मी महाराजांना विनंती केली की, या रिद्धी-सिद्धी मला नकोत. भक्तीशिवाय दुसरे काही नको; म्हणून हे सर्व बंद करा. या विनंतीनंतर ते सर्व दिसणे बंद झाले. या सर्व घटना १९१५ पूर्वी गुरुदेवांच्या जीवनात घडल्या. त्यांनी नामस्मरणाशिवाय एक श्वासदेखील फुकट दवडला नाही. यावरून त्यांनी किती अध्यात्मशक्ती मिळविली असेल, याची कल्पनाच केलेली बरी !

१९२२ च्या नोव्हें-डिसेंबरमध्ये मी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेत असताना, चिंचवडच्या स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळेचा प्रमुख होतो. मला चार महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. मी तुरुंगात जाण्यापूर्वी बरीच पत्रे लिहिली. त्यातील एक श्री गुरुदेवांना लिहिलं होते. ते त्यावेळी निंबाळ गावातील भाऊराव नाडगौडा यांच्या घरात राहत होते. मी तुरुंगातून सुटल्यावर आळंदीला जाऊन श्री ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेतले आणि मग विजापूरकडे प्रस्थान केले. वाटेत निंबाळला मी श्री गुरुदेवांचे दर्शन घेतले. त्यांनी सांगितले की, मला शिक्षा होण्यापूर्वीच त्यांना मी संकटात सापडणार (तुरुंगात जाण्याच्या) आहे, हे माहीत होते आणि त्यांनी तसे कृष्णराव गजेंद्रगडकर व जगन्नाथ लेले यांना सांगितले होते. मी विचारले, "तुम्हाला ते कसे समजले ?" त्यांनी उत्तर दिले, "मी नेमात असताना, गणपतराव, गणपतराव, असे शब्द झाले, म्हणून मला वाटले की तुम्ही संकटात असाल. नंतर तुमचे पत्र आले की तुम्हाला चार महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## २७. दुसऱ्यांच्या मनात डोकावणे.

डॉ. एस. एन. एल श्रीवास्तव

तत्त्वज्ञानाच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी जेव्हा मी अलाहाबाद युनिव्हर्सिटीत दाखल झालो, तेव्हा मी प्रा. रानडे यांना भेटण्यासाठी गेलो. त्यांना हात जोडून वंदन केले व त्यांनी वंदनानेच प्रत्युत्तर दिले. त्यांच्या चेहऱ्यावर माझ्या भेटण्याने आनंद झाल्याचे दिसत होते.

नंतर मला कळले की मी भेटावे असे त्यांना मनापासून वाटतच होते. एक दिवस आमच्या विभागाचा जोगी नावाचा शिपाई मला म्हणाला, "साहेब तुमच्यावर खूप खूष आहेत. घरी जाऊन भेटलात तर त्यांना फारच आनंद होईल." त्याच्या सांगण्याने मला बळ आले आणि मी गुरुदेवांना भेटायला त्यांच्या घरी गेलो. मला निरखून पाहात गुरुदेव जवळ उभे असलेल्यांना म्हणाले, "हे फक्त प्रखर बुद्धिवादीच नाहीत, पण काहीतरी त्यापेक्षा जास्त आहेत." याचा अर्थ मी केवळ शब्दपंडित नाही, तर माझी परमार्थातही थोडीफार गती आहे. या त्यांच्या वाक्याने गुरुदेवांकडे दुसऱ्यांच्या मनात डोकावून, त्यांचे व्यक्तिमत्व उलगडून दाखविण्याची शक्ती होती हे मला प्रथमच समजले. दुसरी अशीच एक घटना घडली. १९४० मध्ये माझे वडील गेले. हिंदू धर्माच्या रिवाजाप्रमाणे मी मुंडण केले होते. श्राद्धविधीसाठी मी अलाहाबादला गेलो होतो. मी त्याही वेळी प्रा. रानडे यांना भेटण्यासाठी गेलो. "तुम्ही स्वामी विवेकानंदांचे चाहते आहात आणि आता तर त्यांच्यासारखेच तुम्ही दिसूही लागलात." मी हे ऐकून थक्कच झालो. कारण बालपणापासूनच मी स्वामी विवेकानंदांचा चाहता असून (आताही आहे), मी तसे श्री गुरुदेवांना कधीच सांगितले नव्हते, तरी त्यांनी ते कसे बरे ओळखले ?

## २८. "जगाचे भवितव्य तत्त्ववेत्त्यांच्या आधारानेच घडते."

**डॉ. एस. एन. एल श्रीवास्तव**

प्रा. रानडे, डिसेंबर १९३७ च्या नागपूर येथे भरलेल्या, Indian Philosophical Congress चे तेरावे अध्यक्ष होते. प्रा. रानडे अध्यक्ष असल्याने मी फारच उत्साहाने त्या अधिवेशनात भाग घेतला. डॉ. राधाकृष्णन हे सुद्धा अधिवेशनाला उपस्थित होते. डॉ. रानडे व डॉ. राधाकृष्णन, नागपूर हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री. एम. बी. नियोगी, यांच्याकडे उतरले होते. मी नागपूरला पोहोचताच, प्रथम श्री. नियोगी यांच्या निवासस्थानी प्रा. रानडे यांना भेटलो. मी जवळ जवळ तासभर विविध विषयांवर बोलत बसलो. नंतर अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून प्रा. रानडे यांचे भाषण होण्याची वेळ जवळ येत चालली म्हणून मी उठलो. मी अधिवेशनाच्या ठिकाणी गेलो. अधिवेशनाचे उद्घाटन Sir Hyde Goween, त्या वेळचे मध्यप्रदेशाचे गव्हर्नर, यांच्या हस्ते होणार होते. स्वागतपर भाषण नागपूर विद्यापीठाचे तेव्हाचे उप-कुलगुरू, सर हरिसिंग गौर यांचे झाले आणि त्यानंतर प्रा. रानडे यांचे अमोघ शैलीमधील अध्यक्षीय भाषण झाले. रानडे यांच्या वक्तृत्वाने, सर्वजण तत्त्वज्ञान क्षेत्रात, फिजिक्स, बायॉलॉजी व न्यूरॉलॉजी यांचे उपयोजन समजावून घेऊन, आश्चर्य चकित झाले. प्रा. रानडे यांच्या भाषणाचा सारांश डॉ. सी. डी.

देशमुख, मॉरिस कॉलेज, नागपूर यांच्याकडून 'रिव्ह्यू ऑफ फिलॉसॉफी अँड रिलिजन' (Vol: VII, 2 Dec 1938) मध्ये प्रसिद्ध झाला. सर हरि सिंग गौर यांनी आपल्या भाषणात, तत्त्वज्ञानाचा प्रांत अतिशय कठीण व अडथळ्यांनी भरलेला असल्याचे प्रतिपादले. त्यांना रानडे यांनी तात्काळ चोख उत्तर दिले - "I beg to submit that the kernel of philosophy is not the difficulties or the obscurantisms, but a metaphysical and moral pith, which constitutes the essence of all philosophy whatsoever."

दुसऱ्या दिवशी मी नियोगी यांच्या निवासस्थानी डॉ. रानडे व डॉ. राधाकृष्णन एकत्र असताना, त्यांना भेटण्यासाठी गेलो. डॉ. रानडे यांनी माझा डॉ. राधाकृष्णन यांच्याशी परिचय करून दिला व एखादे भक्तिपर पद म्हणण्यास सांगितले. मी जरा त्यामुळे कुचकळ्यातच पडलो. म्हणून मी म्हटले, "माझा आवाज काही तितकासा चांगला नाही. शिवाय मला या घटकेला पद आठवत नाही." असे म्हणताच डॉ. रानडे यांनी, 'आश्रम भजनावली' (गांधी आश्रमातील भजनांचे पुस्तक) हे पुस्तक माझ्या हातात देत म्हटले, "यातील एखादे भजन म्हणा," मग मी त्यातील एक भजन म्हटले. डॉ. रानडे व डॉ. राधाकृष्णन दोघांनाही भजन आवडले.

त्याच दिवशी डॉ. राधाकृष्णन यांचे "The Future of Religion' या विषयावर 'इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस तर्फे व्याख्यान होते, म्हणून ते तयारी करू लागले. ते डॉ. रानडे यांच्यासारखे उत्स्फूर्त भाषण देणार नव्हते. त्यांनी ब्रीफकेस मधून काही कागद काढून पाहण्यास सुरुवात केली. मी डॉ. राधाकृष्णन यांचे भाषण ऐकले. उत्कृष्ट भाषण ऐकले. डॉ. रानडे यांनी अध्यक्षीय भाषण केले; त्यानंतर मात्र डॉ. रानडे कोणत्याही कार्यक्रमास न जाता नेम करीत राहिले.

❊❊❊❊❊❊❊❊❊❊❊

## २९. प्रा. कांटच्या पलीकडे

**डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव**

प्रा. रानडे दुसऱ्याची स्तुती मुक्त कंठाने करीत असत. मी जीवनात अत्यंत वक्तशीर असल्याचे पाहून, त्यांनी मला Meta-Kant (मेटा-कांट) असे नाव ठेवले होते. ते नेहमी उत्तेजनपरच शब्द बोलत आणि कधीच निरुत्साह करणारे शब्द वापरत नसत. हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजन देताना तर ते म्हणत, "शाब्बास, चला पुढे. तुमच्यात आणि माझ्यात फारसा फरक नाही. फक्त मी तुमच्यापेक्षा चार पुस्तके जास्त वाचली असतील एवढेच !" खरोखर थक्क व्हावेत असेच हे शब्द नाहीत का ?

एकदा मी त्यांना भेटल्यावर कबीरांचे एक पद मी म्हटले. त्यावर प्रा. रानडे म्हणाले, "तुम्ही घरी गेल्यावर कबीरांची काही पदे त्याच्या इंग्रजी भाषांतरासह पाठवा," मी तसे केल्यावर त्यांचे आभारदर्शक पत्र आलेच व आणखीही तशी पदे पाठवण्यास लिहिले. मी अनेकवेळा तशी पदे पाठविली. नंतर एकदा त्यांच्या प्रत्यक्ष भेटीत ते म्हणाले, "तुम्ही माझ्यामध्ये हिंदी मिस्टीसिझमबद्दल कुतूहल व आकर्षण जागृत केले आहे. मी आता यावर पुस्तक लिहिण्यासाठी योजना करत आहे.

## ३०. देवदूताचे व्यक्तिमत्व

**डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव**

जे जे डॉ. रानडे यांच्या सान्निध्यात आले, ते ते त्यांच्या जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांना कधीच विसरणे शक्य नाही. एखाद्या देवदूतासारखे आनंद, शांती आणि आध्यात्मिक प्रकाश यांची पखरण ते सतत करीत असत. त्यांच्या अंतरंगातील तेज - ब्रह्मानंद - याचे प्रतिबिंब त्यांच्या चेहऱ्यावर व ओठावर सतत दिसत असे. किरकोळ बाबीत गुंतून खट्टू झालेला गुरुदेवांचा चेहेरा मी कधीच पाहिला नाही. सर्वसामान्य जाती, धर्म अशांविषयी तर ते कधीच संकुचित वृत्ती ठेवीत नसत. त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्यांना, आपले व्यक्तिमत्व बहरून आले, असा निश्चित अनुभव आल्याखेरीज रहात नव्हता. ते अजातशत्रू होते. म्हणूनच त्यांच्या बाबतीत असे वाटते की, 'सर्वेषां यो सुहृद नित्या'.

## ३१. आत्यंतिक नम्रता....पराकोटीची नम्रता

**डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव**

पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे संशोधक विद्वान, कै. डॉ. पी. के. गोडे, हे डॉ. रानडे यांचे विद्यार्थी होते आणि त्यांनी एकदा डॉ. रानडे यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्याची परवानगी मागितली. तसे पत्र जेव्हा गुरुदेवांना वाचून दाखविण्यात आले, तेव्हा तत्काळ त्यांना पुढील उत्तर लिहिण्यास गुरुदेवांनी सांगितले -

"माझ्या साठाव्या वाढदिवसाचे निमित्ताने स्मरणिकेचे प्रकाशन करण्याची मुळीच गरज नाही. मी असे काहीच केलेले नाही की ज्यासाठी स्मरणिका काढावी. मी काही सूक्ष्मदर्शी प्राण्यापेक्षा जास्त महान नाही."

"मी डेक्कन कॉलेजमध्ये असताना, प्रा. श्रीखंडे यांना काय बोललो होतो,

आठवते ना ? 'उगवत्या सूर्याची स्तुती करणे म्हणजे त्याला शाप देण्यासारखे आहे'. तेच आजही सत्य आहे."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३२. चौरंगी व्यक्तिदर्शन

**व्ही. जी. अपसंगी**
**जमखंडी**

प्रा. रानडे फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना, एकदा त्यावेळचे व्हॉईसरॉय कॉलेजला भेट देण्यासाठी आले. फर्ग्युसनचे त्यावेळचे प्राचार्य रँग्लर परांजपे, यांच्या बाजूला चार प्राध्यापक होते. एक संस्कृतचे, एक इंग्रजीचे, एक तत्त्वज्ञानाचे व प्रा. रानडे. रँग्लर परांजपेनी व्हॉईसरॉय बरोबर परिचय करून देताना असे म्हटले, "आम्ही सर्वजण एकेका विषयाचे प्राध्यापक आहोत, पण प्रा. रानडे या एकाच व्यक्तीत तुम्हाला चारही विषयांचे प्राध्यापक एकत्र सामावलेले दिसतील."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३३. खऱ्या भारतीय तत्त्ववेत्त्याचे उदाहरण

**डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव**

जेव्हा डॉ. रानडे, १९२८ मध्ये नागपूरच्या, विश्वविद्यालय विस्तार विभागाच्या, भगवद्गीतेवरील व्याख्यानासाठी नागपूरला आले, तेव्हाच मी त्यांना प्रथम पाहिले आणि व्याख्यानही प्रथमच ऐकले. त्यावेळी मी अद्याप पदवीधरही नव्हतो. मी बी. ए., संस्कृत व तत्त्वज्ञान घेऊन करीत होतो. मला गुरुदेवांचे तत्त्वज्ञान समजणे कठीण गेले. पण त्यांच्या व्यक्तिमत्वाचा माझ्यावर प्रभाव पडला. मला अद्याप प्रा. रानडे यांनी व्याख्यानासाठी निवडलेला श्लोक आठवतो - अदृष्टं पूर्व हृषितोस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे । (xi.45) या श्लोकाचे विवरण करताना प्रा. रानडे म्हणाले, "जेव्हा साक्षात्कारी संतांना दिव्य दृष्टी लाभते, तेव्हा ते त्यांच्याच परमानंदात मग्न असतात. त्याचवेळी त्या सामर्थ्यांचे भयही त्याच्या मनात वसत असते. कारण त्यांना लोकांचे भूत-भविष्य जाणण्याचे योगसामर्थ्य, त्या दृष्टीमुळे प्राप्त होते."

डॉ. रानडे इतक्या ठामपणे मुद्दा मांडत होते की, त्यावरून त्यांना केवळ तात्त्विक ज्ञान होते असे नव्हे तर, ती त्यांची प्रत्यक्ष अनुभूती होती, असे जाणवत होते. त्यामुळे मला या गोष्टीचा परमानंद होत होता की, मी केवळ एका विद्वान गृहस्थाच्या सान्निध्यात

नव्हतो तर, एका महान साक्षात्कारी संताच्या सहवासातही होतो. मी तेव्हाच तत्त्वज्ञान विषय घेऊन, पदव्युत्तर शिक्षण अलाहाबाद विद्यापीठात घेण्याचे निश्चित केले. मी डॉ. रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली, १९३१-३२ व १९३२-३३ या काळात तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास केला. मी त्या काळात डॉ. रानडे यांच्या निकट सान्निध्यात आलो.

रानडे हे शिक्षकांचेही शिक्षक होते. विद्यार्थ्यांची क्षमता शोधून काढण्याचे त्यांचे एक वैयक्तिक तंत्र होते. तत्त्वज्ञान विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षणासाठी डॉ. रानडे यांच्या हाताखाली काम करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला ते स्वतःच्या निवडीचा एक तत्त्वज्ञानाची बैठक असलेला निबंध लिहिण्यास सांगत. मी मुंडकोपनिषदातील, The psychological basis of Advaitism' या शीर्षकाखाली लेख लिहिला. डॉ. रानडेंना तो वाचून अत्यंत आनंद झाला. त्यांनी विचारले, "तुझे वय काय ?" मी म्हणालो, "एकवीस." डॉ. रानडे म्हणाले, "नाही, तुझे वय बेचाळीस वर्षे आहे. तितक्या वयाच्या प्रगल्भ व्यक्तीने लेख लिहिल्यासारखा वाटतो." त्यांनी त्यावर नोट लिहून तो लगेच, 'वेदांत केसरी' मद्रास येथे प्रकाशित करण्यासाठी पाठविला. माझा तो पहिलाच प्रकाशित लेख होता.

एकदा मी त्यांच्याकडे, 'आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञान' या विषयावर पुस्तके विचारण्यासाठी गेलो. त्यांनी एक लांबलचक यादीच दिली; एवढेच नव्हे तर काही पुस्तकातील विशिष्ट प्रकरणांच्या नोंदी करून दिल्या. मी डॉ. रानडे यांच्या सखोल व प्रकांड पांडित्याने दिङ्मूढच झालो. त्यांचा दृष्टिकोन तर विश्वव्यापीच होता. ते जरी भारतीय तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक होते, तरी त्यांचा पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास तितकाच मूलगामी होता. ते नेहमीच पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाच्या तौलनिक अभ्यासाचे महत्त्व मानत.

डॉ. रानडे यांना तत्त्वज्ञान म्हणजे केवळ बौद्धिक कसरत नव्हती. पण ते नेहमी म्हणत की, तत्त्वज्ञान ही जगण्याची पद्धती आहे. त्यामुळे, 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे, डॉ. रानडे हे तत्त्वज्ञान केवळ अभ्यासत नसत तर, जगत असत. खऱ्या भारतीय तत्त्ववेत्त्याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३४. द्रौपदी घाटावर संध्याकाळचा नेम

**डॉ. एस. एन. एल. श्रीवास्तव**

गुरुदेव रानडे यांचे जीवन म्हणजे संपूर्णतः ध्यानाला (नेमाला) वाहून घेतलेले जीवन होते. म्हणूनच ते परमोच्च ध्यानयोगी होते. भगवद्गीतेतील पुढील श्लोकात जणू त्यांचेच वर्णन आहे.

**विविक्त सेवी लघ्वाशी यत् वाक्काय मानसः ।।**
**ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ।।xviii - 52**

दररोज संध्याकाळी गंगाकिनारी असलेल्या द्रौपदी घाट या एकांत स्थळी ते नेमाला जात. ते आम्हालाही बरोबर घेऊन जात. ठराविक ठिकाणी मोटारीतून पोहोचताच, मोटारीतील आम्हा सर्वांना ते उतरण्यास सांगत व पुन्हा मोटारीचा हॉर्न वाजेपर्यंत, काही अंतर चालून येण्यास सांगत. हा आमचा तेव्हाचा दिनक्रम असायचा.

अलाहाबादचा गुरुदेवांचा बंगला म्हणजे आम्हा सर्व तत्कालीन साधकांना तपोधाम होते. तेथे एकत्र येणाऱ्या सर्व साधकांच्या मनामध्ये, साक्षात्काराची ज्योत गुरुदेवांच्या आत्मस्फुल्लिंगाने पेटविली जाई. एका प्रसंगी गुरुदेव गांभीर्यपूर्वक सांगत होते, "आपण सर्वांनी आपले आयुष्य देवाने भरले पाहिजे." दुसऱ्या एका प्रसंगी, त्यांनी ठासून सांगितले, "आपण काळाच्या पाठीवर घट्ट पाय रोवून उभे राहिले पाहिजे." म्हणजेच आपण 'शाश्वत वर्तमानाच्या' कायम जाणिवेत राहिले पाहिजे.

डॉ. रानडे, सर्व अतिथींचे प्रेमपूर्वक स्वागत करीत असत. तसेच प्रत्येकाला आवर्जून चहा देत. ते स्वतःचा मोठेपणा कोणासमोर दाखवून देत नसत.

आता गुरुदेव आपल्यामध्ये देहरूपाने नाहीत, पण त्यांच्या उन्नत आध्यात्मिक जीवनाच्या स्मृती, आमच्या मनात सदैव ताज्या राहतील.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३५. मानवी स्वभावाचे अत्युत्कृष्ट दर्शन त्यांनी घडविले

**प्रो. जॉर्ज बी. बर्च**
**मेटफर्ड, मॅसॅच्युसेटस्**

(प्रो. बर्च हे मॅसॅच्युसेटस् येथे, टफ्टस् कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान शिकवितात. १९५३-५४ मध्ये ते सहकुटुंब भारतात आले होते. तेव्हा त्यांनी भारतीय तत्त्ववेत्त्यांचा अभ्यास करताना, प्रामुख्याने डॉ. रानडे यांच्या जीवनाचा अभ्यास, त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला.) हा लेख प्रथम Aryan Path मध्ये ऑगस्ट १९५९ मध्ये प्रसिद्ध झाला होता.

रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचा जन्म १८८६ मध्ये जमखंडी येथे झाला. त्यांच्या वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांना भाऊसाहेब महाराजांकडून नाम मिळाले. त्यांचे शिक्षण डेक्कन कॉलेज येथे झाले. त्यांनी गणित विषयात विशेष प्राविण्य संपादिले. क्लार्ककडून इंग्रजी, पाठकांच्याकडून संस्कृत शिकून घेतले. पण तत्त्वज्ञान विषयात रुची निर्माण करणारे प्राध्यापक त्यांना भेटले नाहीत. रॉलीन्सनकडून त्यांनी संशोधन तंत्र शिकून त्याच्या

बदल्यात त्यांना संस्कृतचे ज्ञान दिले. पण त्यांचे सर्वात आवडते शिक्षक होते, प्रो. एफ. डब्ल्यू. बेन. जेव्हा बेन साहेब डेक्कन कॉलेजमधून निवृत्त झाले, तेव्हा विद्यार्थ्यांपैकी एकाने म्हटले की, तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांपेक्षा उत्तम तत्त्वज्ञान व साहित्याच्या प्राध्यापकापेक्षा उत्तम साहित्य, त्यांनी शिकवले. याच प्रिन्सिपॉल बेनकडून डॉ. रानडे यांनी शाश्वत, सत्य व सुंदर याचे पाठ घेतले.

रानडे कॉलेजमध्ये असतानापासूनच त्यांनी जन्मभराची सवय - म्हणजे रोज तीन तास नेम - परीक्षेच्या काळातसुद्धा लावून घेतली. १९०८ मध्ये मुंबई विद्यापीठाची बी. ए. पदवी घेत असतानाच त्यांना आत्मानुभव येऊ लागले व ते आजन्म टिकून राहिले. प्रथम प्रथम त्या अनुभवांनी ते गोंधळात पडत. त्यामुळे त्यांचे स्पष्टीकरण त्यांनी, बनारसच्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या सुप्रसिद्ध ॲनी बेझंटकडून करून घेतले.

पदवी प्राप्त झाल्यानंतर, डेक्कन कॉलेजमध्येच ते 'फेलो' झाले. १९१२ मध्ये क्यूरेटर म्हणून काम पाहू लागले व १९१४ मध्ये एम. ए. झाले. याच काळात त्यांची तत्त्वज्ञान विषयक रुची वाढली - विशेषतः ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानात - त्यांचे ग्रीक भाषेवरील प्रभुत्वाने, त्यांनी, 'ॲरिस्टॉटल्स मेटाफिजिक्स' या विषयी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण केला. नंतर त्यांनी सॉक्रेटीसपूर्व तत्त्वज्ञांचाही अभ्यास करून त्यावर आपली टीकात्मक समालोचने प्रसिद्ध केली.

१९१४ मध्ये ते पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये व्याख्याते झाले. १९१६ मध्ये रानडेंचे मित्र प्रतापशेट, यांनी अंमळनेरला, 'इंडियन इंस्टिट्यूट ऑफ फिलॉसॉफी'ची स्थापना केली, तेव्हा रानडेंनी त्यांना तांत्रिक सल्ला दिला व ग्रंथालयातील पुस्तकांची निवडही केली. तो काळ त्यांच्या शैक्षणिक जीवनातील अत्यंत आनंदी काळ होता. पण त्याचवेळी त्यांच्या व्यक्तिगत जीवनातला तो दुःखाचा काळ होता. कारण १९१८ च्या त्यावेळच्या एन्फ्लुएंझाच्या साथीत त्यांना आई व पत्नी दोघांनाही गमवावे लागले व त्यांची वैयक्तिक प्रकृतीही इतकी ढासळली की, जी जन्मभर पूर्ण सुधारली नाही व त्यांना सहा वर्षांनी निवृत्त व्हावे लागले.

१९१४ मध्ये श्री भाऊसाहेब महाराजांनी समाधी घेतली व श्री अंबुराव महाराज हे रानडेंचे गुरुबंधू त्यांच्या निकट सान्निध्यात आले. १९२१ मध्ये रानडेंनी निंबाळ येथे आश्रमाची स्थापना केली. अंबुराव महाराजांच्या पश्चात श्री रानडे यांना गुरुपदाची जबाबदारी स्वीकारणे, अनिच्छेने का होईना, भाग पडले. १९३४ मध्ये त्यांनी निंबाळच्या आश्रमात आपल्या अनुयायांना स्वतंत्रपणे नाम देण्यास सुरुवात केली. १९५४ मध्ये, माझ्या माहितीनुसार, त्यांचे सुमारे दोन हजार नामधारक संपूर्ण भारतभर पसरले होते. त्या सर्वांचे ते 'गुरुदेव' झाले होते. त्यांनी सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानाव्यतिरिक्त, कार्लाइलचे तत्त्वज्ञानावरील निबंध, भारतीय तत्त्वज्ञान, महाराष्ट्रातील संत, औपनिषदीक तत्त्वज्ञानाचे विधायक

समालोचन, इत्यादी ग्रंथांची निर्मिती केली.

त्यांची प्रकृती थोडीफार सुधारली. १९२७ मध्ये त्यांनी अलाहाबाद विश्वविद्यालयात, तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून नोकरी स्वीकारली. जवळ जवळ एकोणीस वर्षे त्यांनी प्राध्यापकाचे, काही काळ डीनचे, काम पाहिले. पण पुण्यातील प्राध्यापकी जीवनातील सुवर्णक्षण तेथे आले नाहीत. मी १९५४ मध्ये जेव्हा कुंभमेळा होता म्हणून अलाहाबादला गेलो, तेव्हा रानडेंच्या बंगल्यात, प्रतापशेठचा पाहुणा म्हणून राहिलो. १९३३ मध्ये 'मिस्टीसिझम इन महाराष्ट्र' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. पुढे त्यांनी जो कोणी भेटेल त्याला, हिंदी वाङ्मयातील परमार्थपर पद माहीत असल्यास विचारीत व असा संग्रह करून त्यांनी 'पाथवे टू गॉड इन हिंदी लिटरेचर' हा ग्रंथ लिहिला. तो १९५४ मध्ये प्रसिद्ध झाला. नंतर त्यांनी कन्नड मिस्टीसिझमही पूर्ण करून ही त्रयी पूर्ण केली.

रानडे वयाच्या साठाव्या वर्षी निवृत्त झाले, पण अजून एक वर्ष अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरू म्हणून त्यांनी काम पाहिले. १९४७ नंतर ते निंबाळ आश्रमातच राहिले. पण थंडीच्या मोसमात ते अलाहाबादला येत. त्यांना वैयक्तिक जीवन जवळ जवळ नव्हतेच. त्यांनी अन्नही पूर्ण सोडले होते व ते केवळ चहावरच रहात. त्यांनी संपूर्ण जीवन नेम, ग्रंथलेखन व नाम देणे यातच व्यतीत केले. १९५४ मध्ये मी त्यांना निंबाळला भेटलो.

मी जेव्हा भारतात वेदांताच्या अभ्यासासाठी आलो होतो, तेव्हा अनेकांनी मला तत्त्वज्ञान व विशेषतः आध्यात्मिक तत्त्वज्ञान, यामध्ये अधिकारी पुरुष म्हणून रानडे यांचेच नाव सांगितले. म्हणून मला रानडे यांच्याबद्दल व्यक्ती म्हणून कुतूहल निर्माण झाले होते. एका भौतिक शास्त्रातील प्राध्यापकाने तर, रानडे हे अत्यंत प्रगत विचारवंत म्हणून त्यांचे वर्णन केले. पण ते जीवन्मुक्त असल्याबद्दल मात्र निश्चित मत सांगितले नाही. मला कोणी सल्ला दिला की, त्यांना आश्रमात भेटण्यास जाऊ नये. कारण आश्रमातील जीवन अत्यंत चाकोरीबद्ध असते - विशेषतः पाश्चात्यांना. माझे पूर्वी हिंदू गुरूबद्दल असे मत होते की, हे तथाकथित गुरू अत्यंत उद्धट, दिखाऊ, एककल्ली असून त्यांच्या शिष्यांनासुद्धा भेटण्यात ते फार राखीव असतात; तर परक्या व्यक्तीला भेटणे तर राहूच द्या. म्हणून मी भीतभीतच रानडे यांना भेटण्यासाठी परवानगी मागणारे पत्र पाठविले आणि मला उत्तरादाखल लगेचच आमंत्रण आले.

मला जी व्यक्ती दिसली, ती माझ्या गुरूबद्दलच्या वरील कल्पनेच्या अगदी विरुद्ध होती. अगदी सामान्यासारखा दिसणारे, अत्यंत कृश देह धारण केलेले, पण कधीही पहावे तेव्हा एक प्रकारच्या चैतन्याने भारलेले ! असा व्यक्तीमध्ये दिखाऊपणाचा लवलेशही नव्हता. अशा निगर्वी माणसामध्ये ढोंगीपणा वाऱ्यालाही उभा नव्हता. त्यांच्यातील चापल्य व वेगवानता, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य होते. शिष्यांच्या - जे त्यांना देव मानीत गराड्यात देखील त्यांच्या नर्म विनोदाला मज्जाव नव्हता. मी त्यांना भेटलो तेव्हा :

प्रथमपासूनच स्पष्टवक्ते पण स्नेहपूर्ण, बोलण्यास उत्सुक व माझ्याही बौद्धिक ज्ञानाची कदर करणारे असे दिसले. स्वतःबद्दलचे शिक्षण इत्यादी सांगून त्यांनी माझेही विचारून घेतले. अशारीतीने स्नेहबंध प्रस्थापित झाला. 'सॉक्रेटीसपूर्व तत्त्ववेत्ते' हा आमचा सामायिक आवडीचा विषय आम्ही बोलत बसलो. त्यामुळे आम्ही तत्काळ परस्परांचे मित्रच बनलो. तसे ते सर्वांचेच स्नेही बनत. असे असले तरी निंबाळला गेल्यावर, येथे गुरू कोण आहेत हे न सांगता कळायचे. कारण रानडेंच्या प्रत्येक दृष्टिक्षेपातून, शब्दातून, कृतीतून त्यांची आध्यात्मिक उत्तुंगता प्रतीत व्हायची. त्यांना आपण 'संत' झाल्याचे भासविण्याची गरजच नव्हती, कारण ते खरेखुरे संतच होते.

त्या काळात आश्रम म्हणजे पाच लहान दगडी इमारती होत्या. आजूबाजूला सात-आठ झोपड्या होत्या. जवळच रानडेंना दृष्टान्त झालेली चमत्कृतीपूर्ण विहीर होती, जिचे पाणी कधीही आटत नव्हते. शिवाय दहा फूट खोल एक खड्डा होता, जेथे रानडे ध्यानाला बसत. त्यांच्या घरात त्यांच्याशिवाय त्यांची द्वितीय भार्या, मुलगी, दोन छोटी नातवंडे आणि पंधरा एक शिष्य रहात. या शिष्यांमध्ये विविध थरातले लोक होते. माझ्या सुखसोयीसाठी या शिष्यगणांनी खूप परिश्रम घेतले. मी खरेतर कशाचीच मागणी केली नव्हती. फक्त मला आश्रमात रहायचे होते. पण या सर्वांनी माझ्यावर प्रेमाचा अक्षरशः वर्षाव केला.

सहा वाजता दिवस सुरू व्हायचा. साधक तेव्हा एकत्र जमायचे. तीन तासांचा नेम करणे अपेक्षित होते. पण आम्ही तासाभरानेच हळुहळू बाहेर पडायचो. दुपारी बारा वाजता सिटींगची घंटा झाली की, आम्ही गुरुदेवांच्या उपस्थितीत काही चर्चा करण्यासाठी एकत्र यायचो. मग कापूर लावून ते सेशन संपायचे. संध्याकाळी पुन्हा कोणाचे तरी प्रवचन असायचे. रात्रीचे भजन झाल्यावर दिवसभराचा कार्यक्रम पूर्ण व्हायचा.

माझी रानडेंच्या संगतीत जी चर्चा व्हायची, ती सुद्धा पुष्कळदा गंमतीदार असायची. त्यांनी 'अद्वैत' व 'ज्ञानमार्ग' अवघड म्हणून ते नाकारले होते व भक्तिमार्ग हाच खरा आत्मसाक्षात्काराचा मार्ग म्हणून स्वीकारला होता. एकदा एका साधकाने 'दहा संत' हे त्यांच्या भक्तीतील कमतरतेवर आधारित मजेशीर पद गायले. ते दहा संत म्हणजे - प्रल्हाद, ध्रुव, व्यास, शुक, भीष्म, अर्जुन, वाल्मिकी, हनुमान, बिभीषण व उद्धव. शुकाच्या बाबतीत भक्तीतील उणीव म्हणजे, त्याचा 'अद्वैत सिद्धान्त'. रानडेंच्या मते, सर्व गोष्टी परमेश्वराकडून मिळतात व परमेश्वराप्रतच पोहोचतात. आत्मसाक्षात्काराचे चौपदरी साधन रानडेंनी सांगितले - १) नैतिक वागणूक, २) सज्जनांचा सहवास / सत्संग, ३) गुरू - रानडेंच्या मते, गुरू शिष्याची निवड करत नसून, शिष्याने गुरूची निवड करायला पाहिजे, आणि ४) साधन किंवा ध्यान /नेम. या चौपदरी साधन मार्गात, देवावरील उत्कट प्रेम अध्याहत आहे. या भक्तिमार्गात, आत्यंतिक भक्ती किंवा एकांतिक प्रेम हेच देवाशी एकरूप

होण्याचे साधन आहे. मी जेव्हा अमेरिकेला परत गेलो, तेव्हा एका व्याख्यानात सांगितले, "भारतात विनोबा हे कर्ममार्गाचे, मलकानी हे ज्ञानमार्गाचे व रानडे हे भक्तिमार्गाचे द्योतक होत."

देवावर प्रेम करणे, हे रानडे यांच्या जीवनाचे मुख्य सूत्र होते. दैनंदिन जीवनामध्ये साधन (नेम/ध्यान) हा दिनक्रमातील केंद्रीभूत गाभा होता. परमेश्वराशी सतत एकरूप होऊन राहणे हे रानडेंच्या जीवनाचे ध्येय होते. पण अद्याप, (मी आश्रमात असताना) ते साध्य झाले नव्हते म्हणून रानडे म्हणत, "I have not yet enjoyed unitive experience." रानडे यांच्या स्पष्ट विधानाचे मला, कित्येक ढोंगी गुरूंच्या दिखाऊपणापेक्षा जास्त कौतुक वाटायचे.

रानडेंनी मला पुन्हा सहकुटुंब येण्याचे निमंत्रण देऊनच निंबाळ स्टेशनवर निरोप दिला. पण सहकुटुंब येण्याची ती वेळ आलीच नाही. कारण तत्पूर्वीच ते समाधिस्थ झाले. त्यांचा सत्तरावा 'अमृतमहोत्सव' त्यांच्या जन्मग्रामी, जमखंडी येथे साजरा झाला. तो पारंपरिक थाटात झाला. त्याचे वर्णन, 'world-renowned philosopher-mystic' असे करण्यात आले. ते कदाचित त्यांना पसंत पडले नसेल. त्यांच्या १९५७ मध्ये देहावसानानंतर, श्रीमती रानडेंना भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राजे, राज्यपाल, केंद्रीय व राज्य सरकारातील मंत्री, संस्था व व्यक्तिगत पातळीवर अनेक सांत्वनपर पत्रे आली.

रानडेंच्या आध्यात्मिक व उत्तुंग बौद्धिक पातळीवरील कार्याचे मोजमाप करणे कठीणच आहे. पण मला सर्वांत आवडले ते त्यांचे प्रेमळ व्यक्तिमत्व ! माझ्यासारखाच त्यांना खराखुरा मित्र म्हणून बरेच जण ओळखत असतील. भारतात तसेच जगात असे कित्येक विद्वान आहेत, जे संशोधन कार्यात मग्न आहेत, असे कित्येक तत्त्वज्ञ आहेत, जे सत्-तत्त्वाच्या शोधात मूलगामी व अंतर्मुख दृष्टीने शोध घेत आहेत, असे अनेक शिक्षक आहेत, जे आपल्या विद्यार्थ्यांना स्फूर्ती देत आहेत. पण असे क्वचितच पहायला मिळते की, हे सर्व एकाच व्यक्तीत आहे. असे एकातच सर्व असणारे श्री गुरुदेव रानडे हे अद्वितीय व्यक्तिमत्व मला जाणवते. श्री रानडे यांच्या जीवनाकडे पाहिले म्हणजे कळते की, 'मानवी स्वभावाचे अत्युत्कृष्ट दर्शन' कशा प्रकारचे असू शकते.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३६. संत रानडे

**एस. के. गुप्ता**

**बारीपाडा, ओरिसा**

ज्याने आत्मसाक्षात्कार करून घेतला नाही, त्याने आत्मसाक्षात्कारी संताचे दर्शन घडविणे उचित नाही. रानडेंनी जो आध्यात्मिक समुद्राचा तळ गाठला होता, तो न गाठताच

त्याचे वर्णन कसे योग्य होणार ? म्हणून रानडेंचे वर्णन मी नम्रपणे, 'Mysterium Tremendum', असे करू इच्छितो.

अलाहाबाद विद्यापीठात, त्यांचा शिष्य म्हणून राहण्याचे भाग्य मला दोन वर्षे लाभले. ते एम. ए. (प्रीव्हीयस क्लास) ला इंडियन फिलॉसॉफी शिकवत. त्यांचे छांदोग्य उपनिषदातील, 'तज्जलान'चे विवरण अद्याप माझ्या स्मरणात आहे. 'सर्व त्याच्यातच निर्माण होते, त्याच्यातच जगते, शेवटी त्याच्यातच विलीन पावते.' या जगातील सर्व शक्ती, भौतिक, मानसिक - या त्याच्याच स्वरूपाचे आविष्करण होय. सर्व जिवांचे तो 'आदी' आहे. त्याला ज्याने जाणले, त्याला सर्व चराचरांमध्ये त्याचेच दर्शन होते. भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे,

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धी सात्त्विकम् । xviii - 20

'तज्जलान'चा सर्वांगाने खरा अर्थ केवळ साक्षात्कारी संतच जाणू शकेल आणि तोच त्याचे विवरण करू शकेल. श्रोते (इतर) फक्त वरवरचा अर्थ सांगू शकतील आणि तेवढ्यानेच समाधान मानू शकतील. पण खऱ्या साक्षात्कारी पुरुषाचा 'तज्जलान'चा अर्थ जीवनभर साथ देईल.

❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३७. गुरुदेव - एक शिक्षक

**एस. के. गुप्ता**
**बारीपाडा, ओरिसा**

गुरुदेव - एक उत्तम शिक्षक म्हणून जाणवतात, ते रिसर्च स्टुडंटस्ना 'गाईड' म्हणून काम करताना. मला असा स्टुडंट होण्याचे भाग्य लाभले. विचारांचे नाविन्य व विद्वत्ताप्रचुर लेखन, ही रिसर्च स्टुडंटची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. रिसर्च स्कॉलर्सनी प्रकाशित केलेले प्रथम दर्जाचे साहित्य हे डॉ. रानडे यांच्या मार्गदर्शनाचे द्योतक आहे. 'A Critical Survey of Indian Philosophy' चे लेखक डॉ. चंद्रधर शर्मा यांचे पुस्तक हे असे एक उदाहरण आहे. जेव्हा डॉ. चंद्रधर शर्मा हे ओरिसामध्ये, 'ऑल ओरिसा फिलॉसॉफिकल असोसिएशन'चे अध्यक्ष म्हणून आले होते, तेव्हा मी त्यांना भेटलो. तेव्हा शर्मांनी हे मान्य केले की, त्यांच्या पुस्तकावर डॉ. रानडे यांच्या दृष्टिकोनाची छाप आहे. यामुळे मला फारच आनंद झाला.

❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३८. आत्मसाक्षात्कारी संताचे परमेश्वरावर विवेचन

**एस. के. गुप्ता**
**बारीपाडा, ओरिसा**

रानडे यांचे व्यक्तिमत्व, विद्वत्ता व नम्रता यांचा संगम होते. त्यांच्या निवासस्थानी त्यांना भेटण्यात मोठी मौज होती. त्यांच्या नर्म विनोदाने व त्यांच्या प्रेमळ वागणुकीने, त्यांच्या संगतीत क्षण सोनेरी व्हायचे. मी दोन वर्षे अलाहाबादला राहूनही, मला ते साक्षात्कारी संत असल्याचे कळले नाही. मी बऱ्याच वर्षांनंतर जेव्हा त्यांचे, 'पाथवे टू गॉड इन हिंदी लिटरेचर' हे युगप्रवर्तक कार्य वाचून पाहिले, तेव्हाच मला कळले की, रानडे हे साक्षात्कारी संत होते. आत्मसाक्षात्कारी संताने परमेश्वरावर केलेले विवेचन हे अत्यंत प्रत्ययकारी झालेच पाहिजे - ते असामान्य असल्याचे जाणवतेच. इतरांनी लिहिलेल्या समविचारांच्या पुस्तकात असे पुस्तक उठून दिसते. अशाच प्रकारे मी जेव्हा, 'Contemporary Indian Philosophy' हे इतर अनेक तत्त्वज्ञांच्या पुस्तकातील प्रबंध वाचले तेव्हा, इतरांपेक्षा श्री रानडे यांच्या लेखनातील वेगळेपण व मूलगामित्व चटकन् जाणवले. श्री रानडे यांचे लेखन, त्या इतर सर्वांच्या लेखनापेक्षा फारच वरच्या दर्जाचे होते. कारण त्याला आत्मसाक्षात्काराचा स्पर्श झाला होता. रानडेंची सर्वच पुस्तके त्यामुळे असामान्य आहेत. त्यांच्या लेखनावर त्यांच्या खोल आध्यात्मिक दृष्टिकोनाचा ठसा उमटलेला दिसतो. जरी आज ते आपल्यात नाहीत, तरी त्यांच्या मुक्त आत्मस्पर्शित्वाची अनुभूती त्यांच्या लेखनातून आपल्याला जाणवते. त्यांच्या पुस्तकाच्या वाचनाने व्यक्तीला अमरत्वाकडे वाटचाल करण्याची खरी वाट सापडते.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ३९. त्यांच्या ध्यानाने व संदेशाने त्यांना अमर केले

**प्रो. संगमलाल पांडे**
**अलाहाबाद**

व्याख्यातोपनिषत्तत्वं रहस्यवादभास्करम् ।
श्री रानडे गुरू वन्दे ज्ञान भक्ती जगद्गुरूम् ।।१।।
प्रथमं ज्ञानदेवादीन् कवीरादीस्ततः परम् ।
व्याख्यातुं बसवादींश्च सोऽवतारन्महीतले ।।२।।
उमदीमुनिशिष्यो यो निम्बरगीमतशंङ्करः ।
सन्तो वदन्ति सर्वे तं भक्तवाणीविनायकम् ।।३।।

प्रणीतं सन्निधौ तस्य मया रैदासदर्शनमं ।
सम्पादितं च भाषायां रानडेदर्शनं पुनः ।।४।।
द्रष्टुं ज्ञातुं परं तत्त्वं रानडे जीवनं तथा ।
अलं साधकसर्वस्वं रानडेदर्शनं मम ।।५।।

१९५२ ते १९५६ दरम्यान मी प्रा. रानडे यांच्या निकट सान्निध्यात होतो. ते अलाहाबादला दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये यायचे, ते एप्रिल-मे पर्यंत रहायचे. या काळात जवळ जवळ रोजच त्यांना भेटण्याचे भाग्य मला लाभत असे. त्यांच्या अनेक 'सिटींग्ज'ना मी उपस्थित राहिलो. प्रत्येक सिटींगमध्ये मात्र ते नाविन्यपूर्ण विषय मांडत. त्यांच्यातील चैतन्य नित्य नवा आनंद देत असे. त्यांना ओळखणे फार अवघड काम होते. प्रत्येक सिटींगमध्ये मला ती स्फूर्ती मिळे.

आज ते आपल्यामध्ये देहरूपाने नाहीत, तरी मला रोज त्या काळातील त्यांचे दर्शन स्मरते. त्यांच्या असंख्य साधकांच्या मनात, त्यांची मूर्ती चिरकाल स्मरणात राहील, असेच त्यांचे व्यक्तिमत्व होते. नभदास या हिंदी संतकवीने ('भक्तमाला' मध्ये) म्हटल्या प्रमाणे, ज्याला देवाबद्दल प्रेम वाटते, त्याला गुरूबद्दल प्रेम वाटतेच. म्हणूनच प्रा. रानडे यांनी ज्यांना नाम दिले, त्या सर्व साधकांना गुरुदेवांबद्दल निस्सीम प्रेम असणारच. खरे तर गुरुदेवांची आध्यात्मिक परंपरा, त्याचा अमर संदेश व त्यांचे नामस्मरण (ध्यान), यामुळे ते अमर झाले आहेत. हा दृष्टिकोन ज्यांना आहे, ते आजही पूर्वीप्रमाणेच त्या रुपातच त्यांचे दर्शन घेऊ शकतात.

मला त्यांचे पुष्कळच प्रसंग आठवतात, ते सगळेच येथे कथन करणे आवाक्याबाहेरचे होईल. म्हणून मी दोन-तीन प्रसंगच आताच्या लेखात घेऊ इच्छितो. प्रा. रानडे हे संपूर्ण निष्काम किंवा निरिच्छ झाले होते. त्यांना कोणतीही इच्छा किंवा वासना नव्हती. त्यांना कीर्तीची तर अजिबात कामना नव्हती. जेव्हा डॉ. राधाकृष्णन, भारताचे उपराष्ट्रपती झाले, तेव्हा मी प्रा. रानडे यांना त्यांच्या या पदग्रहणाबद्दल त्यांचे मत विचारले. त्यांनी आनंद वाटल्याचे म्हटले व देशाच्या दृष्टिने चांगले झाले असे म्हटले. पण मी जेव्हा, तुम्ही राष्ट्रपती व्हाल का ? असे विचारले, तेव्हा जोरात नकारात्मक मान हलवून ते म्हणाले, "मी माझे जीवन आत्मसाक्षात्कारासाठी समर्पिले आहे. त्यापेक्षा मौल्यवान दुसरे काय आहे ? नको त्या गोष्टींची इच्छा कशाला करायची ?"

यावरून गुरुदेव रानडे हे खऱ्या अर्थाने देवासाठी जगणारे, देवरूप होते, हे सिद्ध होते. काही जण कामनापूर्तीसाठी देवाची भक्ती करतात व कामना पूर्ण होताच देवाला विसरतात. प्रा. रानडे यांचे तसे नव्हते. ते सर्व वासनांच्यापेक्षा वर, अत्युच्च पातळीवर पोहोचलेले होते. ते जणू भारतीय ऋषी-मुनींचे प्रतीकच होते.

असे शुद्ध सात्त्विक प्रेम - तत्त्वज्ञानावरचे प्रेम - माझ्या तरी पाहण्यात नाही.

प्रा. रानडे यांना ओळखणे, म्हणजेच त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून घेणे. To know him was to know philosophy. (ब्रह्मविद ब्रह्मैव भवति।)

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ४०. अपराविद्या हे पराविद्येचे साधन आहे

डॉ. धीरेंद्र मोहन दत्त
शांतिनिकेतन

गुरुदेव रानडे हे आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्या पवित्र स्मृती जास्तच प्रकर्षाने मनात जागृत होत आहेत.

डॉ. रानडे हे प्रथितयश विद्वान आणि प्रसिद्ध ग्रंथकार होते. प्रख्यात व्याख्याते होते. पण त्यांचा हा यथार्थ परिचय नाही. त्यांचे जीवन मुख्यतः ब्रह्माकार होते - हा त्यांचा प्रमुख परिचय. त्यांचे संपूर्ण जीवन, मुख्यतः ब्रह्मचिंतनात व्यतीत झाले. हे मुख्य सूत्र समजून घेतले पाहिजे. बाकी सर्व बाह्य प्रकाशासारखे होते.

गणित, संस्कृत, ग्रीक, तत्त्वज्ञान इत्यादी अनेक शास्त्रांमध्ये ते पंडित होते. परंतु, त्यांच्या दृष्टीने सर्व अपराविद्या या पराविद्येचे साधन होत्या. उपनिषद्रहस्यवाद, संतांवरील ग्रंथरचना, या तर त्यांच्या आध्यात्मिक साधनेचे अंग होत्या. त्यांच्या पावन स्पर्शाने विद्यार्थ्यांना, अपराविद्येसह पराविद्येचा संस्पर्शही होत असे. महाराष्ट्रातील संतांप्रमाणेच, त्यांच्या जीवनात, ज्ञान व भक्ती यांचा मधुर संगम होता. त्यांचे शरीर पूर्णतः त्यांच्या ताब्यात होते. शरीर हे आत्म्याचे वाहन व साधन होते. त्यांच्याकडे पाहताच कळत होते की ते शरीराला केव्हाही सोडू शकतील.

गृहस्थ असूनही ते संन्याशी होते. त्यांचा आश्रम हेच त्यांचे घर होते. कुटुंब, अतिथी, विद्यार्थी, साधक या संपूर्ण घटकांचा तो समन्वय होता. नेम, स्वाध्याय, सत्संग, भजन, कीर्तन, आदरसत्कार तेथे सतत चालायचे. त्यांच्या घरात राहण्याचे सद्‌भाग्य मला कित्येकदा मिळाले. शेवटी मी जेव्हा आपला निरोप घेतला, तेव्हा गीतेतील पुढील श्लोक म्हणवून घेऊन, आपण मला निरोप दिला होता -

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहु तमश्नामि प्रयतान्मनः ।।
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।

आजही कानात हे श्लोक गुंजारव करतात आणि जणू काही, 'आत्मसमर्पणा'चा उपदेश आजही देत राहतात.

# ४१. गुरुदेव - एक उत्तुंग व्यक्तिमत्व

जी. व्ही. सराफ
बेळगाव

गुरुदेव रानडे अलाहाबाद विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सेलर म्हणून १९४६ मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांनतर ते निंबाळला राहण्यासाठी आले. श्री. कृष्णराव गजेंद्रगडकर यांना समजले की, गुरुदेव रानडे यांना विद्यापीठाकडून, प्रॉव्हिडंट फंड इत्यादीचे पैसे मिळणार आहेत, म्हणून ते मला म्हणाले की, आपण दोघे मिळून निंबाळला जाऊया आणि बेळगाव बँकेत ती रक्कम ठेवण्यासाठी गुरुदेवांना विनंती करूया. आम्ही दोघे त्यावेळी बँकेचे डायरेक्टर होतो. ठरल्याप्रमाणे आम्ही निंबाळला गेलो. श्री. गजेन्द्रगडकर यांनी विषयाला तोंड फोडले.

गजेंद्रगडकर - तुम्हाला विद्यापीठाकडून चांगली रक्कम मिळणार आहे, होय ना ?

गुरुदेव - हो. विद्यापीठ मला काही रक्कम देणार आहे.

गजेंद्रगडकर - ती रक्कम तुम्ही कृपया आमच्या बँकेत ठेवाल का ? आम्ही तुम्हाला चांगले व्याज देऊ आणि आमचाही फायदा होईल.

गुरुदेव - जेव्हा पैसे मिळतील, तेव्हा विचार करू.

गजेंद्रगडकर - कधी मिळतील असे तुम्हास वाटते ?

गुरुदेव - मला माहिती नाही. विद्यापीठाला सोयीचे पडेल, तेव्हा ते देईल.

मी त्यांच्या चर्चेत भाग घेत म्हटले की, विद्यापीठाने तुम्हाला रक्कम देणे आहे. त्यांनी ती लवकर द्यावी म्हणून, आपण त्यांना कायदेशीर नोटीस देऊ शकतो. गुरुदेव एकदम अस्वस्थ होऊन म्हणाले, "विद्यापीठाला आर्थिक अडचण आहे, आणि अशा काळात माझ्या पैशासाठी नोटीस देण्याचा मी विचारच करू शकत नाही. मी त्यांना मागणारसुद्धा नाही. त्यांना जेव्हा शक्य होईल तेव्हा देऊ दे. त्यांना नोटीस देण्यापेक्षा मी माझा हक्क सोडून देईन.

आम्ही दोघेही गुरुदेवांचे विशाल हृदय पाहून थक्कच झालो. केवढा महान माणूस ! केवढे उत्तुंग व्यक्तिमत्व ! खरोखर आत्मसाक्षात्कारी पुरुषच ते !!

# ४२. मला विरोधक नाहीत

**एस. डी. दाभाडे**
**विजापूर**

गुरुदेव रानडे यांच्या रामदुर्ग आणि गोण्णागर येथे स्वतःच्या मालकीच्या जमिनी होत्या. 'बॉंबे टेनन्सी ॲक्ट' प्रमाणे, कूळ जमिनीचे मालक होणार होते. गुरुदेवांच्या जमिनी, त्यांचे एक शिष्य, दिगंबरपंत म्हैसकर कुळ म्हणून पहात होते. टेनन्सी ॲक्ट लागू झाल्यावर ते निंबाळला आले आणि त्यांनी वस्तुस्थिती सांगितली. तेव्हा गुरुदेवांनी बॅरिस्टर एम. पी. अंकलीकर, एस. एम. वाली (असिस्टंट कमिशनर, इंडि) आणि मला बोलावून घेतले आणि कोणावरही अन्याय न होता, प्रश्न सोडवण्यास सांगितले. मग कुळांना खोलीत बोलावून घेतले आणि त्यांनी मान्य केले की, ते नोकरदार म्हणून गुरुदेवांच्या जमिनीवर काम करण्यास तयार आहेत. भविष्यकाळातसुद्धा ते तसेच वागतील. ही बाब गुरुदेवांना सांगण्यात आली आणि महैसकरांनी त्यांचे कूळ म्हणून पुढे काम पाहण्याचे ठरविले.

त्यांनी गावी जाऊन गुरुदेवांना पत्र लिहिले की, "जरी आम्ही तुमच्या जमिनीवर कुळाप्रमाणे काम करण्याचे मान्य केले होते, तरीही माझी मुले व घरातील इतर मंडळी, यांना ते मान्य नाही."

गुरुदेवांनी मग मला आणि अंकलीकरांना योग्य ती पावले उचलण्यास सांगितले. आम्ही दोघेही रामदुर्गला गेलो आणि त्यांच्या कुळाविरुद्ध अर्ज केले. काही दिवसांनी कोर्टात खटला उभा राहिला. तहसीलदाराने त्यांना तीनवेळा संधी देऊन गुरुदेवांच्या बाजूने निकाल दिला. कुळाने मग रेव्हेन्यू असिस्टंट कमिशनरकडे अपील केले. त्यांनी ते फेटाळले. मग हायकोर्टातही ते फेटाळले गेले. त्याच्या प्रती आमच्याकडे आल्यावर, गुरुदेवांनी मला ते वाचण्यास सांगितले. वाचताना कुळांची नावे, opponent म्हणून येताच, त्यांनी मला थांबवून, opponent शब्दावर हरकत घेतली आणि म्हणाले, "I have no opponents." कायदेशीर भाषेत त्यांना opponents म्हणणे भाग होते, असे मी जरी स्पष्ट केले, तरीसुध्दा गुरुदेवांना ते मान्य झाले नाही आणि ते निघून नेमाच्या खोलीत गेले.

मग मला असे वाटले, जर श्रीराम व श्रीकृष्ण यांनाही रावण आणि कंस यांसारखे विरोधक होते, तर गुरुदेवांना का असू नयेत ? नंतर मला कळले की, समोऽहं सर्व भूतेषु, न मे द्वैषोऽस्ति न प्रियः । (भ.गी. अ-९, श्लोक२९) तसेच देवानां दानवानां च सामान्यवसि दैवतम् । या प्रमाणेच 'I have neither friends nor foes' हेच गुरुदेवांचे तत्त्वज्ञान होते.

✲✲✲✲✲✲✲✲✲✲✲

## ४३. जठरात अमृत स्रवत असते, तेव्हा तहान-भूक हरपते

जे. व्ही. परूळेकर
बेळगाव

१९२४ मध्ये डेक्कन एज्युकेशनशी तणाव वाढल्याने, श्री रानडे हे डी. ई. सोसायटीचा राजीनामा देऊन, निंबाळला राहण्यासाठी गेले. १९२६ मध्ये नोकरी नसल्याने, आर्थिक स्थिती बिकट झाली. त्यामुळे रानडे यांनी त्यांचे एक निकटस्नेही, श्री. डी. बी. तथा बाळासाहेब देशपांडे, त्या काळातील बागलकोटचे मामलेदार, यांना निंबाळला येऊन भेटण्यास पत्र लिहिले. त्यांनी निंबाळला येऊन गुरुदेवांची बिकट स्थिती ओळखून, काही रक्कम देऊ केली व आणखी रक्कम बागलकोटला जाऊन पाठवण्याचे आश्वासन दिले. पण परद्रव्य स्वीकारायचे नाही, या तत्त्वाप्रमाणे, श्री गुरुदेव धन स्वीकारण्यास तयार होईनात. त्याच सुमारास 'कन्स्ट्रक्टीव्ह सर्व्हे'चे प्रकाशन झालेले होते. त्यामुळे गुरुदेवांनी पुस्तकाच्या सुमारे दोनशे प्रती बाळासाहेबांकडे देऊन, त्या जर विकून देता आल्या तर पाहावे, असे सांगितले. या गोष्टाला बाळासाहेब लागलीच तयार झाले व दुसऱ्याच दिवशी आपल्या कारमधून श्री गुरुदेवांना घेऊन व पुस्तके घेऊन, बेळगावला जाण्यास निघाले. श्री. काकासाहेब उर्फ व्ही. बी. परूळेकर यांच्या बंगल्यावर दोघेही गेले. श्री. व्ही. बी. तथा काकासाहेब परूळेकर, तेव्हा, त्या काळच्या बॉंबे स्टेटचे असिस्टंट कमिशनर होते. त्यांच्या अधिकाराखाली सहा विभाग होते. श्री. परूळेकर, बाळासाहेबांचे निकटचे स्नेही होते व त्यांना श्री. गुरुदेवही परिचयाचे होते.

श्री. काकासाहेबांच्या पत्नी, आम्ही त्यांना काकी म्हणत असू, त्यांची तब्येत त्या काळात ठीक नसल्याने, त्यांनी माझ्या पत्नीला स्वयंपाकात मदत करण्यासाठी बोलावले होते. तसेच मी सुद्धा काकासाहेबांच्याच घरी जेवणासाठी यावे, असे काकींनी सांगितले. याच काळात माझा प्रथम परिचय गुरुदेवांशी झाला. श्री. बाळासाहेबांनी आमचा परिचय करून दिला. त्यांनतर रोज सकाळी व रात्रीचे जेवण आम्ही चौघे एकत्र घेत असू. गुरुदेव बहुतेक काळ खोलीतच असायचे. चहा व जेवणासाठी खोलीबाहेर यायचे. गुरुदेव दिवसातून चार ते पाच वेळा चहा घेत. काकी जेवणात चांगले पदार्थ करायच्या, पण गुरुदेव जेवण फार कमी घेत. सौ. काकींच्या हे ध्यानात आले आणि तीन दिवसांनंतर गुरुदेव व बाळासाहेब परत गेल्यावर, त्यांनी ही गोष्ट बोलून दाखवली. मलाही त्या काळात माहित नव्हते की,

जैसा अमृताचा निर्झरू । प्रसवे तयाचा जठरू ।
तया क्षुधातृषेचा जठरू । काहीच नव्हे ।।

श्री. काकासाहेबांनी, श्री गुरुदेवांची पुस्तके विकण्यासाठी एक योजना आखली

होती. त्यांनी त्यांच्या अधिकारातील सहा जिल्ह्यांच्या हेडक्लार्कना तारा पाठवून लगेच बोलावून घेतले. बेळगावचे हेडक्लार्क श्री. हुवळी सर्वात प्रथम आले व त्यांना उलगडा होईना की, तार पाठवून का बोलावले आहे ? श्री. काकासाहेबांच्या बंगल्यावर, श्री. हुबळी यांना बाळासाहेबांनी सर्व समजावून दिले. श्री. हुवळी यांनी विचारले की, किती प्रती विकणे आहे ? श्री. बाळासाहेबांनी, सुमारे साठ प्रती, असे सांगितले. ते टांग्याने परत गेले आणि लवकरच पैसे घेऊन आले. त्याच प्रमाणे इतर पाच हेडक्लार्क आले व त्यांनीही पुस्तके नेऊन, विकून त्यांचे पैसे आणून दिले. गुरुदेवांना आश्चर्य वाटले की, जवळ जवळ दोनच दिवसात दोनशे प्रती विकून, त्याची रक्कमही मिळावी ! गुरुदेवांनी आपली कृतज्ञता प्रकट केली - ती त्यांच्या नजरेतून ओसंडून वहात होती. श्री. काकासाहेब व श्री. बाळासाहेब यांनाही खूप आनंद वाटला.

मला अशा रीतीने, १९२६ मध्ये गुरुदेवांचा परिचय होऊनही तेव्हा कळले नव्हते की, ते आत्मसाक्षात्कारी संत होते. मला नाम १९५० साली मिळाले.

## ४४. श्री गुरुदेवांचे आध्यात्मिक सामर्थ्य

**जे. व्ही. परूळेकर**
**बेळगाव**

मला १९५० मध्ये गुरुदेवांकडून नाम मिळाले. त्यानंतर मी दरवर्षी, वर्षातून दोन-तीन वेळा निंबाळला जात असे. व श्री. सोंडूर (तेव्हाचे निवृत्त डे. कलेक्टर, जे वर्षभर निंबाळलाच असायचे.) यांच्याकडे उतरायचो. तेव्हा श्री गुरुदेवांच्या घरात सकाळी आठ ते बारा, नेमाला बसायला लागायचे. मग अर्धा तास विश्रांती घेऊन, लगेच सिर्टींग असायचे. त्यांनतर दुपारचे भजन असायचे. जवळ जवळ संध्याकाळी पाच वाजता जेवण मिळायचे. साधकांना सकाळी साडेतीन वाजता उठायला लागायचे. सहा वाजेपर्यंत नेमाला बसायचे.

मी १९५३ मध्ये रत्नागिरीला असायचो. मी रजा घेऊन निंबाळला गेलो होतो. तीन दिवसांनंतर मी गुरुदेवांना परत जाण्याची परवानगी मागितली. श्री गुरुदेव म्हणाले, "असे घाईघाईत येऊन जाण्याने, तुम्हाला येथे येण्याचा फायदा कसा काय मिळणार ? तुम्ही कमीतकमी पंधरा दिवस किंवा महिनाभर येथे राहून, नेमात पूर्ण बुडून गेले पाहिजे. तर काही फायदा होईल." मी रत्नागिरीला जाण्याचे रद्द करून निंबाळलाच राहण्याचे ठरवले.

मी व सोंडूर नेहमीप्रमाणे पहाटे साडेतीनला उठलो आणि नेमाला बसलो. मला

अचानक एक फार सुंदर अनुभव आला. माझ्या डोळ्यासमोर सुंदर प्रकाश होता. मला आध्यात्मिक अनुभव आला होता. मला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. पण पाच मिनिटातच डोळ्यासमोरील अनुभव नाहीसा झाला.

मी व सोंडूर सहा वाजेपर्यंत नेम करीत बसलो. नंतर आम्ही बोलत बसल्यावेळीच, अचानक श्री गुरुदेव आमच्या खोलीत आले. इतक्या पहाटे श्री गुरुदेव का आले ते काहीच कळेना. त्यांनी आमच्या नेमाची चौकशी केली व निघून गेले. आम्ही त्यांच्या पाठोपाठ निघालो, तेव्हा गुरुदेव मला म्हणाले, "काय, निंबाळला राहण्याचा काही फायदा होतोय की नाही ?" गुरुदेव मला पहाटेच्या नेमात आलेल्या अनुभवाला उद्देशून बोलत आहेत, हे मला कळले व मी श्री गुरुदेवांसमोर नम्र झालो. ती त्यांचीच कृपा होती हे मला माहीत होते, म्हणून मी म्हणालो, "होय. निंबाळला राहण्याचा मला फायदा होत आहे." गुरुदेव मला म्हणाले, "उत्साहाने, प्रेमाने नेम करीत जा, म्हणजे, जास्त उन्नती होईल." गुरुदेवांच्या कृपेची प्रचिती तेव्हा मला आली. (अनुभव जे जाणती, ते गुरुपदीचे अभिलाषी)

आम्ही खोलीत येताच श्री. सोंडूरांनी मला माझ्या अनुभवाबद्दल विचारले. मी मला पहाटेच्या नेमात आलेला अनुभव सांगितला. त्यांना तो ऐकून फार आनंद झाला. त्यांनी मोठ्या उत्साहात चहा केला व आम्ही आनंदाने चहा घेतला.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ४५. श्री गुरुदेव - एक स्थितप्रज्ञ

**पद्मश्री काकासाहेब कारखानीस**
**विजापूर**

जमखंडीच्या पी. बी. (परशुराम भाऊ) हायस्कूलचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन १९१६ मध्ये साजरे झाले. गुरुदेव रानडे यांना त्यावेळी व्याख्यान देण्यासाठी आमंत्रण देण्यात आले होते. तेव्हा ते पुण्यात रहात असत. मी जेव्हा त्यांच्याकडे गेलो होतो, तेव्हा ते मला म्हणाले, "व्यंकटेश सिरीयस आहे, अशी तार आली आहे." (व्यंकटेश त्यांच्या पहिल्या पत्नीपासूनचा मुलगा.) त्यांच्या पत्नी तेव्हा कोल्हापुरात होत्या. आम्ही जमखंडीला गेलो. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या दिवशी मी जेव्हा त्यांच्याकडे गेलो, तेव्हा मला त्यांचा पुतण्या शोकमग्न दिसला. गुरुदेव मला म्हणाले, देवाने दिला होता, देवानेच नेला. देवाचीच इच्छा." एवढे बोलून ते पूर्ववत कामात मग्न झाले. ते स्नेहसंमेलनाच्या ठिकाणी गेले व तेथे त्यांचे तासभर व्याख्यान झाले. असे ते स्थितप्रज्ञ होते. तर मी त्यांना विचारले की, ते कोल्हापूरला का गेले नाहीत ? तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "मला मिरजेलाच समजले

की कोल्हापूरला जाऊन आता काही उपयोग नाही. म्हणून मी सरळ जमखंडीलाच आलो."

❊❊❊❊❊❊❊❊❊❊❊

## ४६. साधू दुसऱ्यासाठी जगतात

पद्मश्री काकासाहेब कारखानीस
विजापूर

गुरुदेवांच्या अखेरच्या आजारात ते अतिशय क्षीण झाले होते. त्यांना बोलणेही शक्य होत नव्हते. तो सोमवार होता. नाम देण्याचा दिवस होता. मी तेव्हा निंबाळला होतो. गुरुदेवांची प्रकृती तपासण्यासाठी काही डॉक्टर्स मुंबईहून आले होते. डॉक्टर गुरुदेवांना तपासून बाहेर पडत असतानाच, मी गुरुदेवांच्या खोलीत शिरत होतो. मला पाहून डॉ. आजगावकर म्हणाले, "मला नाम घ्यायची इच्छा आहे. मी खरे तर त्याच उद्देशाने निंबाळला आलो आहे." मी त्यांचे कुलदैवत इत्यादींची चौकशी केली व गुरुदेवांकडे गेलो. ते व्हरांड्यात अत्यंत अशक्त झालेल्या अवस्थेत पडून होते. त्यांनी मला खुणेनेच मी येण्याचे कारण विचारले. मी त्यांना डॉ. आजगावकरांची इच्छा बोलून दाखवली. त्यांच्या अंगात बोलण्याची ताकदही नसताना, त्यांनी त्या दिवशी दोन-तीन लोकांना नाम दिले होते. तरी देखील त्यांच्या चेहेऱ्यावर स्मित - कदाचित शेवटचे स्मित - दिसले व त्यांनी मानेनेच संमती दर्शवली. मी डॉ. आजगावकरांविषयी सर्व सविस्तर परिचय करून दिला. नंतर त्यांनी डाव्या हाताच्या बोटांनी नाम लिहून दाखवले. मी पुन्हा ते त्यांना म्हणून दाखवून खात्री केली. मी नेहमीप्रमाणे नमस्कार करून डॉ. आजगावकरांकडे गेलो व त्यांना नाम दिले. अशारीतीने डॉ. आजगावकरांना नाम मिळाले. खरेच ! डॉ. आजगावकर किती भाग्यवान, की अशा परिस्थितीत त्यांना गुरुदेवांकडून नाम मिळाले आणि गुरुदेवांची धन्यता तर अवर्णनीयच आहे की इतक्या अशक्त अवस्थेत त्यांनी इतके कष्ट घेतले. खरंच. साधुसंत दुसऱ्यासाठीच जगतात.

❊❊❊❊❊❊❊❊❊❊❊

## ४७. वीरशैव साहित्यातील आध्यात्मिक आविष्कार

एकदा श्री. पी. जी. हलकट्टी, श्री गुरुदेवांना भेटून आदर व्यक्त करण्यासाठी विजापुरहून आले. (श्री. हलकट्टी हे वीरशैव साहित्याचे अध्वर्यू मानले जातात.) 'वचन' साहित्याचे ते पितामहच होत. त्यामुळे गुरुदेवांशी संभाषणात अर्थात हाच विषय त्या दिवशी होता. श्री गुरुदेव म्हणाले, "श्री. मणिकल यांचे Vacanas of Basava

(बसवेश्वरांची वचने) मी जेव्हा प्रथम वाचले, तेव्हा तुमच्या साहित्याचा परिचय झाला. त्याचे प्रकाशन, Indian Antiquary मध्ये प्रथम झाले होते, नाही का ?" श्री. हलकट्टी म्हणाले, "सर्व नाही, पण त्यातील काही भागाचे प्रकाशन झाले होते." मग श्री गुरुदेव म्हणाले, "तुमच्यामध्ये श्री अखंडेश्वर हे एक उत्तम वचनकार आहेत, नाही का ? ते काव्याशी तत्त्वज्ञानाची सांगड घालून, अध्यात्म चांगले मांडतात. आपल्याला महाराष्ट्रात व कर्नाटकात जितके आध्यात्मिक वाङ्मय वाचावयास मिळते, तेवढे क्वचित उत्तर भारतात मिळते. एक आध्यात्मिकपद शोधायला तिकडे शेकडो ग्रंथ चाळावे लागतात. कन्नड संत अध्यात्माकडे पुराणातून न जाता सरळ पोहोचले आहेत. Vacanaras हे सुद्धा प्रत्यक्ष अनुभवांचे वर्णन त्यांच्या साहित्यात करतात."

✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ४८. महान कार्यासाठी सांघिक शक्तीची गरज आहे

श्री. हलकट्टी श्री गुरुदेवांना, त्यांच्या, 'हिस्टरी ऑफ इंडियन फिलॉसॉफी' या पुस्तकाबद्दल विचारत होते. श्री गुरुदेवांनी पुस्तकाची तपशीलवार माहिती देऊन म्हटले, "पैशाची आणि कार्यशक्तीची कमतरता ही ग्रंथ प्रकाशनातील मोठी उणीव आहे. शिवाय चांगले सुशिक्षित लेखनिकही कमी आहेत." सातत्याने ग्रंथमालिका का प्रकाशित होत नाहीत, याचे कारण स्पष्ट करताना गुरुदेव म्हणाले, "लोकांना राजकीय, सामाजिक प्रगतीची काळजी फार. पण सांस्कृतिक, आध्यात्मिक प्रगतीची काळजी नाही. त्यामुळे अशा प्रकाशनांबद्दल ते उदासीन असतात." श्री गुरुदेवांनी तेथे आलेल्या एका साधकांना (बहुतेक अथणीचे म. श्री. देशपांडे) सांगितले की, त्यांनी पीएच. डी. साठी एखादा सांस्कृतिक विषयावर प्रबंध लिहावा. तो इंग्रजी व प्रादेशिक अशा दोन्ही भाषेत असावा. अलाहाबाद विद्यापीठात विद्यार्थ्यांला प्रबंध सादर करताना इंग्रजी बरोबर त्याचे हिंदी भाषांतरही सादर करावे लागते. हे जर आपल्याकडे असते तर, आपल्याही प्रादेशिक भाषा समृद्ध झाल्या असत्या.

✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ४९. बोधसुधे

श्री गुरुदेवांनी, श्री. हलकट्टी यांना, 'बोधसुधे'ची रचना कशी झाली या बद्दल असे सांगितले. त्यामध्ये श्री निंबरगी महाराजांची वचने आहेत. ते म्हणाले, " श्री निंबरगी महाराजांचे वैष्णव शिष्य श्री. रघुनाथाचार्य आद्य यांनी प्रथम श्री निंबरगी महाराजांची वचने

संग्रहित केली. निंबरगी महाराज दररोज आपल्या शिष्यांना, जी पारमार्थिक व नैतिक विचारांची शिकवण देत असत, (निरूपण रुपाने सांगत असत) त्यांचे संकलन म्हणजेच, 'बोधसुधे' हे पुस्तक होय. आम्ही फक्त ॲरिस्टॉटलच्या पद्धतीने हे विचारधन मांडले आहे. त्या विचारांची अधिकारवाणी व विचारांवरील मूळ पुरुषाची छाप आम्ही अजिबात बदलली नाही. किंबहुना तो मूळ ठसा जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच त्यात एकही नवीन विचार वाढवला नाही किंवा त्याचे रूपांतरण करून, त्याचे मूळ अधिष्ठान बदलले नाही. आम्ही फक्त हार गुंफणारा जसे फुले फक्त गुंफतो, तेच काम केले आहे. हे विचारधन थोडेफार ॲरिस्टॉटलच्या वैचारिक प्रवाहाशी मिळते जुळते आहे; पण खरे तर हे विचार त्याच्याही फार पुढे आहेत. कारण ॲरिस्टॉटलने फक्त नैतिक जीवनाचे मूलतत्त्व मांडले आहे, परंतु आचरणाची मूलतत्त्वे, आत्मानुभावावर आधारित असतात. परमेश्वराच्या साक्षात्काराच्या प्रकाशात जे कर्म केले जाते, ते सत्य व त्याबाहेरचे असत्य, हा आत्मिक मूलतत्त्ववाद प्रकर्षाने 'बोधसुधे'मध्ये आढळतो.

या नंतर गुरुदेवांनी एका साधकास, बाह्ययुद्ध (external conflict) आणि अंतरयुद्ध (internal conflicts) या नावाचे प्रकरण वाचण्यास सांगितले. ते वाचून झाल्यावर गुरुदेवांनी प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात कसे दोन्ही युद्धांना तोंड द्यावे लागते, हे सांगितले. संत तुकारामांनी हेच पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे - 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । आंतर्बाह्य जग आणि मन ।।' यानंतर, 'आचरणाची मूलतत्त्वे' हे पहिले प्रकरण वाचून घेतले. वाचन संपल्यावर गुरुदेवांनी विचारले, "आचरणाचे अंतिम तत्त्व कोणते ?" त्याचे उत्तर त्यांनीच दिले की, "परमेश्वराशी सामरस्य (communion), ऐक्य, याचेच नाव साक्षात्कार." परमेश्वराचे स्वरूप व साक्षात्कार होण्यास ज्याची आपल्याला मदत होते, ते सर्व नैतिक व बाकी सर्व अनीतिमान होय, असे स्पष्टीकरण पुढे गुरुदेवांनी केले. यावर श्री हलकट्टी म्हणाले, "हे तुमचे तत्त्व वैष्णवांच्या 'work is worship' शी मिळते जुळते आहे. गुरुदेव उत्तरले, "होय. थोड्या प्रमाणात. पण बराच वेगळेपणाही आहे. कोणतेही work हे worship होऊ शकत नाही. फक्त ज्या work मुळे परमेश्वराचा साक्षात्कार होण्यास मदत होते किंवा जे कार्य 'त्या'च्या प्रेरणेने होते किंवा 'त्या'च्या प्रकाशात होते, तेच work हे worship म्हणवून घेण्याच्या योग्यतेचे असते, अन्य नव्हे."

यानंतर श्री गुरुदेवांनी, 'देव हिरि गुरुराय, तिळियदे निन्न माय' हे पद म्हणण्यास सांगितले. हे श्री निंबरगी महाराजांचे पद, गुरुदेवांचे अत्यंत आवडते पद होय आणि ते गुरुदेवांना बोधसुधेच्या प्रारंभी घालायचे होते. जेव्हा गायक, 'कृतियु बेळगलि निन्न बेळकिनल्लि' या ओळीपर्यंत आला, तेव्हा गुरुदेव एकदम उद्गारले, "असे workच worship म्हणवून घेईल. Then only the action will be worship." आणि नंतर पुढील ओळ - निन्न करुणवे अन्न । निन्न करुणवे निरु । निन्न करुणवे उसिरु एनगागलि ।

(Let Thy Grace be my food, drink and my very life breath) म्हणताच गुरुदेव उद्गारले, "पहा, पहा, 'निन्न करुणवे उसिरु' हे फार महत्त्वाचे हं." आध्यात्मिक जीवनात एक श्वासदेखील मौल्यवान असतो. कोणास ठाऊक, त्या एका श्वासात देखील, परमेश्वराची कृपा त्या साधकावर होईल. परिक्षित राजाचा उद्धार सात दिवसात, तर खट्वांगाचा अडीच तासात झाला होता. माणसाला एक क्षण जरी मिळाला आणि त्याने एक श्वास जरी घेतला तरी त्याने ईश्वराचे आभार मानले पाहिजेत. कारण त्या क्षणात, त्या श्वासात, त्याला नामाने परमेश्वराचा साक्षात्कार होणे शक्य आहे. म्हणूनच कालिदासाने म्हटले आहे - क्षणमप्यवतिष्ठते श्वसन् यदि जन्तुर्ननु लाभवानसौ । एक क्षणभरसुद्धा ज्या मनुष्याला श्वास घेण्यास मिळतो, त्याने स्वतःला भाग्यवान समजावे.

## ५०. वियोगाचा क्षण आला

डॉ. पी. डी. खानोलकर ,
सोलापूर

असंख्य साधकांचे सद्गुरू - श्री गुरुदेव रानडे, विजापूर जिल्ह्यातील निंबाळ येथे ६ जून १९५७ रोजी समाधिस्थ झाले व त्यामुळे भारताच्या उत्तर-दक्षिण भागातील असंख्य साधकांच्या मनात पोकळी निर्माण झाली. मी त्यांच्या साधकांपैकी एक केवळ त्यांना गुरुस्थानीच नव्हे तर पितृस्थानी मानत असे. त्यांची बालकासारखी निरागसता, साध्याबद्दलची तीव्र कळकळ आणि साक्षात्काराचे अंतिम तत्त्व स्पष्ट करण्याची पद्धत ही कल्पनातीत होती.

त्यांच्या सर्व साधकांना, त्यांच्याबद्दल नैसर्गिक आपुलकी, जिव्हाळा, प्रेम होते. ते साधकांमध्ये कधीही, कसलाही भेदभाव करीत नसत. त्यांना जणू जगाचे भानच नव्हते. त्यांची प्रत्येक कृती जगन्नियंत्याच्या निर्देशनाबरहुकूम चाले. ते त्या परमेश्वराशी एकरूपच होते. साधकांच्या अडचणींचे निवारण करताना, ते जे मार्गदर्शन करत त्यात प्रत्येकाला नाविन्यच वाटायचे. जवळ जवळ जुलै १९५६ पासून ते जगापासून निवृत्त होत होत गेले. त्यांनी त्यांच्या जास्तीत जास्त कुवतीचा उपयोग भक्ती वाढविण्याकडे केला.

माझ्या सद्भाग्याने, गुरुदेव १६ मे १९५७ ला जेव्हा अलाहाबादहून आले, तेव्हा त्यांची प्रकृती तपासण्याची संधी मला मिळाली. ते अचानकच सोलापूरला आले. मला होटगी स्टेशनवरून निरोप मिळाला की, गुरुदेव संध्याकाळी पाच वाजता सोलापूरला येत आहेत. मी लगेच सोलापूरमधील साधकांना हे सांगितले. मला काही साधकांनी सांगितले की, गुरुदेव फार अशक्त झाले आहेत, म्हणून मी माझी हॉस्पिटल अँब्युलन्स आणि व्हील

चेअर घेऊन कारने होटगी स्टेशनवर पोहोचलो. श्री गुरुदेव फर्स्ट क्लासच्या डब्यात नेमात होते. मी डब्यात गेलो तेव्हा त्यांनी खुणेनेच मलाही नेमास बसा असे सांगितले. पंधरा मिनिटांनी लगबगीने ते उठले आणि गाडीतून उतरून भराभर चालू लागले. माझ्या गाडीतून माझ्या बंगल्यावर येताच ते मला म्हणाले, "पाहिलेत ! नेमामुळे कशी शक्ती येते ते !" माझ्या बरोबर काही साधकही होते. आम्ही सर्वांनी चहा घेतला आणि नंतर मी त्यांना तपासले. त्यांना खूप खोकला होता. त्यांच्या फुफ्फुसाच्या उजव्या भागत, congestion होते. त्यांचा एक्स-रे काढला. त्यातही त्यांचा पूर्वीचा टी. बी. चा कफ साठलेला दिसत होता. मी त्यांना अँटीबायोटीक्स दिली. पण त्यांनी औषधे घेतलीच नाहीत. ते रात्रीच्या ट्रेनने निंबाळला परत गेले. मी पुन्हा बारा दिवसांनी एक्स-रे मशीन घेऊन निंबाळला गेलो. त्यांची फुफ्फुसे स्वच्छ दिसत होती. त्यांना इतर अनेक नामवंत डॉक्टर्सनीही तपासले.

विशेषतः शेवटच्या तीन दिवसात जगापासून ते पूर्ण निवृत्त झाले होते. डॉ. पारिपत्यदारांनी त्यांना तपासले व त्यांचे शरीर पूर्ण रोगमुक्त असल्याचा निर्वाळा दिला. ते कोठा स्वच्छ राहण्यासाठी जुलाबाचे औषध घेत व कोठा साफ ठेवीत.

अशारीतीने आमचे सद्‌गुरू आपल्या शरीरावर पूर्ण नियंत्रण ठेवून, रोगमुक्त अवस्थेत, साक्षात्काराच्या अत्युच्च समाधीसुखात या जगापासून मुक्त झाले. त्यांच्या देहावसानाच्या काही क्षणच अगोदर, त्यांची नाडी नियमित होती व श्वास सामान्य होता. अशा तऱ्हेने श्री गुरुदेवांनी ६ जून १९५७ ला रात्री समाधी घेतली. श्री कबीरांच्या उक्तीनुसार - झीनी झीनी बीनी चदरिया, मी माझे शरीर जसे शुद्ध व स्वच्छ अवस्थेत मला प्राप्त झाले होते,त्याच अवस्थेत, हे परमेश्वरा ! तुला परत देत आहे. असे जणू त्यांनी कृतीने दाखविले.

श्री निंबरगी महाराजांच्या उक्तीनुसार - आप्पा गुरुराया, निंदु निनगे ओप्पितु - हे परमेश्वरा ! ज्या अवस्थेत तू मला हे शरीर दिलेस, त्याच अवस्थेत मी तुला ते परत करत आहे. हे श्री गुरुदेवांनी प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ब (१) तत्त्वज्ञानविषयक चर्चा
## (श्री गुरुदेवांच्या 'सिटिंग्ज'मधील)

### ५१. तत्त्वज्ञान आणि साक्षात्कारशास्त्र

आजच्या शास्त्रीय युगात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची गरज कोणती, याबद्दल एकदा श्री गुरुदेव म्हणाले, "आपल्याला आता पाश्चिमात्य विद्वानांशी मुकाबला करावयाचा आहे. म्हणून त्यांनी ज्या अस्त्रांचा उपयोग केला, त्यांच्याशी आपण परिचित असावे. समजा एखाद्या वकिलाशी आपल्याला वादविवाद करायचा असेल तर आपल्याला कायद्याचा अभ्यास नको का करायला ? म्हणून सध्याच्या युगात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची गरज निर्माण झाली आहे. खरे तर त्याची साक्षात्कारशास्त्रासाठी गरज नाही; परंतु आधुनिक युगातील बुद्धिनिष्ठ लोकांना साक्षात्काराचे समर्थन तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर करून देण्याची गरज आहे. दुर्दैवाने आपल्याकडील साक्षात्कारी संत तत्त्वज्ञानाच्या संपर्कात नाहीत. ही खरोखर मोठी खेदाची बाब आहे की, माझ्याकडील तत्त्वज्ञानाचे विद्यार्थीसुद्धा साक्षात्काराचे अत्युच्च मूल्य समजू शकत नाहीत. परंतु ही वस्तुस्थिती आहे की, जी नाकारता येत नाही. दुसरे म्हणजे, तत्त्वज्ञान हे असे एक कुंपण आहे की, जे अंधश्रद्धेसारख्या जनावरांना साक्षात्काराच्या क्षेत्रात प्रवेश करू देत नाही."

**********

### ५२. केवळ बौद्धिक ज्ञानाची अपूर्णता

एका 'सिटिंग'मध्ये एक दिवस एक साधक गुरुदेवांना म्हणाला, "आपल्यातील काही विद्वान असे मानतात की, 'सर्वं खलु इदं ब्रह्म' असे आहे तर आपल्या सर्व कृती या ब्रह्म्याच्याच आहेत. अर्थात ब्रह्माचे ज्ञान आपोआपच बौद्धिक ज्ञानाच्या पार्श्वभूमीवर झाले पाहिजे. मग रानावनात जाऊन तपश्चर्या करण्याचे प्रयोजन काय ? हा दृष्टिकोन कितपत बरोबर आहे ?"

श्री गुरुदेव म्हणाले, "हे चुकीचे आहे. सर्वं खलु इदं ब्रह्म' हे साक्षात्काराच्या अंतिम टप्प्यातील, शेवटच्या अनुभवाचे शाब्दिक रूप आहे. म्हणून त्याच्या आधारावर आपण तार्किक इमारत उभी करता कामा नये. आपली 'इंडक्टीव्ह' (Inductive) पद्धत आहे, 'डिडक्टीव्ह' (Deductive) नाही. आपल्याला जो सद्गुरूकृपेने छोटा अनुभव आला असेल, तोच वाढत वाढत 'सर्वं खलु इदं ब्रह्म'च्या भव्य अनुभवात त्याचे रूपांतर झाले पाहिले. तार्किक युक्तिवाद हा 'अनुभव' म्हणूनही कामास येत नाही. 'साधना' म्हणूनही

त्याचा स्वीकार करता येत नाही. शिवाय त्या 'सत्'तत्त्वाचे बौद्धिक ज्ञान वेगळे व त्याची प्रत्यक्षानुभूती वेगळी. म्हणून एकाची जागा दुसरे घेऊ शकत नाही. म्हणूनच साध्या बौद्धिक विवेचनाने त्या अंतिम सत्याचे साक्षात्कारातील ज्ञान होणे शक्य नाही. म्हणून तर्कशास्त्र हे साधनही होऊ शकत नाही आणि साक्षात्काराचे साध्यही ते गाठू शकत नाही. जास्तीत जास्त ते क्वचित थोडेसे पूरक म्हणून कार्य करू शकेल."

## ५३. विवेक आणि प्रतिभा

'विश्व म्हणजे परमेश्वर' या संकल्पनेबद्दल चर्चा करताना श्री गुरुदेव एकदा म्हणाले, "असे मानणे अत्यंत अपुरे होईल की, विश्व म्हणजे ईश्वर. कारण त्याचा अनुभव आला पाहिजे. या विश्वाला आपल्या ताब्यात ठेवून, विश्वातील सर्व हालचालींना मार्गदर्शन करणारी सत्ता समजावून घेण्यासाठी साधना केली पाहिजे. प्रत्येक वस्तूत परमेश्वर पाहण्यास व प्रत्येक घटनेत ईश्वर पाहण्यास फार वरच्या दर्जाची साधना लागते. याचा अनुभव घेतला पाहिजे. ईश्वर हाच विश्वाचा आदि व अंत आहे, हे अनुभवले पाहिजे. वैचारिक संकल्पनेपासून सुरुवात करून, प्रत्यक्षानुभूती पर्यंतचा प्रवास अत्यंत अवघड आहे, नव्हे तो जवळ जवळ अशक्यच आहे. कल्पनेपासून अंतिम 'सत्' तत्त्वाकडे पोहोचणे हे साक्षात्कारापेक्षा अधिक परतत्त्ववादातील तत्त्वासारखे वाटते. केवळ नामस्मरण हा एकच या सर्व बाबींचा उलगडा करून घेण्याचे सोपे साधन आहे.

## ५४. ईश्वरी अंशाची खोली कोण मोजू शकेल ?

सकाळचे आठ वाजले होते. श्री गुरुदेव काही साधकांबरोबर नेहमीप्रमाणे संभाषण करत होते. अचानक श्री निंबरगी महाराजांचे नातू, नागप्पा, जे तेथे, 'गुरुवे निम्मज्ञेयनु मीरदे नडेदवनु' हे पद भरदार आवाजात गात होते, त्यांना श्री गुरुदेव एकदम म्हणाले, "पहा, पहा ! देव देवतांनासुद्धा ईश्वरत्वाची खोली मोजता आली नाही. 'यस्यान्तं न विदु सुरासुरगणा'. मग मनुष्यप्राण्याबद्दल काय बोलावे ? त्याने आपल्या ज्ञानाचा गर्व कशासाठी वहावा ? असा कोण आहे की जो म्हणू शकेल की त्याने ईश्वराचा साक्षात्कार पूर्णपणे करून घेतला आहे ? क्वचित एखाद-दुसरा परमेश्वराच्या अनंत वैभवातील एखादा कण पाहू शकतो. मग एवढ्या साक्षात्काराच्या पातळीवरून माणसाने विनाकारण गर्व कशाला वहावा ?"

"देवाचे भक्त सर्व काळात, सर्व देशात, फार प्राचीन काळापासून जन्मले आहेत. वेळोवेळी प्रत्येक देशात अशा साधू-पुरुषांचे पुण्य पावन अस्तित्व होते. म्हणून भक्ती हा काही विशिष्ट देशांचा किंवा जमातींचा मक्ता नाही. तरीही उगाचच लोक धर्मांच्या नावाखाली भांडतात. वस्तुतः आध्यात्मिक जीवन हे एक क्षेत्र निदान असे असावे की, जे सर्व वादविवादांपासून मुक्त असेल. म्हणून याही क्षेत्रात वाद पाहिल्यावर आश्चर्य वाटत नाही का ? खरे तर हे वाद धार्मिक नसून, त्यांना राजकीय रंग असतो. लोक धर्मांच्या नावाखाली राजकीय युद्ध खेळतात."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ५५. वासनारहित चित्तात परमेश्वराचा वास

एकदा डॉ. वी. एस. कुळहळ्ळी (अथणी), श्री गुरुदेवांना भेटायला आले होते. ती त्यांची पहिलीच भेट होती. तरी श्री गुरुदेवांना असे वाटले की, हे फार जुने परिचित आहेत. त्यामुळे त्यांच्यातील संभाषण फारच मनमोकळे झाले. श्री गुरुदेव म्हणाले, "हे पहा, आपले क्षेत्र फार वेगळे आहे. परमेश्वर हाच सर्व जगाचा चालक आहे; मग राजकारणाचा तरी तो का चालक नाही ? एकदा त्याला आपण प्राप्त करून घेतले की, आपल्याला काय प्राप्त करून घेता येणार नाही बरे ?"

या नंतर श्री गुरुदेवांनी एका साधकाला तुकारामांचा पुढील अभंग म्हणण्यास सांगितले - सर्प भुलोनिया गुंतला नाद. या अभंगाचा भावार्थ असा - एखाद्या गारुड्याच्या पुंगीच्या नादाने जसा सर्प टोपलीत बंद आहे, तसा मी संसाररूपी टोपलीत अडकलो आहे. तुझ्या शक्तीने देवा, मला वाचव (बाहेर काढ). एखाद्या माशीने गोड पदार्थास चिकटावे, तसा मी संसारास चिकटून राहिलो आहे. मी माझे पंख जितके जास्त हलवतो, तितका मी जास्त जास्तच खोल जात आहे. माझे जीवनच त्यामुळे व्यर्थ जात आहे. तर देवा, तूच मला यातून बाहेर काढ. इतर संतांनीही अशाच भावना व्यक्त केल्या आहेत. पतंग, मासा, साप, मधमाशी आणि हत्ती हे एकेका विषयावर लुब्ध होऊन अडकून पडले आहेत; तर मानवप्राणी जो या पाचही (शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध) विषयांच्या बंधनात अडकला आहे, त्याची अवस्था काय असेल ? मानवाला मग या विषयांच्या आकर्षणापासून दूर ठेवण्यासाठी, सारखे जागृत करायला नको का ? मानवाला सतत परमार्थाची आठवण देणे जरुरीचे नाही का ? जेव्हा मानव विषयांच्या ओढीचा त्याग करेल,तेव्हाच त्याला ईश्वर दर्शन शक्य होईल. 'तुका म्हणे देह भरला विठ्ठले । काम क्रोधे केले घर रिते ।।' असे तुकाराम महाराज म्हणूनच म्हणतात. आळशी माणूस फक्त

वल्गना करतो - मी म्हातारपणी भक्ती करीन. महाराज म्हणत, "आयुष्य काय तुझे आज्ञाधारू ?"

❋❋❋❋❋❋❋❋❋

## ५६. भावना आणि विवेक

"भावना आणि विवेक यांचे परमार्थ साधनेत स्थान कोणते ?" असे एका साधकाने श्री गुरुदेवांना विचारले. तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "नेमासाठी दोहोंचा उपयोग आहे. भावनांचा विवेकाच्या नियंत्रणाशिवाय उत्कर्ष ठीक नाही. भावना हे पेट्रोल आहे, तर विवेक हे ड्रायव्हरच्या हातातील चक्र आहे. भावनांचा उत्कर्ष होऊन एखादा एकदम जोराने नेम करू लागतो. पण भावनांचा आवेग ओसरला की, नेम बंद पडतो. म्हणून भावनांवर सदसद्विवेकबुध्दीचे नियंत्रण असेल तरच साधना चांगली होते." तत्पूर्वी गुरुदेव म्हणाले, "मी भगवद्गीतेवर खूप अभ्यासू पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे."

❋❋❋❋❋❋❋❋❋

## ५७. नैतिकता व साक्षात्कार

एक दिवस 'सिटिंग'मध्ये एक पद गायले गेले. त्यामध्ये 'अनाहत नाद' व त्याचा साधनावर होणारा परिणाम, याचे वर्णन होते. त्यात एक ओळ अशी होती, 'मी अनाहत नाद ऐकू लागताच, माझे सर्व दुर्गुण आपोआप नष्ट झाले.' श्री गुरुदेव या बद्दल स्पष्टीकरण देताना म्हणाले, "नैतिकता व साक्षात्कार यांचा घनिष्ठ संबंध आहे. खरे तर ते परस्परावलंबीच आहेत. नैतिकतेमुळे साक्षात्कार वाढीला लागतो, आणि साक्षात्कारामुळे नैतिकतेला पूर्णता येते. जरा आपल्या दुर्गुणांकडे पहा. त्यांचा उगम विषयसुखात आहे. नैतिकता आपल्याला ह्या विषयसुख मोहापासून दूर करते व आपली इंद्रिये आणि मन ताब्यात ठेवते. अशारीतीने नैतिकता सद्गुणांचे संवर्धन करते आणि अखेर शरणागतीच्या अति उच्च सद्गुणांपर्यंत नेऊन पोहोचवते. परंतु भगवद्गीता सांगते त्याप्रमाणे, ज्ञानेंद्रिये आत्म्याचे ऐकत नाहीत. त्यांची वासना वाढतच राहते आणि आत्मदर्शनाखेरीज वासना नष्ट होत नाहीत."

"अशारीतीने आपण नैतिकदृष्ट्या शुद्ध झाल्याखेरीज, आध्यात्मिक जीवनात प्रगती करू शकत नाही व आत्मसाक्षात्कारही होत नाही आणि आत्मसाक्षात्कार झाल्याखेरीज आपल्या नैतिकतेला पूर्णता येत नाही. सकृतदर्शनी हा विरोधाभास आहे. नैतिकतेच्या सर्व अंगांमध्ये, साक्षात्काराचे अंग हेच सर्वात महत्त्वाचे आहे. खरे तर केवळ

नीतिमत्ता हीच साक्षात्काराची उंची वाढवण्याचे साधन आहे. म्हणून नीतिमत्ता म्हणजेच साक्षात्कार व साक्षात्कार म्हणजेच पूर्ण नैतिकता, अशी नैतिकतेची व्याख्या करता येईल."

## ५८. ध्यानगीता

डॉ. कुळहळ्ळी दुसऱ्यांदा निंबाळला आले होते. जेव्हा गुरुदेवांना हे कळविण्यात आले तेव्हा त्यांना तावडतोब श्री गुरुदेवांच्या खोलीत बोलावणे आले. ते खोलीत शिरताच गुरुदेवांनी त्यांचे हसून स्वागत केले व म्हणाले, "या डॉक्टर ! तुम्हाला पुष्कळ सिरीयस केसेस बघायला लागत असतील; त्यातून तुम्हाला इकडे यायला वेळ कसा मिळाला ?" डॉक्टर म्हणाले, "गुरुदेव, माझी स्वतःचीच केस फार सिरीयस झाली आहे, म्हणून मी इकडे आलो आहे. खळखळून हसत सिटिंग सुरू झाली. एका साधकाला 'ध्यानगीता' या पुस्तकातील काही भाग वाचण्यास सांगण्यात आला. तत्पूर्वी श्री गुरुदेव म्हणाले, "मी भगवद्‌गीतेवर खूप अभ्यासू पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. भगवद्‌गीता अभ्यासताना स्वतःचा अनुभव अत्यंत महत्त्वाचा. बाकीच्या गोष्टी तितक्याश्या महत्त्वाच्या नाहीत. आपण सर्वजण येथे मोकळ्या मनाने बसलो आहोत म्हणून मला गीतेबद्दलच्या माझ्या दृष्टिकोनाबद्दल एक गोष्ट स्पष्टपणे सांगावीशी वाटते. गीतेतील बाराव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे अव्यक्त 'अक्षर' आणि व्यक्त 'अहं' यांची तुलना केली आहे. खरे तर सगुण आणि निर्गुण यात काही फरक नाही. ईश्वर केवळ सगुणही नाही आणि निर्गुणही नाही. मग कोणाची पूजा करावी ? सगुणाची की निर्गुणाची ? गीताकालीन श्रीकृष्ण हा एक साक्षात्कारी संत होता. मग त्याला चार हात कशाला जोडावेत ? निर्गुणाची पूजा करता येत नाही. फक्त निर्गुणाचे ध्यान करता येते. म्हणून पूजा ही केवळ सगुण किंवा निर्गुण असत नाही. पण गीताकारांचे असे म्हणणे दिसते की, निर्गुणाचे ध्यान करून ईश्वरप्राप्ती शक्य आहे. पण केवळ बौद्धिक रचनेतून ईश्वरप्राप्ती शक्य नाही. तरी विद्वानांचे असे मत दिसते की, निर्गुणाचे ध्यान करावे. म्हणजेच शून्याचे ध्यान करावे. तेही असत्य शून्याचे. अशा पूजेतून सत्य शून्याचा साक्षात्कार होईल. शून्यामध्ये ध्यान कसे करावे, हे केवळ त्याचे अनुभवीच सांगू शकतील. तथापि, गीता त्यांचे वर्णन 'क्लेशोधिकतस्तेषां' असे करते.

यानंतर गुरुदेवांनी, गीतेतील बाराव्या अध्यायातील त्यांनी निवडलेले श्लोक वाचण्यास सांगितले. जेव्हा चौथा व पाचवा श्लोक वाचला गेला तेव्हा त्यांनी त्यातील कूटस्थ, अचल, ध्रुव ही विशेषणे केवळ अव्यक्तालाच नव्हेत तर देवाच्या निस्सीम भक्तालाही लावता येतील हे स्पष्ट केले. इंद्रिय दमनाशिवाय कोणतेच महान कार्य सिद्धीस

जात नाही. त्यांनी 'सर्वभूतहितेरताः' वरून, सर्वांना समान संधी, असेही स्पष्ट केले. 'ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्यस्त' हा श्लोक जेव्हा वाचला गेला, तेव्हा एका साधकाने प्रश्न केला की, समर्पण आणि ध्यान यातील कोणते प्रथम कोणते नंतर ? श्री गुरुदेवांनी उत्तर दिले, "ईश्वर साक्षात्कारानंतर (अखंड तीव्र नामस्मरणाने) खऱ्या अर्थाने ईश्वरार्पण (समर्पण) बुद्धी निर्माण होते. तरी प्रथमावस्थेत आपण थोड्या थोड्या समर्पण बुद्धीने भक्ती वाढविली पाहिजे. हाच या श्लोकाचा गर्भितार्थ आहे." 'तेषामहम् समुद्धर्ता' या श्लोकाचा अर्थ स्पष्ट करताना श्री गुरुदेव म्हणाले, "देव कोणाचे रक्षण करतो ? जे सर्व लक्ष ईश्वरकेंद्रित करून राहतात त्यांचेच, सर्वांचे नाही. जर एखादी व्यक्ती भ्रष्ट आचरणाची असेल, तर परमेश्वरही त्याचे रक्षण करू शकत नाही. जरी परमेश्वराजवळ शक्ती असेल तरी ती त्याने अशा व्यक्तींसाठी का वापरावी ? जर साधकाची श्रद्धा एका विशिष्ट उच्च पातळीपर्यंत पोहोचली तरच फक्त ईश्वर त्याचे रक्षण करतो. 'अचिरात्' या शब्दाचा येथे पारमार्थिक अनुषंगाने अर्थ घेतला पाहिजे. श्री निंबरगी महाराज म्हणत, जर आपले आचरण चांगले असेल तर ब्रह्मा, विष्णू, महेश हे तिन्ही देव एकत्र मिळूनही आपले वाईट करू शकणार नाहीत. या श्लोकाचा भावार्थ असा दिसतो की, (१) ईश्वराच्या साक्षात्काराचे कार्य म्हणजेच खरा संन्यास. (२) मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आत्मसाक्षात्कार हेच असून, त्यासाठी पूजा म्हणजे, 'नामस्मरण' होय. आपली स्वतःची दृढ श्रद्धा पाहिजे की, आपण फक्त ईश्वराचेच कार्य करीत आहोत. नामस्मरण ही एकमेव खरी पूजा आहे. नेहमी ईश्वर, संत किंवा साधना याबद्दलचेच विचार मनात असावेत. अशी कल्पना करा की, मी पापी आहे, ईश्वर परम दयाळू आहे. तुमच्या शंकासुद्धा फक्त ईश्वराबद्दलच्या असाव्यात. अशारीतीने तुमचे मन परमेश्वरावर दृढ करा. तुम्हाला तेही करता आले नाही तर संतांची सेवा करा. कारण संतसेवा ही खरोखरी ईश्वरसेवाच आहे. 'तस्मिन, तज्जते, भेदभावात्' म्हणजे ईश्वरामध्ये आणि त्याच्या भक्तांमध्ये काहीच फरक नाही. संतसेवेमध्ये केवळ नैतिक, मानसशास्त्रीय किंवा सामाजिक दृष्टिकोनाला महत्त्व नाही. हे खरे आहे की, 'नारायण असे विश्वीं'. परंतु, त्याच्या अस्तित्वाचा साक्षात्कार झाला पाहिजे. तरच आपली समाजसेवा ईशसेवा होऊ शकेल. अशारीतीने, (१) दृढ भक्तीने, (२) तळमळीच्या नामस्मरणाने आणि (३) संतसेवेने सत्कर्म घडून येते. हा ईश्वर साक्षात्काराचा मार्ग आहे. केवळ तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने तो गवसणार नाही. पाश्चिमात्य विद्वानांनी तत्त्वज्ञानाची व्याख्या - काळोख्या खोलीतील काळ्या मांजराचा शोध, की जे तेथे नाहीच, अशी केली आहे. यापेक्षा त्याची योग्यता आणखी कशी स्पष्ट करणार ?" संतसेवेबद्दल श्री गुरुदेवांनी पुढे असे सांगितले की, संत हे खरोखर ईश्वराचे रूपच होत आणि ईश्वर म्हणजे संत. म्हणून संतसेवा ही खरोखर ईश्वरसेवा होय. आपले रोजचे नामस्मरण हे संतसंगतीशी निगडित असावे, तरच त्याला चांगले फळ येईल. संतांच्या

संगतीतच आपल्याला नामाची महती कळते. जर आपण संतांच्या संगतीत बरेच दिवस राहिलो आणि त्यांच्या हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण केले तर संत ईश्वराशी कसे एकरूप झालेले असतात हे आपणास कळून चुकते.

माझे स्वतःचेच उदाहरण घ्या. १९०९ किंवा १९१० साल असावे. मी जेव्हा दररोज सात तास नेम करीत असे. सकाळी दोन तास, दुपारी एक तास, संध्याकाळी दोन तास आणि रात्री दोन तास (रात्री ११ ते १). मी नेटाने, एक मिनिटही वाया न घालवता नामस्मरण करीत होतो. जर मी पहाटे दोन वाजून अकरा मिनिटांनी उठायचे ठरविले तर गजराच्या घड्याळाशिवाय मी पहाटे बरोबर दोन वाजून अकरा मिनिटांनी उठत असे. एकदा श्री. लोकूर यांनी मला पहाटे ३-४३ वाजता उठवण्यास सांगितले, तर आश्चर्य म्हणजे, मी बरोबर ३-४३ ला उठलो व त्यांना उठवले. असे मानसशास्त्रीय चमत्कार त्या काळात घडत होते. अर्थात ते महत्त्वाचे नाही. त्या काळात एकदा मी इंचगिरीला गेलो होतो. श्री भाऊसाहेब महाराजांना माझी नेमाची पद्धत माहीत होती. तरी एक दिवस मला ते म्हणाले, "नुसता नेम करून काय उपयोग ? संतसंगती असेल तरच साधन सफल होते." श्री महाराजांचे हे उद्गार ऐकून मी अवाक् झालो. मला त्या उद्गारांचे महत्त्व समजून घ्यायचे होते. पण श्री महाराजांना विचारण्याचे धैर्य मला झाले नाही. ते फार कडक होते. म्हणून श्री महाराजांच्या उद्गारांचा अर्थ, महाराजांचे एक निष्ठावंत साधक श्री. नंद्याप्पा यांना विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले की, महाराज जेव्हा सप्ताहासाठी, परगावी जाण्यासाठी बाहेर पडतात, तेव्हा मी त्यांच्या बरोबर जावे. म्हणून पुण्यास येण्यापूर्वी मी जमखंडीला गेलो. कारण महाराज तेव्हा जमखंडीच्या जवळपासच्या खेड्यात सप्ताहासाठी गेल्याचे मला कळले. या सप्ताहात मी भाग घेतला. त्या काळात मी श्री महाराजांना जवळून पाहिले. त्याचा मला फार फायदा झाला. श्री महाराज अत्यंत नियमित (कट्टाचे) साधन करीत. श्री महाराजांचे साधन असे होते की, ते मिनिटा मिनिटाचा हिशोब करत. त्यांचा रोजचा नेम नऊ तासांचा होता. सकाळी तीन तास, दुपारी एक तास, संध्याकाळी तीन तास, रात्री दोन तास. ते क्वचितच झोप घेत. खरे तर त्यांना निद्रेची गरजच नव्हती. श्रावणात तर संपूर्ण महिना ते फक्त दिवसाला एक खारीक खाऊन रहात व इंचगिरीला असताना रोज फक्त अन्नाचे मोजके घासच खाऊन रहात. असे त्यांचे साधुमय जीवन होते. असे खडतर जीवन ते इंचगिरीला जगत. आठवड्यातून किमान एकदा ते श्री निंबरगी महाराजांचे दर्शन घेण्यास व त्यांच्या संगतीचा लाभ घेण्यास चुकत नसत. अशा रीतीने श्री निंबरगी महाराजांच्या संगतीचा लाभ त्यांना अखंड पंचवीस वर्षे लाभला."

एवढे बोलून श्री गुरुदेव खोलीतून काही काळ बाहेर पडले. परत आल्यावर त्यांनी गीतेतील, तेराव्या अध्यायातील त्यांचे वेचक श्लोक एका साधकाला वाचण्यास

सांगितले. त्यांचे वेचक श्लोक पाच भागात विभागले होते. त्यातील पहिल्या भागातील श्लोकांनंतर श्री गुरुदेव म्हणाले, "येथे अमानित्व या सारख्या सद्‌गुणाचे वैशिष्ठ्य, 'ज्ञान' या शीर्षकाखाली गीतेने घेतले आहे. ज्ञान हे गीतेने सद्‌गुण या सदरात घेतले आहे. 'ज्ञान म्हणजे शहाणपण' असे सॉक्रेटिस सांगतो. ज्ञान म्हणजे गणित किंवा विज्ञानातील ज्ञान नव्हे. खरे तर एकांतिक भक्तीच्या अंती 'ज्ञान' होते. जेव्हा सर्व सद्‌गुण एकत्रित दृश्यमान होतात, तेव्हाच खरा 'ज्ञानी' होतो. 'नहि ज्ञानेन सदृश्यम्.....' ज्ञान म्हणजे आत्मसाक्षात्कार. 'कृतिय बेळगलि निन्न बेळकनल्लि' असे कवी म. श्री. देशपांडे म्हणतात. प्रथम आपणांस 'आध्यात्मिक ज्ञान' झाले पाहिजे. नंतर कृती घडते. त्या खरोखर परमेश्वराप्रत केलेल्या 'कृती' होत.

नंतर दुसऱ्या गटातील श्लोक वाचण्यात आले. श्री गुरुदेव म्हणाले, "या श्लोकात 'ज्ञेय' याबद्दल वर्णन केले आहे. ते जे ज्ञेय आहे, ते चराचरात अंतर्बाह्य व्यापून आहे. ते जवळ आहे, तसेच ते दूर आहे. असे जे आत्मतत्त्व आहे, त्यातूनच सर्व विश्व निर्माण होते आणि त्यातच लय पावते. तिसऱ्या गटातील श्लोक त्यानंतर वाचण्यात आले तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "या श्लोकांत चार प्रकारच्या साधन मार्गांचे वर्णन आहे - १) ध्यान, २) सांख्य (ज्ञान), ३)कर्म, ४) भक्ती. आपण दररोज नऊ तास नेम केला पाहिजे. आपण निष्काम कर्म करून, आपल्या सद्‌गुरूवर पूर्ण श्रद्धा ठेवून असले पाहिजे. आपण परमेश्वराच्या स्वरूपाचे चिंतन व ज्ञान करून घेतले पाहिजे. आपले सद्‌गुरू परमेश्वराशी पूर्ण ऐक्य पावलेले असतात. उपनिषदाप्रमाणे - 'अनन्य प्रोक्ते गतिरत्र नास्ति'. सद्‌गुरूवर श्रद्धा ठेवून आपण निरंतर आचरण ठेवावे, म्हणजेच आपल्याला मुक्ती मिळू शकेल.

एका साधकाने विचारले, "साधन मार्गाचे चार प्रकार जे आहेत, त्यातील सर्वात श्रेष्ठ कोणता ?" श्री गुरुदेव म्हणाले, "खरे तर हे चार साधन मार्ग भिन्न नाहीत. श्री ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे, या चारी मार्गांचा मिळून एकच पंथराज होतो. केवळ 'ज्ञान' किंवा केवळ 'कर्म' याने काहीच साध्य होणार नाही. श्रद्धापूर्ण व शरणागत अंतःकरणाने केलेल्या नामस्मरणानेच खरी आत्मसाक्षात्काराची साधना घडून येईल. एकदा श्री. गुंडोपंत गदगकरांनी श्री बाबांना विचारले होते की, ज्ञान व कर्म यात जास्त श्रेष्ठ कोणते ? श्री बाबा म्हणाले होते, "त्यातील कोणतेच श्रेष्ठ नाही. फक्त देवच श्रेष्ठ आहे." हे ऐकल्यानंतर, "मी मुंबई विद्यापीठाच्या एम. ए. च्या विद्यार्थ्यांच्या पेपरात हाच प्रश्न घातला होता. कर्म हे ज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे की ज्ञान हे कर्मापेक्षा श्रेष्ठ आहे ? की ईश्वर साक्षात्कार हा दोघांपेक्षा श्रेष्ठ आहे ? तर केवळ कर्म व ज्ञान यांच्यामागे लागू नका. भक्तीच्या मागे लागा.

चौथ्या गटातील श्लोक जेव्हा वाचण्यात आले, तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "फक्त

'समदर्शन' शब्द अधोरेखित करा. 'समं पश्यन हि सर्वत्र' असे गीता सांगते. 'समं पश्यन' याचा अर्थ काय ? समं म्हणजे समान आणि सरळ. समं याचा अर्थ 'समरूप' आणि 'संपूर्ण'. जेव्हा देवाचे रूप सर्व प्राणीमात्रात व सर्व प्राण्यांवर सारखेच दिसते, तेव्हाच त्याला समदर्शन म्हणावे. एकदा श्री बाबांना 'समाधी' शब्दाचा अर्थ विचारला असता, ते म्हणाले होते, "समसमान वस्तू काणिसितु अन्दरे समाधी आगतद." बाह्य संवेदनेशिवाय अशी समाधी अनुभवता येते. तुकाराम म्हणतात, 'समचरण दृष्टी'. साक्षात्कारी संत सांगतात की, देवाचे असे चरण साक्षात्कारच्या अंतिम टप्प्यात दिसतात.

यानंतरच्या पाचव्या गटातील पुढील श्लोक वाचला - यदा भूतपृथग्भावं एकस्थमनुपश्यति । तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तथा ।। (xiii, 30) श्री गुरुदेव याचे विवेचन करताना म्हणाले, "संपूर्ण विश्व हे एकाच ठिकाणी केंद्रित झालेले आहे. तेथूनच सर्व जगाची उत्पत्ती झाली. तेच श्रेष्ठतम आत्मतत्त्व होय. त्याची प्रत्यक्ष अनुभूती ज्याने घेतली आहे, त्यालाच आत्मसाक्षात्कारी संत म्हणावे. त्यालाच सर्वकाही देवच करतो, याचा अनुभव येतो. श्री महाराज म्हणत, "आपण कर्त्यास ओळखले पाहिजे." देवच सर्व सत्ताधीश आहे. 'देवाच्या इच्छेने वर्तावे' म्हणजे सर्व द्वंद्वातून मुक्त होता येते. हे सर्व विषय नामस्मरणासाठी फार उपयुक्त आहेत. त्यांचे सतत मनन, चिंतन केले पाहिजे. आपले मानसशास्त्र आध्यात्मिक जीवनापुरते मर्यादित असावे. श्री बाबा म्हणत, "मी स्वप्नातसुद्धा भजन, आरती इ. करतो." अशा रीतीने अध्यात्म आपल्या जीवनाच्या अंगोपांगात पाझरत असले पाहिजे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ५९. आध्यात्मिक जीवनातील प्रगती

एकदा सिटिंगमध्ये, 'आध्यात्मिक जीवनातील प्रगती' या विषयावर चर्चा चालू होती. तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "हे पहा ! साक्षात्काराचा मार्ग अगदी सरळ नाही. तो नागमोडी आहे. तो वेटोळ्याचा आहे. आपण या मार्गावरून वाटचाल करताना समोर आपल्या दृष्टिपथात सुंदर दृश्य दिसणार आणि आनंद होणारसे वाटत असताना अचानक आपली वाट वळण घेते आणि ते दृश्य दृष्टीआड होते. त्यामुळे आपण खिन्न होतो. पण त्या सुंदर दृश्याची झलक आपल्याला पहायला मिळालेली असते. त्यामुळे त्याच्या स्मरणाने आपण पुन्हा सुखावतो, प्रोत्साहन मिळून शिखराकडे वाटचाल सुरूच राहते. अशा रीतीने, मधूनमधून मिळणाऱ्या उत्साहाने आपण आपल्या उच्चतम ध्येयाप्रत वाटचाल करीत राहतो."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६०. पारमार्थिक जीवनात प्रगती केव्हा शक्य आहे ?

साक्षात्कारातील प्रगतीच्यादृष्टीने अनुकूल वातावरण इत्यादी विषयावर चर्चा चालू असताना श्री गुरुदेव म्हणाले, "भक्ताला त्याची स्वतःची आध्यात्मिक प्रगती, हेच श्रेष्ठतम जीवनमूल्य आहे. त्याच्या देशाचे स्वातंत्र्यही नाही. आध्यात्मिक प्रगतीसाठी मनःशांती आणि समतोल वृत्ती आवश्यक आहे. क्रांतिकारक परिस्थितीं उपयोगाची नाही. एखाद्याच वेळी अचानक प्रतिकूल परिस्थितीत आध्यात्मिक प्रगती झाल्यासारखे वाटते, पण ते खरे नाही. ती तात्पुरती प्रगती असते, कायमची नाही. कायमची प्रगती शांत अवस्थेतच शक्य आहे. प्रतिकूल परिस्थितीत आलेला अनुभव, नंतर कित्येक वर्षे येत नाही.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६१. चक्रे व कुंडलिनी

एकदा श्री गुरुदेव मुंबईच्या डॉ. के यांना चक्रे व कुंडलिनीबाबत समजावून सांगत होते. ते म्हणाले, "योगामध्ये षट्चक्रांचे वर्णन आहे. तसेच कुंडलिनी व अमृतरसस्राव इत्यादीचे वर्णन आहे. त्याची सत्यता आपण आधुनिक विज्ञानाच्या प्रकाशात तपासून पाहिली पाहिजे. आपण त्याचा अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून, भावनावश न होता केला पाहिजे. आधुनिक शरीरशास्त्रज्ञ, मज्जातंतूंच्या जाळ्याचे अस्तित्व शरीरात असल्याचे मान्य करतात. तीच ही षट्चक्रे होत. त्यातील नाभीपाशी व हृदयापाशी असलेली चक्रे वस्तुतः ग्लॅंडस्च्या स्वरूपात अस्तित्वात आहेत. सहस्रदलचक्राचे अस्तित्व तर अधिकच गुंतागुंतीचा कूट प्रश्न आहे. कुंडलिनी असे काही स्वतंत्र अस्तित्व नाही. ज्ञानेश्वरीतील सर्पाकृती कुंडलिनी बहुशः काव्यात्मक आहे."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६२. आत्म्याचे स्थान

एका साधकाने एकदा श्री गुरुदेवांना विचारले, "गुरुदेव, काही संत म्हणतात की, आत्म्याचे स्थान आपल्या हृदयाच्या उजव्या भागात असते; आपले याबद्दल काय मत आहे ?" श्री गुरुदेवांनी उत्तर दिले, "हे खरे आहे की, उपनिषदामध्ये काही उतारे असे आहेत की, जे आत्म्याचे स्थान हृदयात दर्शवितात. अंगुष्ठमात्र पुरुषः मध्ये आत्मनितिष्ठति, असे कठोपनिषदात (१.१.१२), 'सर्वस्य चाहं हृदि संनिविष्ठः' असे भगवद्गीता (१५) सांगते. परंतु, आधुनिक मानसशास्त्रज्ञांनी आत्म्याचे स्थान मेंदूत

असल्याचे प्रतिपादन केले आहे (मेंदूतील पिट्यूटरी ग्लँडमध्ये). हृदयामध्ये आत्म्याचे स्थान, मेंदूतील आज्ञेनुसार परावर्तित केले जाते, असे फार तर म्हणता येईल.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६३. आत्मसाक्षात्काराच्या मार्गाचा एक दृष्टिकोन

श्री गुरुदेवांनी एकदा एका शिष्याला, एका संताकडून नुकतेच एका जर्नलमध्ये आलेले पत्र वाचण्यास सांगितले. त्यात लिहिले होते - "मानवी जीवनाचे 'अत्युच्च' अनुभवण्याचे एक ध्येय असते, आपले अत्युच्च कर्तव्य ईश्वरसाक्षात्कार....."

ईश्वरसाक्षात्काराबद्दल, त्या मार्गाबद्दल त्यात पुढे असे लिहिले होते की, 'ईश्वरसाक्षात्कार दोन केंद्रांवर केंद्रित करून साधता येईल - (१) हृदय, (२) मेंदू. अशारीतीने एकाग्रता साधण्याने, नवीन आत्मशक्तीचा स्रोत वाहू लागेल. पहिली प्रक्रिया प्रथम सुरुवात करण्यास सोपी आहे. दुसरी थोडी अवघड आहे; पण जास्त महत्त्वाची आहे.' या मुद्यापाशी श्री गुरुदेव म्हणाले, "होय, हे खरे आहे. परंतु जेव्हा आत्मशक्ती त्या जीवनाला व्यापून सर्वंकष होते, तेव्हा या दोहोतील फरक संपुष्टात येतो. आत्म्याची हृदय व मेंदू यातील सापेक्ष स्थाने उपनिषदांमध्ये पूर्णतः वर्णिलेली आहेत. त्याच पत्रात, डोक्याच्या वरील केंद्रातून 'अनंतत्त्वाचे अवतरण' याबद्दल एक उल्लेख होता. त्याबद्दल श्री गुरुदेव उद्गारले, "होय, ते रेडियोसारखे आहे. शक्तीचे आपल्यामध्ये येणे हे ती शक्ती पाठविण्याच्या तुलनेने सोपे आहे. परंतु प्रेषक केंद्र होणे फार अवघड आहे. त्या व्यक्तीला न कळतच शक्तीचे प्रेषण होते असते. जर त्या व्यक्तीला ज्ञात होऊन ते प्रेषण होऊ लागले, तर त्याचा अहंकार वाढेल; शिवाय प्रेषण शक्तीही कमी होईल. शिवाय साधकाला ते धोकादायक आहे."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६४. संमोहन आणि आत्मानुभव

विजापूरचे सिव्हील सर्जन डॉ. के हे एकदा संमोहन आणि आत्मानुभव यातील फरक श्री गुरुदेवांना विचारत होते. तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "संमोहन हे, करणारा व करून घेणारा, दोघांनाही धोकादायक आहे. ज्याच्यावर संमोहन केले जाते, तो आपले स्वतंत्र अस्तित्व गमावतो. शिवाय जन्मभर त्या स्मृतीने तो दुःखी होतो. त्याचा विवेक, तसेच एखाद्याच्या संमोहन प्रभावाखाली राहणे हे अत्यंत धोकादायक असते. संमोहित व्यक्ती कायम एखाद्या भितीच्या दडपणाखाली असते. थोडक्यात त्याचे स्वतंत्र अस्तित्व

संपुष्टात येते. मी एकदा अशा व्यक्तीला विचारले, "या खोलीत किती व्यक्ती आहेत ?" ती व्यक्ती उत्तरली, "पंधरा." मी पुन्हा विचारले, "तुला धरून की वगळून ?" ती व्यक्ती उत्तरली, "मी सांगू शकत नाही." यावरून सिद्ध होते की, व्यक्ती तिचे स्वतंत्र अस्तित्व पूर्णपणे गमावते. याउलट आत्मिक अनुभव हे स्वतंत्र जागृतीचे क्षेत्र आहे. तो एक अनिर्वाच्य आनंदाचा अनुभव आहे. तो आनंद चढता वाढता असतो. त्यामुळे आपली मनःशक्ती दिवसेंदिवस वाढत जाते. सातत्य, सार्वत्रिकता, आनंद हे त्याचे निकष आहेत. संमोहन शक्ती वापरल्याने कमी कमी होत जाते, तर आत्मानुभव दिवसेंदिवस वाढत जातात.

## ६५. चमत्कारांचे स्वरूप

"चमत्कारांचे नेमके स्वरूप काय ? ते कसे घडतात ?" असा प्रश्न एका साधकाने श्री गुरुदेवांना विचारला. त्यावर श्री गुरुदेव उत्तरले, "हे पहा ! हा निसर्गाचा नियम आहे की, कारण आणि कार्य हे पाठोपाठ येतात. प्रत्येक कार्यामागे (परिणामामागे) कारण असतेच. परंतु या कार्यकारण मालिकेतील काही दुवे अज्ञात राहिले तर त्याला चमत्कार असे म्हणतात. असे चमत्कार वारंवार होत नसतात. आजचा रेडिओ हा कालचा चमत्कार होता, कारण त्याचे तंत्र अज्ञात होते. अतिनैसर्गिक (supernatural) शक्ती संतांना, त्यांच्या तपश्चर्येने प्राप्त झालेल्या असतात. त्यामुळे मधल्या काही पायऱ्या गाळून, ते एकदम वरच्या पायरीवर पोहोचतात. ज्या पायऱ्या गाळल्या जातात, त्यांना सामान्य लोक चमत्कार म्हणतात. आणखी एक प्रकारच्या चमत्काराशीही आपण परिचित आहोत. त्यांना मानसशास्त्रीय चमत्कार म्हणा. काही अतिनैसर्गिक शक्ती मिळविल्याने, संत त्यांच्या शिष्यांना, लांब राहून संदेश पाठवू शकतात किंवा भविष्यातील एखादी घटना घडण्यापूर्वीच कळवू शकतात किंवा दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखू शकतात. हे सर्व शक्य आहे. पण महाराजांची अशी धारणा होती की, 'रेड्यामुखी वेद वदविणे' किंवा 'भिंत चालवणे' या सारख्या निसर्गनियमाविरुद्ध गोष्टी घडणे शक्य नाही. यामुळे महाराज असे मानत की, ज्ञानेश्वरांच्या काळातील अशा गोष्टी (चमत्कार वर्णन) म्हणजे कविकल्पनेचा प्रकार आहे. याबाबत एका गोष्टीकडे मुद्दाम लक्ष वेधणे आवश्यक आहे. चमत्कार घडवून आणणे योग्य नाही. चमत्कार आपोआप झाले पाहिजेत. दैवी कृपा अवतरली पाहिजे. ती नेहमी अवतरते, केली जात नाही. कारण ज्या क्षणी संताच्या मनात ती करण्याचा अहंकार निर्माण होतो, तेथेच अहंकाराचा जन्म होतो. त्यामुळे खरे संत कधीही चमत्कार घडवून

आणण्याची भाषाही बोलत नाही. परंतु त्याचवेळी हेही सत्य आहे की, परमेश्वर संतांच्यामार्फत त्यांना ज्ञात न होता, चमत्कार घडवून आणत असतो.

✵✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ६६. नेमाची गुणवत्ता

एका साधकाने विचारले, "नेमाची गुणवत्ता कशी ठरवायची ?" यावर श्री गुरुदेव उत्तरले, "आपल्या नेमाच्या गुणवत्तेचे खरोखर आपणच परीक्षण केले पाहिजे. आपल्या नेमात आपल्याला उत्कट आनंद किती झाला व आपल्या हृदयातील आदर्श 'आनंदा'च्या तुलनेत तो किती पट होता, यावरून नेमाची गुणवत्ता मोजता येईल. सर्वसामान्यतः त्या आदर्श आनंदाचा फारच लहान हिस्सा आपल्या नेमाच्या आनंदाचा असतो. फारच क्वचित आपण आनंदाचा (bliss) साठ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुणवत्ता असलेल्या नेमात असतो." 'आनंदस्यमात्रामुपजीवंती' तथापि आनंदाची गुणवत्ता ही आपल्या अनुभवाच्या विस्तारावर अवलंबून नसते तर, अनुभवाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते.

✵✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ६७. आत्मानुभवात क्रम नसतो

एकदा, 'आत्मानुभव' हा विषय चर्चिला जात असताना, एका साधकाने विचारले, "गुरुदेव, विभिन्न संतांमध्ये आत्मानुभवांमध्ये समृद्धतेचे वैविध्य आढळते. तसेच त्या संतांना सारख्याच क्रमाने आत्मानुभव आल्याचे आढळत नाही. असे का घडते ? त्यात (आत्मानुभवात) काही विशिष्ट क्रम नसतो का ?" श्री गुरुदेव उत्तरले, "नाही. आत्मानुभवात काही विशिष्ट क्रम नसतो, मुळीच नसतो. प्रत्येक साधकाच्या आत्मानुभवांचा क्रम वेगळा असतो. आपल्याच संप्रदायातील संतांच्या आत्मानुभवांचे निरीक्षण करूया. श्री निंबरगी महाराज, श्री भाऊसाहेब महाराज, श्री बाबा, श्री शिवलिंगव्वा - सगळ्यांचे अनुभव वेगवेगळ्या क्रमात आढळतात. याचा अर्थ असा नाही की, त्या अनुभवात काहीच साम्य नव्हते. प्रत्येकजण भिन्न स्वभावाचे असल्याने, त्यांच्या स्वभावधर्मानुसार, प्रत्येकाचे अनुभव भिन्न होते, किंवा कमी अधिक तीव्रतेचे होते. तसेच या प्रश्नाचा विचार करताना, आपण आणखी एक चूक करण्याचा संभव असतो. अगदी अलीकडच्या काळापर्यंत अशी समजूत होती की, अध्यात्मातील अनुभवांची उत्क्रांती ही एका विशिष्ट रेषेत असते. पण तसे नसते. सॅम्युएल अलेक्झांडरसारखे आधुनिक तत्त्ववेत्ते

आणि इतर असे मांडतात की, अध्यात्मातील उत्क्रांती हीही अनेकविध मार्गी असू शकते आणि त्यांचे अगदी बरोबर आहे. जेव्हा एखाद्या बाँबचा स्फोट होते, तेव्हा त्याच्या ठिणग्या एकाच दिशेने उडत नसून, त्या एकदम सर्व दिशांना उडतात. तसेच आत्मानुभवांचे आहे. एखाद्या साधकाला सर्व आत्मानुभव एकदम येऊ शकतील; त्यामुळे आत्मानुभवातील क्रमाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६८. भक्ती उचंबळली पाहिजे

एक दिवस नेहमीचे 'सिटिंग' चालू असताना, एका साधकाने विचारले, "गुरुदेव, असे नेंहमी सांगतात की, बिंदू हे देवाचेच रूप आहे. मग असे असूनही आपल्याला बिंदुबद्दल देवासारखी भक्ती व आदर का वाटत नाही बरे ? तसे वाटावे म्हणून काय केले पाहिजे ? त्यावर गुरुदेव उत्तरले, "हे पहा ! एकाग्र ध्यानाने आणि श्रेष्ठ आध्यात्मिक अनुभवांनी, भक्तीची भावना अंतःकरणात आपोआप निर्माण व्हावी. ती कृत्रिमरीत्या निर्माण करता येत नाही. बिंदू तेथे सिंधू, हे बाबांचे वचन तुमच्या लक्षात नाही का ? बिंदू हा सिंधूचाच अंश आहे. आपण तत्त्वज्ञानामध्ये, प्रकारातील एकता, प्रमाणातील अनेकता, याबद्दल बोलतो. गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून बिंदू आणि सिंधूत एकता आहे, प्रमाणांच्या दृष्टिने त्यांच्या फरक आहे. गुणवत्तेच्या दृष्टिने भाताचे शीत आणि भात यात काही फरक आहे का ? पण प्रमाणाच्या दृष्टिने त्यांच्यात फरक आहे, हे मान्य केले पाहिजे, नाही का ? त्याचवेळी हे लक्षात घेतले पाहिजे की, बिंदू आणि भाताचे शीत यात मूलभूत फरक आहे. तो म्हणजे, बिंदुपासून देवाची अनेक रुपे तयार होऊ शकतात, परंतु, शितापासून भात तयार होऊ शकत नाही.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ६९. देवाचे राज्य (रामप्रेमपूर) आणि आध्यात्मिक लहरी

नेमाविषयी आणि आत्मानुभवाविषयी बोलताना श्री गुरुदेव एकदा म्हणाले, "देवाच्या कृपेनेच चांगला नेम होतो. देवाच्या राज्यामध्ये देवच भक्ताला आकर्षित करतो (ईशाकर्षण). वस्तूची शक्ती जसजशी वाढते, तसतशी नेमाची गुणवत्ता वाढते. ईश्वराचे राज्य (रामप्रेमपूर) किंवा Theotropism = Kingdom of God ची कल्पना मला नेमातच सुचली. या कल्पनेमध्ये इतर कल्पनांप्रमाणे मानसिक काही नसून, आत्मानुभवाचे तत्त्व आहे. आत्मसाक्षात्कारी व्यक्तीमार्फत आध्यात्मिक लहरी सर्वत्र पसरत असतात व

त्याचा जगावर परिणाम होत असतो. जसे, ध्वनिलहरी निर्माण होत असतात, पण त्या एकत्रित करण्याचे साधनाची (receiving set ची) गरज आहे, तशी आध्यात्मिक लहरींबद्दल नाही. तसे साधन अंतःस्थच असते. नामस्मरणाने माणसात तालबद्ध तरंग निर्माण होतात. त्यांच्यामुळेसुद्धा ध्वनिलहरींप्रमाणेच अनेकविध परिणाम दिसू शकतात.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७०. सगुण व निर्गुण यांचा समन्वय

एकदा श्री. डी यांनी एका मराठी पत्रिकेतील, श्री. के यांच्या परमेश्वराच्या सगुण-निर्गुण स्वरूपाबद्दल म्हटले व त्यांनी श्री गुरुदेवांच्या, 'मिस्टीसिझम इन महाराष्ट्र' चा संदर्भ देऊन लिहिले होते की, श्री ज्ञानेश्वर हे, 'पर्सनल गॉड' (Personal God) असे उपासक होते. यावर गुरुदेव हसून म्हणाले, "या लोकांना सगुण-निर्गुण यातील संबंध कसा कळणार ? एकदा डॉ. भांडारकरांनी मला विचारले होते की सगुण-निर्गुण यांचा समन्वय कसा साधावा ? मी ही त्यांना दिलेले उत्तर पटले होते. केवळ आत्मिक अनुभवांमुळेच हा समन्वय साधता येईल. ज्यांना असे अनुभव नाहीत, त्या बिचाऱ्यांना हे कसे समजावून देणार ?"

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७१. वस्तू एकमेव असते

"इतर पदार्थ दिसतात, तशी 'वस्तू'ही दिसते. मग इतर पदार्थ व 'वस्तू' यात फरक काय ? वस्तूला सत्यतत्त्वाचे प्रकटीकरण का मानावे ?" असे प्रश्न विचारले असता, गुरुदेवांनी पुढील प्रमाणे स्पष्ट केले. "वस्तू दिसणे व इतर पदार्थ दिसणे यात महदंतर आहे. इतर पदार्थ बाहेरून (बाह्य प्रेरणेने) दिसतात. वस्तू अंतःप्रेरणेने दिसते. बाह्य प्रेरणेने दिसण्यासाठी पदार्थ प्रत्यक्ष तेथे असावा लागतो. पण अंतःप्रेरणेचे तसे नाही. वस्तू अंतःप्रेरणेने दिसते. त्यामुळे बाह्य जगाशी तिचा काहीच संबंध नाही. ती अंतःस्फूर्त असते. एवढेच नाही तर, दोन्ही प्रकारच्या शारीरिक प्रक्रिया भिन्न आहेत. बाह्य जगातील पदार्थ दिसण्यासाठी, प्रकाशाची गरज आहे. डोळाही सर्वसामान्य स्थितीत असावा लागतो. तसेच डोळा उघडा असावा लागतो.

पण वस्तुदर्शनासाठी, यातील कशाचीच गरज नसते. वस्तू अंधारातसुद्धा दिसू शकते. वस्तू डोळे मिटूनही दिसू शकते. एवढेच नव्हे तर, आंधळ्यालाही दिसू शकते. लिंगप्पा सावळगी हा साधक एका डोळ्याने अंध होता. पण त्याला अंध डोळ्यालाही वस्तू

दिसत होती. ही खरी वस्तूच्या सत्यतेची कसोटी आहे. 'यत् दृष्टं तद् नष्टं' हा एक सुप्रसिद्ध विचार आहे. हा विचार बाह्य जगातील (नश्वर) पदार्थांसंबंधी आहे. वस्तूबद्दल हा विचार लागू नाही. एकाने, ज्याला वस्तू व इतर पदार्थ यातील भेद माहीत नव्हता, त्याने नेमका हाच प्रश्न बाबांना विचारला होता. पाश्चिमात्य मानसशास्त्रज्ञांनी अलीकडे एक नवा सिद्धान्त मांडला आहे. तो म्हणजे, संपूर्ण मेंदूच, पाहण्याचे, ऐकण्याचे, विचार करण्याचे कार्य करतो. त्यांच्या मते, मेंदूतील प्रत्येक पेशी पाहते. पाहणे हे कार्य काही मेंदूतील एका ठराविक केंद्राचे नाही. म्हणून कानांनी पाहणे व डोळ्यांनी ऐकणे अशक्य नाही. पण असे इंद्रियांमधील कार्यबदलाचे विशेषत्व हे आत्मिक अनुभवांनाच लागू पडते. पुरंदरदासांनी म्हटल्याप्रमाणे - तो डोळ्यांनी ऐकतो, कानांनी पाहतो."

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

# ७२. 'वस्तू'मधील आकर्षणाची शक्ती

एका साधकाने विचारले, "वस्तूमध्ये आपल्याला आकर्षून घेण्याची शक्ती, केव्हा निर्माण होईल ?" श्री गुरुदेवांनी उत्तर दिले, "वस्तूमध्ये ती शक्ती अगदी प्रथमपासूनच असते. आपल्या मनातील अशुद्धतेमुळे, आपल्याला त्या शक्तीची जाणीव होत नाही. आपल्या हृदयाचे (मनाचे) शुद्धीकरणास एकदा सुरुवात झाली की, आपल्याला वस्तूमधील शक्तीची जाणीव होऊ लागते व त्याप्रमाणे आपण तिला तसे प्रतिसाद देऊ लागतो. नाद व दर्शन या दोन प्रकारच्या आत्मानुभवांमध्ये नाद हा आपल्याला जास्त प्रभावित करतो. श्री शंकराचार्यांनी योगतारावलीमध्ये या अनाहत नादाबद्दल लिहिले आहे - नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यं । त्वां साधनं तत्वपदस्य मन्ये । भवत् प्रसादात् पवनेन साकं । विलीयते विष्णुपदे मनो मे ।।"

त्या अनाहत नादाबद्दल श्री तुकाराम महाराज म्हणतात - "जसा साप पुंगीच्या नादाने डोलतो, तसा मी तुझ्या प्रभावाने लुब्ध झालो आहे." अशी त्यामध्ये अंतर्गत शक्ती असते. दुसऱ्या एका प्रसंगी जेव्हा एका साधकाने अशी तक्रार केली की, त्याला आध्यात्मिक जीवनात रस वाटत नाही व वस्तूबद्दल आकर्षण वाटत नाही. तेव्हा श्री गुरुदेव उद्गारले, "भूक व संभोग याप्रमाणे धर्म ही सुद्धां एक अंतःप्रेरणा आहे. काही वेळा आध्यात्मिक भूक इतकी जबरदस्त लागते की, सर्व सोडून आपण नेमाला बसतो. चांगल्या नेमानंतरच ती भूक शमते. पण ही आध्यात्मिक भूक काहीजणात सुप्तावस्थेत असते, तर काहींच्यात ती प्रकट होते. काहींच्यात तीव्र असते, तर काहींच्यात ती मंद असते. ती तीव्र कशी करायची, हा प्रश्न आहे. खडतर साधनेनंतर वस्तू कायम झाली म्हणजेच खरी आध्यात्मिक भूक तीव्र होते. अधून मधून वस्तू दर्शनाने ती तीव्र होत नाही. वस्तू ही

आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली पाहिजे. नंतर आपण तिच्या आकर्षण क्षेत्रात शिरू शकतो.. एकदा हे घडले की, मगच आपली खरी आध्यात्मिक प्रगती सुरू होते. मग आपला आध्यात्मिक जीवनातील रस कमी होण्याचा वगैरे प्रश्नच उरत नाही. तोपर्यंत मात्र आपण फार दक्ष राहिले पाहिजे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७३. त्रिवेणी संगम

एकदा सिटिंगमध्ये बोलता बोलता असा विषय निघाला की, प्रयाग (अलाहाबाद) येथे गंगा, यमुना (प्रकट) व सरस्वती (गुप्त) असा तीन नद्यांचा संगम आहे. याबद्दल श्री गुरुदेव म्हणाले, "अध्यात्मामध्येही असा त्रिवेणी संगम आहे बरं का ! देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम. येथे सुद्धा गंगा, यमुना प्रमाणे दोन प्रकट आणि एक गुप्त आहे. सामान्यतः भक्त आणि नाम प्रकट (दृश्य) असतात आणि देव अप्रकट (गुप्त) असतो. तिसऱ्या अवस्थेमध्ये नाम आणि देव प्रकट असून भक्त अदृश्य होतो. श्री महाराज एकदा उद्‌गारले, "संत जरी या जगातून निघून गेला, तरी त्याने अनुभवलेले देवाचे रूप शिल्लक राहते." अशा रीतीने देव आणि नाम एवढेच राहतात. हा संगम फार वरच्या पायरीवरचा आहे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७४. शून्य (निर्बयलु)चा अनुभव

एकदा श्री गुरुदेवांना एक कानडी पद (कण्ण मुच्चिदरु काणबरुतद प्रणवस्वरूप) म्हणून दाखविले जात होते. त्यात एक ओळ अशी होती - 'ॐकार शब्द शून्यवागिदे' म्हणजे ॐकार शून्यामध्ये अदृश्य झाला आहे. याच ओळीचे दुसऱ्या ठिकाणी, 'ॐकार शब्दवु शून्यवागदे' म्हणजे, ॐकार शब्द शून्यामध्ये अदृश्य झाला नाही, असा होतो. मग यातील खरा कोणता ? हा प्रश्न जेव्हा चर्चिला जात होता, तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "काही लोकांचे असे मत आहे की, साधक आपल्या परमार्थ मार्गात जो जो प्रगती करतो, तो तो त्याला आलेला आकाराचा, नादाचा अनुभव अदृश्य (नाहीसा) होऊन त्याला फक्त, 'शून्या'चा अनुभव येतो. हा हठयोग प्रदीपिकेचा एक दृष्टिकोन आहे. ही गोष्ट माझ्या निदर्शनास आणली गेली तेव्हा मी, श्री भाऊसाहेब महाराजांना विचारले, तसेच श्री बाबांनाही याबद्दल निश्चित काय ते विचारले. तेव्हा दोघांचेही मत ठामपणे जे होते, ते असे

की, 'अनुभव मुळीच नाहीसे होत नाहीत, फक्त आपल्याला जेव्हा शून्याचा (spacelessness) अनुभव येतो, तेव्हा इतर अनुभव त्या काळापुरते बाजूला होतात."

***********

## ७५. आत्मसाक्षात्कारातील अत्युच्च अनुभव

प्रा. आर. बी. आठवले यांना आत्मसाक्षात्कारातील अत्युच्च आनंद याबद्दल जाणून घ्यायचे होते. तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "आपल्याला मेंदूतून अत्यानंदाचा अनुभव येतो. तीन प्रकारच्या संवेदना असतात - १) शारीरिक, २) मानसिक आणि ३) आध्यात्मिक. त्यांच्या मूल स्रोतांमध्ये फरक असतो. आध्यात्मिक आनंद एखाद्या कारंज्याप्रमाणे आतूनच अचानक निर्माण होतो. अंतर्गत संवेदनेबरोबर आपल्या मेंदूला जुळवून घ्यावे लागते. इतकेच नाही तर त्या प्रेरणेनुसार मेंदूला वागावे लागते. अशा रीतीने मेंदू हा अत्युच्च आत्मानंदाचा एक भाग्यशाली स्रोत बनतो. आपण अनाहत नादाचे उदाहरण घेऊ. येथे कानाचा पडदा अंतर्गतरित्या उत्तेजित होतो. नादाचा अनुभव येताना, बाह्य संवेदनेपासून आपण अलिप्त होतो. त्या आपल्या कानांवर काहीच परिणाम करीत नाहीत. जेव्हा अनाहत नाद तीव्र होतो, तेव्हा साधकाला बाह्य जगातील ध्वनी ऐकू येत नाहीत.

यावर प्राध्यापकांनी विचारले, "गुरुदेव समाधी म्हणजे काय ?" श्री गुरुदेव उत्तरले, "तसे समाधी म्हणजे केवळ मनाचा ईश्वरामध्ये लय. अत्युच्च आत्मानंदाचा अनुभव त्याच्याही पार पलीकडे असतो. त्यामध्ये तुम्ही देवाशी पूर्णतः एकरूप होता. म्हणजेच साधक व देव एकच होतात. श्री शंकराचार्यांचे असे मत आहे की, समाधी म्हणजेच ईश्वर. (सम्यक अधियंते चित्तं यास्मिन स देवः) परंतु, आपल्याला अत्युच्च आत्मानंद अनुभवता आला पाहिजे, तरच त्याला समाधी असे म्हणावे. पतंजली म्हणतात - योगः चित्तवृत्ति निरोधः (योग सूत्र १.१) द्रष्टुःस्वरुपेवस्थानम् वृत्तिःसारुप्यमित्स्त्रः, १.४) अत्युच्च आत्मानंद ही काही भावना नाही. सर्व भावना नष्ट झाल्यानंतरही ती नष्ट होत नाही. आत्मानंद हा ईश्वराचा अंश, नाही नाही, प्रत्यक्ष ईश्वरच असल्यामुळे, तो अखंड अस्तित्वात असतो. काही विद्वानांचे असे मत आहे की, आपण पंचकोशांच्या पलीकडे जाऊ शकत नाही. पण हे केवळ तात्त्विक वाटते. गीतेतील ब्रह्मनिर्वाणाची अवस्था, आनंद आणि निरानंद यांचे एकीकरण आहे. म्हणजेच तो अत्युच्च आत्मानंद म्हणता येईल. आपल्याला तो अत्युच्च आनंदच पाहिजे. त्या पलीकडे कोणत्याही स्थितीबद्दल आपल्याला काहीही बोलावयाचे नाही.

***********

## ७६. जिभेवरील अमृत

रामदास संप्रदायाचे कट्टर अनुयायी श्री. गोविंदबुवा मराठे, कोल्हापूरजवळ पावनगड येथे रहात होते. त्यांनी एकदा मला लिहून कळविले की, ते हठयोग प्रदीपिकेतील सूचनांबरहुकूम वागतात. त्यांनी जिभेचे मुळाकडील टोक कापून - अशा तऱ्हेने जिभेची लांबी वाढवून - जीभ नाकाच्या पोकळीत घातली, ज्यामुळे मेंदूतून उतरणारा मधू (अमृत) जिभेद्वारे चाखता यावा. परंतु प्रत्यक्षात तसे काही अमृत त्यांना चाखता आले नाही. म्हणून त्यांनी पत्रात श्री गुरुदेवांना या बद्दलचे कारण विचारण्यास, मला लिहिले होते.

मी निंबाळला गेलो आणि दुपारच्या सिटिंगमध्ये ते पत्र वाचले. ते ऐकताच श्री गुरुदेव म्हणाले, "काय भयंकर प्रकारे हे लोक वागतात हो ! नंतर मी श्री गुरुदेवांना श्री. गोविंदबुवांना काय कळवू, असे विचारले तेव्हा ते म्हणाले, "अहो ! अमृताचा अनुभव वगैरे नामस्मरणावाचून येणार नाही, जीभ कापून वगैरे भयंकर मार्गाने तर मुळीच नाही." त्याप्रमाणे मी श्री. गोविंदबुवांना लिहिले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. काही दिवसांनंतर मला एका पोलीस इन्स्पेक्टरकडून कळले की, गोविंदबुवांनी स्वतःला जिवंत जाळून घेतले. ज्ञानेश्वरांनी गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या टीकेत लिहिले आहे की, अमृताचा अनुभव नामस्मरणाने येतो. त्याचाच उल्लेख पुढे नवव्या अध्यायात आहे. श्री गुरुदेवांनी अमृतरसाच्या अनुभवाबद्दल, श्री कबीरांच्या शब्दात, 'पाथवे टू गॉड इन हिंदी लिटरेचर'मध्ये लिहिले आहे. श्री तुकारामांनीसुद्धा - नाम घेता मन निवे । जिव्हे अमृतचि स्रवे ।। या अभंगात अमृताच्या अनुभवाबद्दल लिहिले आहे. श्री गुरुदेवांना अमृताचा अनुभव होता हे वेगळे सांगणे आवश्यकच नाही. त्यांना ज्याचा अनुभव नव्हता, असे त्यांनी काही लिहिलेच नाही. किंबहुना असे लिहिणे ते पाप समजत होते. त्यांनी त्यांच्या जवळच्या लोकांजवळ स्पष्ट सांगितले होते की, त्यांना अनुभवाला न आलेली एकही गोष्ट त्यांनी आपल्या पुस्तकातून लिहिली नाही. श्री गुरुदेव हे अमानित्वाचे जिवंत उदाहरण होते. त्यामुळे हा 'माझा' अनुभव असे त्यांनी कधीच लिहिले नाही. त्यामुळे त्यांचा स्वतःचा अनुभव ते इतर संतांच्या तोंडी घालून लिहीत असत. म्हणून श्री गुरुदेवांची पुस्तके हेच त्यांचे आत्मचरित्र होय, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७७. माझे तत्त्वज्ञान

एकदा श्री गुरुदेवांना तुमचे तत्त्वज्ञान काय, असे विचारले गेले. तेव्हा ते म्हणाले, "मी जसे जगतो, तेच माझे तत्त्वज्ञान. माझ्या आत्मानुभवांनी माझी पक्की खात्री

झाली आहे की, ईश्वर आहे. मला त्यामुळे निश्चितपणे पटलेले आहे की, सत्य फक्त ईश्वरच आहे. देह, विश्व इत्यादी सर्व असत्य आहे. जो आध्यात्मिक अनुभवांमध्ये स्थिर झाला आहे तो स्थितप्रज्ञ, या अर्थाने मला स्थितप्रज्ञ म्हणता येईल. परंतु माझ्या वर्तनावरून तसे वाटणार नाही. माझ्या आध्यात्मिक अनुभवांचा पूर्ण अंशाने परिणाम माझ्या वर्तणुकीवर झाला नाही. मला अजूनही राग येतो. तो बहुतेकवेळा माझ्या अशक्तपणामुळे असतो. आंतरिक अनुभव बाह्य शांत वृत्तीत प्रतीत होतो. आतला अनुभव महत्त्वाचा आहे. केवळ बाह्य शांत वृत्ती काय कामाची ? बाह्यतः शांत असणारे कितीतरी अपारमार्थिक लोक आपण पाहतो. पण अशा वरपांगी शांततेपेक्षा आध्यात्मिक (शांतीचा) अनुभव अनंत पटीने श्रेष्ठ आहे. माझी शांती ही काही प्रयत्न साध्य नाही; तर आध्यात्मिक अनुभवातून माझ्या बुद्धीमध्ये प्रतिबिंबित झालेली ती शांती आहे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७८. एक विलक्षण दृश्य

१९०८ मध्ये एकदा श्री गुरुदेव, प्रो. वुडहाऊस, श्री. भडभडे, श्री. विष्णुपंत करंदीकर, प्रो. वुडहाऊस यांच्या बंगल्यावर कार्लाईल Sartor Resartus बद्दल चर्चा करीत होते. तेव्हा श्री गुरुदेवांनी सहज खिडकीतून बाहेर पाहिले असता (ती खिडकी आळंदीच्या बाजूला होती), त्यांना आकाशापर्यंत जाऊन भिडणारा, प्रकाशाचा प्रचंड स्तंभ अचानक दिसला. साहजिकच श्री गुरुदेव खुर्चीतून एकदम उठले आणि त्यांच्या पाठोपाठ बाकी सर्वजणही उठले, तेव्हा सर्वांनाच, दोन ते तीन मिनिटे तो प्रकाशाचा स्तंभ दिसला. हळुहळू तो प्रकाश मंद मंद होत दिसेनासा झाला. प्रो. वुडहाऊस म्हणाले, "माझे आध्यात्मिक जीवन आज सुरू झाले." श्री गुरुदेव या दृश्याविषयी बोलताना म्हणाले, "मी त्या काळात बराच वेळ नेम करीत नसे. तथापि, माझी चित्तशुद्धी बरीच झाली होती. लोकमान्य टिळकांचा तुरुंगवास व गढूळ राजकीय जीवन, यामुळे माझे हृदय कोमल झाले होते. यामुळे तो प्रकाश दिसला असला पाहिजे. जेव्हा आपले चित्त शुद्ध होते, तेव्हा आपल्याला देव दिसतो. केवळ ध्यानामुळे ईश्वरदर्शन होईलच असे नाही. चित्तशुद्धी आणि तळमळ यावर आध्यात्मिक अनुभव येणे अवलंबून आहे. १९०८ मध्ये मला पुस्तकावर तेजःपुंज तारे दिसत असत, त्यामुळे मला वाचता येत नसे. मला विविध रंगांच्या तारकांचे पुंज पुस्तकातील अक्षरांवर दिसत. आध्यात्मिक प्रकाशामुळे, इतर वस्तू दिसेनाशा होतात. आध्यात्मिक नादामुळे इतर नाद ऐकू येत नाहीत.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ७९. आध्यात्मिक जीवन आणि शरणागती

श्री गुरुदेव म्हणाले, "आध्यात्मिक शक्ती काय आहे ? तिचा अनुभव येणे आणि ती पचविणे म्हणजे आध्यात्मिक जीवन जगणे होय. ही शक्ती जाणल्याशिवाय खरी शरणागती शक्य नाही. ती शक्ती निश्चितपणे जाणता येते." अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेनच प्रव्यथितम् मनो मे ।(भ. गी. ११.४५) अर्जुन म्हणतो की, त्या अनुभवाने मी भयचकित झालो. आध्यात्मिक जीवन भिती व आनंद यांचे मिश्रण आहे. त्या शक्तीच्या उमगण्याने स्वार्थीपणा नष्ट होतो आणि भितीचे रुपांतर शरणागतीत होते. जर तुम्हाला त्या शक्तीशिवाय आपला हातही उचलता येणार नाही असे वाटले, म्हणजे सर्व दृष्टिने तुम्ही शरण जाल."

✲✲✲✲✲✲✲✲✲✲

## ८०. श्री गुरुदेवांचा नाम देण्याचा अधिकार

ती घटना १९२० सालातील आहे. आम्ही चौघे, श्री बाबा, श्री गुरुदेव, जगन्नाथ लेले आणि मी (काका कारखानीस), इंचगिरीला होतो. एक दिवस मी माझ्या खोलीत होतो. (तुकाराम सुतारच्या खोलीत) आणि गुरुदेव खोलीत आले. ते मला म्हणाले, "माझ्या कानापाशी काही गोंगाटासारखा, अस्पष्ट शब्दांचा ध्वनी ऐकू येत आहे. काय असावे बरे हे ?" मी म्हणालो, "मी काय सांगणार ? श्री महाराजच सांगू शकतील." मी तरी काय बोलणार ? त्यानंतर सात आठ दिवसांनी गुरुदेव पुन्हा खोलीत आले आणि मला म्हणाले की, तो गोंगाटासारखा अस्पष्ट शब्दांचा ध्वनी आता जास्त स्पष्ट झाला आहे. निरनिराळ्या धर्मातील ती नामे होती. रात्रीचे भजन झाल्यावर श्री बाबांच्या खोलीत जमण्याचा तेव्हा इंचगिरीला प्रघातच होता. त्यादिवशीही आम्ही जमलो होतो. श्री गुरुदेवांनी श्री बाबांना नामे ऐकू येण्याविषयी सांगितले. ते ऐकून बाबांना अतिशय आनंद झाला. ते पुढील वाक्य बोलले - निन्न नामक्के नाम आगेद. इन्न नाम कोडलिक्के अड्डी इल्ल-ईग एष्टो मंदी नाम कोडतार - अवरिगे हिंग नाम आगेद एनु ? (तुला नामाला नाम झाले आहे. आता तुला नाम द्यायला हरकत नाही. हल्ली किती तरी लोक नाम देतात. त्यांना काय असे नामाला नाम झाले आहे का ?) अशा रीतीने नामाला नाम झाले म्हणजे ते 'सबीज नाम' होय. असे नाम देवाकडून आलेले असते. त्यात पुन्हा परिस्फोट होण्याची शक्ती असते. परंतु श्री बाबांच्या निर्याणानंतरही श्री गुरुदेव तीन-चार वर्षे नाम देत नव्हते. अशा रीतीने नामाला नाम होऊन सतरा अठरा वर्षांपर्यंत श्री गुरुदेवांनी नाम दिले नाही.

✲✲✲✲✲✲✲✲✲✲

## ८१. श्री गुरुदेवांचा नेम

श्री गुरुदेवांनी एकदा आपल्या जवळच्या साधकांना, स्वतःच्या नेमाबद्दल सांगितले, "माझा नेम जोरात चालू असताना, मला नेम सोडून उठावेसेच वाटत नाही. ती एक प्रकारची नशाच आहे. त्या अवस्थेत साधक, 'बालोन्मत्त पिशाच्चवत्' असा वागतो. ज्या मधमाशीला मधाची गोडी लागली ती तो सोडणार नाही." अलाहाबादला होणाऱ्या नेमाची गुणवत्ता, निंबाळला होणाऱ्या नेमापेक्षा कमी प्रतीची असते. माझे अलाहाबादला विश्वविद्यालयीन कामकाज बरेचसे नियमित असते. या कोटेकोरपणामुळे साधनात अडथळा येतो. निंबाळला तीन महिन्यात माझ्या संपूर्ण परमार्थाची किंवा पारमार्थिक अनुभवांची उजळणी होते. श्री महाराज दासबोधातील पुढील ओव्या सांगत - मागे उजळणी पुढे पाठ । नेम करावा निकट । बाष्कळपणाची वटवट । कामा नये ।। या वर्षी (१९४३ मध्ये) निंबाळला मी तीन महिने पारमार्थिक अनुभवांच्या अत्युच्च आनंदात घालविले. त्याला सीमा नाही. या वर्षी मी मध्यरात्री किंवा पहाटे बारा वाजता उठून कित्येक तास नेम करत असे.

***********

## ८२. शांती व आनंद

एका साधकाने एक दिवस चर्चेच्या ओघात, शांती व आनंद यातील संबंध विचारला असता श्री गुरुदेवांनी सांगितले, "शांती व आनंद या विरोधी भावना आहेत. शांतीमुळे (चित्ताची) समता प्राप्त होते, तर आनंदामुळे चित्ताची उर्ध्वगामी अवस्था होते. (Anatropic, Metratopic, Catatropic.) अशा तीन अवस्थांमधील, पहिल्यामुळे उर्ध्वगामित्व, तर दुसऱ्यामुळे समता व तिसऱ्यामुळे उदासीनता. शांती व आनंद यात श्रेष्ठतर कोणते, हे सांगणे कठीण आहे. काहींना देव शांती देतो, तर काहींना आनंद देतो. दोन्ही अनमोल आहेत. परंतु त्यांची प्राप्ती, परमेश्वराच्या साक्षात्कारातून झाली पाहिजे. केवळ सरावाने होऊन उपयोगी नाही. शांती व आनंद या दोहोंचे एकाच संतात आढळणे क्वचितच असते. आज सकाळी एका गरुडाप्रमाणे, 'आनंद' या भावनेने (नेमात) भरारी घेतली. जेव्हा असा आध्यात्मिक आनंद अवतरतो आणि व्यापून राहतो तेव्हा आध्यात्मिक शक्ती, शांती, आनंद याने सारे विश्व भरल्यासारखे वाटते. या शक्तीचे निसर्गामध्येही संक्रमण होते. गेल्या वर्षी (१९४३ साली) अलाहाबादला जाताना, सतना रेल्वे स्थानकावर मला वरील अनुभव आला.

***********

# ८३. भविष्यातील घटनांबद्दल (नेमात) दर्शन

प्रा. ए यांनी भविष्यातील घटनांचे दर्शन होऊ शकते का ?" असा प्रश्न विचारला असता, श्री गुरुदेवांनी उत्तर दिले, "होय ! असे दर्शन होऊ शकते. महाभारतामध्ये श्रीकृष्णाला असे दिसायचे. जेव्हा अर्जुनाने युद्धाच्या विजयाविषयी शंका व्यक्त केली, तेव्हा श्रीकृष्णाने त्याला आश्वासन दिले की, 'मी आधीच ते दृश्य पाहिले आहे. तू युद्ध कर आणि विजय प्राप्त कर.' थोडी वाट पहा पण असे दिसते का पहा, फक्त त्याबद्दल कल्पना करीत बसू नका. खरे तर देवाशी एकांतिक भक्ती साधल्याने, आपल्यामध्ये आध्यात्मिक शक्ती खरोखर उतरते व त्यामुळे आपल्याला भविष्यातील कळू शकते. अशा आध्यात्मिक शक्तीच्या बळावरच श्री समर्थ रामदासांना असे भविष्य दिसत होते. त्याचे वर्णन त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे -

राम वरदायिनी मात । गर्द घेऊनि उठली ।
मर्दिले पूर्वीचे पापी । आनंदवनभुवनी ।।
प्रत्यक्ष चालली राया । मूळमायासमागमे ।
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनी ।।

हे सर्व आपल्या देवाशी भक्तीच्या कोटीवर अवलंबून असते. देवाच्या कृपेला काय अशक्य आहे ? एका आध्यात्मिक अणूच्या स्फोटाने संपूर्ण विश्व बदलेल. संपूर्ण विश्व चालविणारी ती सत्ता आपल्यामध्ये उतरली पाहिजे. अशी भक्ती केवळ एका व्यक्तीमध्ये असली तरी पुरे ! दुर्योधनाने श्रीकृष्णाकडे संपूर्ण सैन्य मागितले, तर अर्जुनाने श्रीकृष्णालाच मागितले. जेथे परमेश्वर आहे, तेथे विजय असलाच पाहिजे ! म्हणून अर्जुनाला विजय मिळाला. खरोखर आपले ध्येय साध्य करायला एकटा परमेश्वर पुरेसा आहे. म्हणून आपण अंतिम सत्याच्या शोधार्थ प्रयत्न केले पाहिजेत. आपण केवळ परमेश्वराच्या रुपाची कल्पना करून उपयोगाची नाही. आपण ते प्राप्त करून घेतले पाहिजे. मग आपल्याला, 'त्याची' इच्छा आणि भविष्याबद्दलही कळेल. जरी संपूर्ण भविष्य डोळ्यापुढे एकदम आले नाही तरी, भविष्यातील घटनाशक्तीच्या स्वरूपाची चुणूक निश्चितच दृग्गोचर होईल.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

# ८४. आध्यात्मिक शक्तीचे स्वरूप

एक दिवस एका साधकाने श्री गुरुदेवांना आध्यात्मिक शक्तीचे स्वरूप विचारले, तेव्हा श्री गुरुदेव म्हणाले, "आम्हाला एवढेच माहीत आहे की, आध्यात्मिक शक्ती अनंत

आहे, शाश्वत आहे, विश्व त्यातूनच निर्माण होऊन त्यातच लय पावते. पण असे का घडते, त्याचे स्पष्टीकरण मात्र देता येत नाही. नामाचे ध्यान करणे म्हणजे ती आध्यात्मिक शक्ती निर्माण करणे, विकसित करणे आणि स्वतःमध्ये ती शक्ती स्थिर करणे. ही आध्यात्मिक शक्ती आत्मा, ईश्वर, देव, सत्-तत्त्व सर्व एकच होत. ही आध्यात्मिक शक्ती आपल्यामध्ये निर्माण होते तेव्हा, ती मेंदूतील केंद्रावर परिणाम करते व त्या केंद्राद्वारा आपल्याला अतिंद्रिय अनुभव - नाद, बिंदू, कला इत्यादी येऊ लागतात. तसेच या शक्तीच्या आपल्यामध्ये होणाऱ्या उदयामुळे, आपल्यामध्ये प्रेम, करुणा, नम्रता, वैराग्य, आश्चर्य, भीति आणि अत्यानंद इत्यादी भावना जागृत होतात. करूणा व वैराग्य हे दोन भाव निर्माण होऊन, तेच फक्त स्थिरावतात व वाढतात. म्हणून आत्मानुभवांच्या वाढीतूनच खरी ममता (करुणा) व खरे वैराग्य हे निर्माण होते. खरी निर्भयता त्यातूनच निर्माण होते. स्वप्रयत्नाने हे पूर्ण साध्य होणार नाही. तरीसुध्दा आत्मानुभव वाढण्यास हे सद्गुण-संपादन आवश्यक असल्याने, प्रयत्न करण्यास हरकत नाही. परंतु, त्या गुणांचे पूर्णत्वाकडे जाण्यासाठी नामस्मरण आवश्यक आहे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ८५. दुःखहारक स्पर्श

१९१८-१९ मध्ये गुरुदेव रानडे, प्रो. दामले यांच्याकडे पुण्याला शनिवार पेठेत रहात असत. प्रो. दामले यांच्या पत्नीचे डोळे आले होते. उपचार चालू होते, पण एक दिवस दुःख सहनशक्तीच्या पलीकडे गेले. काय करावे, कोणालाच कळेना. प्रो. दामलेंचे कनिष्ठ बंधू श्री. दिगंबर गुरुदेवांकडे आले आणि म्हणाले की, प्रो. दामलेंचे व त्यांचे वडील श्री. गणेशपंत (श्री गुरुदेवांच्या बहिणीचे यजमान) यांना असा दृष्टान्त झाला की, दत्तात्रयांनी सांगितले की, श्री गुरुदेवांकडून तीर्थ घे आणि डोळे आलेल्या भागास लाव. (श्री. गणेशपंत हे दत्ताचे उपासक होते.) श्री गुरुदेवांनी विचारले, "तुमचा यावर विश्वास आहे ना ?" होय, असे उत्तर येताच श्री गुरुदेवांनी श्री भाऊसाहेब महाराजांच्या फोटोपुढे थोडे पाणी ठेवण्यास सांगितले, आरती केली आणि तेच तीर्थ डोळ्यांना लावण्यासाठी दिले. प्रो. दामलेंच्या पत्नीच्या डोळ्यांना ते तीर्थ लावताच बरे वाटले. नंतर मी प्रो. दामले यांना विचारून खात्री करून घेतली. श्री गुरुदेवांनी सांगितले की, त्यानंतर प्रो. दामलेंचा श्री गुरुदेवांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ८६. दैवी शक्तीमध्ये संतांचा सहभाग

एका साधकाने विचारले, "जो आत्मसाक्षात्कारी संत आहे, त्याच्यामध्ये अमर्याद (आध्यात्मिक) शक्ती असते, हे खरे का ?" श्री गुरुदेवांनी एकदम जोरात उत्तर दिले, "होय, अर्थातच ! हे खरे असलेच पाहिजे ! ईश्वर हा अनंत, अमर्याद शक्तीचा अखंड स्रोत आहे. त्यामुळे अर्थातच त्या अमर्याद शक्तीच्या झऱ्यामध्ये जो सतत नहात असतो, त्याची शक्ती अमर्यादच असेल. श्री समर्थ रामदास म्हणतात त्याप्रमाणे - पापाची खंडणा झाली, जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका झाली, आपण कोण, ईश्वर कोण, हे कळले म्हणजे, आत्मसाक्षात्कार पूर्णतेला गेला असे समजावे. अशी परिस्थिती असल्याने असा संत मोठ्या विश्वासाने सांगू शकतो की, 'मी देवाचे लेकरू आहे; जगात असे काय आहे की जे मला मिळू शकत नाही ?' जर संत असे आत्मविश्वासपूर्वक म्हणू शकत नसेल तर, त्याला आत्मसाक्षात्कार झालाच नाही असे समजावे. संत नेहमी निर्भय असतात व त्यांना अनुभवाने अशी खात्री असते की, आपली 'वस्तू' आपले निश्चित संरक्षण करेल. उपनिषदे सांगतात - आनंद ब्रह्मणो विद्वान न बिभेति कदाचन । (तैत्तरिय उप. II/४.१) पण याचा अर्थ असा नव्हे की, संत दोन अधिक दोन पाच करू शकेल. देवाच्या राज्यात देव स्वतः आपले नियम पाळतो. तो सर्व शक्तिमान असूनही, स्वतःचेच नियम स्वतः मोडत नाही. निरनिराळी कर्मे करवून घेण्यासाठी, तो निरनिराळे देह निर्माण करतो. म्हणून संत स्वतः आत्मसाक्षात्कार करून घेतल्यानंतर, ईश्वराने नेमून दिलेली कार्य करतात - ते ईश्वराचेच कार्य करतात - दुसरे काही नाही.

✵✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ८७. गृहीतक म्हणून ठेवलेली श्रद्धाही पुरे आहे !

प्रो. ए, मुद्दाम काही विषय चर्चिण्यासाठी श्री गुरुदेवांकडे आले होते. त्यांना काही शंकाही होत्या. त्यांची बरीच दीर्घ चर्चा झाली. सुरुवातीला प्रो. ए यांनी, 'विडा घ्या हो नारायणा' याबद्दल विचारले, "सर, मला या विड्याचे महत्त्व काही कळत नाही. माझा त्यावर विश्वास नाही. त्याचा आध्यात्मिक जीवनाशी काय संबंध ? शिवाय...." यापुढे त्यांनी काही बोलण्यापूर्वीच, त्यांना थांबवून श्री गुरुदेव म्हणाले, "बरं ! तुम्ही विश्वास ठेवू नका, मुळीच जरुरी नाही, तुम्हाला ही केवळ अंधश्रद्धा वाटली तरी चालेल. काही हरकत नाही ! पण लक्षात ठेवा, अशी श्रद्धा म्हणजे काही अंधारात घेतलेली उडी नव्हे ! तुम्हाला तुमच्या सद्‌गुरूंनी जी शक्ती प्रेषित केली आहे, तीच तुमच्या अमर्याद प्रगतीला पुरेशी आहे. दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या मदतीची त्याला गरज नाही. तुमची प्रगती केवळ गणिती

श्रेणीनेंच नव्हे, तर त्याही वरील श्रेणीने होईल.

आध्यात्मिक जीवनात प्रगती दोन प्रकारांची असते - १) मंद व २) जलद व अचानक. पहिलीला पिपीलिका मार्ग तर दुसरीला संचित-विहंगम मार्ग म्हणतात. एकदा नामाचे विमान आपल्या मालकीचे झाले की, आपण कितीही उंचीवर पोहोचवू शकतो. आपली साधना तीव्रतर करीत, नामस्मरणाचा जोर वाढवित, आपण अतिशय वेगाने प्रगती करू शकतो.

जे आपल्याला प्रत्यक्ष अनुभवाला येते, तेच फक्त सत्य मानावे. तुम्ही रामकृष्णादी अवतारात किंवा इतर कोठेही विश्वास ठेवण्याची आवश्यकता नाही. त्या अवतारांना तुम्ही केवळ पौराणिक - ऐतिहासिकसुद्धा नव्हे - कथा समजू शकता. प्रत्यक्ष तुकारामांनीसुद्धा त्यांना (अवतारांना) कमी मानले होते. 'राम हा कालचा, सुत दशरथाचा । अनंत युगाचा आत्माराम ।' आपण नियमित साधना करीत असावे, अनुभव घ्यावेत. ज्या देवाचा प्रत्यक्ष अनुभव येईल, तोच खरा देव मानावा. आपल्यामध्येच आपण आत्मज्योत प्रदीप्त करावी. मग आपोआपच 'त्याचा' आत्मप्रकाश सर्वत्र पसरू लागेल. फूल उमलल्यानंतर त्याचा सुगंध पसरण्यास वेळ लागत नाही. देव म्हणजे आनंदरूपच आहे. त्या आनंदाचा अनुभव म्हणजेच अध्यात्म जीवनाची सुरुवात होय !

## ८८. देवाच्या कृपेने भारत वाचला

दुसऱ्या दिवशी प्रो. ए यांच्या, 'भारताची त्या काळची (१९४४) राजकीय परिस्थिती' या संबंधात संभाषणाने चर्चा सुरू झाली. श्री गुरुदेव म्हणाले, "युद्धाची भीषणता आता इतकी तीव्र झाली आहे की, अशावेळी स्वातंत्र्याबद्दल बोलणे नकोच. जरी काही मार्गांने स्वातंत्र्य मिळाले तरी, आपल्या देशाभोवती ज्या राजकीय शक्ती दबा धरून बसल्या आहेत; त्या मिळालेले स्वातंत्र्य क्षणात हिरावून नेतील. आपले लोक एखाद्या ठिकाणी बाँब पडताच सैरावैरा धावत सुटतील. त्यांना स्वतःचे संरक्षण कसे करावे हे कळत नाही. जगातील कोणताच देश भारतासारखा निराधार नाही. डोळ्याचे पाते लवते न लवते तोच जपानने भारतात गहजब केला असता. परंतु देवाच्या कृपेनेच भारत वाचला. कारण; 'डू लिट्ल' चीनमधून टोकियोला गेले व तेथे बाँब टाकला. अशा रीतीने, 'डू लिट्ल'चे 'डू ग्रेट' झाले. खरोखर देवाची इच्छा कळणे फार कठीण ! आपल्याला ती गोष्ट माहीतच आहे - पारधी व ससाणा. त्यात देवाने सापास पारध्यास चावायला लावले, त्यामुळे त्याचा नेम चुकला व तो बाण ससाण्यास लागला. अशा रीतीने पारधी व ससाणा, दोघेही मेले व पक्षी वाचला. जर, 'डू लिट्ल'ने टोकियोवर बाँब टाकला नसता तर जपानच्या बाँब वर्षावाने भारताची राखरांगोळी सहज करता आली असती. जर तुमची पात्रता असेल तरच स्वातंत्र्याला अर्थ आहे. इतिहासाचे दाखले काय सांगतात ? आपण आपापसातील भांडणानेच मेलो. खरे तर आध्यात्मिक पार्श्वभूमीवर ऐहिक सुखाचा पाया रचला पाहिजे. हे मी केवळ तर्कशुद्ध ऐतिहासिक तत्त्वांनी सांगत आहे. इतिहासाचे तर्कशास्त्र स्वातंत्र्य प्राप्तीसाठी पुढील घटकांची आवश्यकता दर्शविते - १) हिंदू व मुसलमान यातील दंगे संपलेच पाहिजेत, २) अमेरिका व जपान यापेक्षा आपल्या देशाने शास्त्रीय ज्ञानात प्रगती साधली पाहिजे; हे काम श्रमाचे आहे, ३) आपली आध्यात्मिक पातळी इतकी उंचावली पाहिजे की, आपल्याला अखिल मानवजात एकच दिसली पाहिजे. शेवटचे सर्वांत महत्त्वाचे आहे, तितकेच ते कठीण आहे. कारण भविष्यकाळात जगात शांती नांदण्यास भारतच अग्रेसर राहणार आहे.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## ८९. देहासाठी शेती आणि आत्म्यासाठी संस्कृती

एस. एन. देशपांडे,
चंदूर

१९३४ मध्ये माझ्यावर, श्री गुरुदेवांनी जवळून मुलाखत घेऊन कृपा केली, तेव्हा माझे जीवन कृतकृत्य झाले. श्री गुरुदेवांच्या निंबाळच्या (ध्यानाच्या) खोलीत शिरण्यापूर्वीच जणू काही आकाशातून विजेचा प्रकाशमान झोत यावा, त्याप्रमाणे, "नारायण, नारायण, नारायण" नामाने मी अक्षरशः रोमांचित होऊन उठलो. माझ्यातला फक्त वीस वर्षांचा तरुण, श्री गुरुदेव नामक अज्ञात, अगाध व्यक्तिमत्व पाहण्यास अत्यंत आतुर झाला होता. मी मनाच्या गाभाऱ्यात श्री गुरुदेवांचे जे चित्र रेखाटले होते, ते स्वामी विवेकानंदांसारखे उंच, धिप्पाड बांध्याच्या आकृतीचे. पण प्रत्यक्षात पाहतो तर अत्यंत कृश, नम्र व्यक्तिमत्व - जणू काही हाडांभोवती तलम रेशमी वस्त्रच लपेटलेले असावे. त्यांच्या मृदू, दयाळू, प्रेमळ शब्दांनी मात्र क्षणार्धात मी, 'न भूतो न भविष्यति' असा न्हाऊन निघालो. माझ्यातील लेकराला जणू त्याची माताच भेटली. मी तेव्हा शेतकी कॉलेजात प्रवेश करणार होतो. सुरुवातीचे काही शब्द होतात न होतात तोच, मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण श्री गुरुदेवांनी आपण होऊन माझ्या शेतकी कॉलेजात प्रवेश घेण्याबद्दल विचारून अनुमतीही दिली. त्यांनी कार्लाईलच्या भाषेत, 'शेतकरी संत' होण्यास सांगितले. शरीराच्या पोषणाकरिता आपल्याला शेतीची आवश्यकता आहे; तर आत्म्याच्या विकासाकरिता संतत्वाचे बीजारोपण व दैवी गुणांची पेरणी करावी लागेल, असा उपदेश त्यांनी केला. त्यामुळे देहासाठी शेती आणि आत्म्यासाठी संस्कृती एकाच वेळी केली पाहिजे.

## ९०. तुम्ही देवाची आणि दानवाची एकदम सेवा करू शकत नाही

एकदा हुबळीचा एक तरुण श्री गुरुदेवांकडे नाम घेण्यासाठी आला. तो ब्रह्मचारी असून असहकाराच्या चळवळीत त्याने चार-पाच वर्षे भाग घेतला होता. त्याला तुरुंगवासाचाही थोडा अनुभव होता. त्याने हे सर्व श्री गुरुदेवांना सांगून नाम घेण्याची इच्छा प्रकट केली. त्याला नेम आणि राजकीय चळवळ एकाच वेळी करण्याचे मनात होते. त्या तरुणाशी इतर साधकांशी ओळख करून देताना श्री गुरुदेव म्हणाले, "हे सद्गृहस्थ राजकीय क्षेत्रातले आहेत. यांनी आपल्या गावात एक व्यायामशाळाही सुरू केली आहे. आता त्यांना आध्यात्मिक जीवनही जगण्याबद्दल इच्छा निर्माण झाली आहे. हे सगळेच

कसे साध्य होईल ? त्यांना एकाची निवड करावी लागेल." आपल्याला अशी निवड करता येणार नाही हे ओळखून, तो तरुण तसाच निघून गेला. तो गेल्यावर श्री गुरुदेव म्हणाले, "या तरुणाला राजकीय चळवळीत पुढे येण्यासाठी आध्यात्मिक शक्तीचा उपयोग करायचा होता. त्याच आकांक्षेने तो येथे आला होता. परंतु आध्यात्मिक जीवन हे इतर बाबींसाठी साधन बनूच शकत नाही, तर तेच अंतिम साध्य आहे. तरच आत्मसाक्षात्कार साध्य होईल, अन्यथा नाही. या तरुणाचा स्वभाव चांगला आहे, पण त्याला आध्यात्मिक जीवन सुरू करायला अजून थोडा अवधी आहे."

## ९१. देवाच्या भक्तीसाठी सर्व शक्ती एकत्रित करा

**डॉ. आर. एच. करमरकर,**
**मुंबई**

श्री गुरुदेवांना विज्ञानाच्या सर्व शाखांमध्येही कशी रुची व ज्ञान होते, हे मी एका घटनेवरून सांगतो. १९३८ मध्ये इंग्लंडहून परत येताच मी निंबाळला गेल्यावेळी श्री गुरुदेव बोलता बोलता, experimental neurology वर बोलू लागले. त्यांनी मला अनेक प्रश्न विचारले. मि. हेडस् यांच्या, Thalamus च्या संशोधनाबद्दल - ज्याने Thalamus हे भावनांचे केंद्र आहे, हे सिद्ध केले आहे, त्याबद्दल विचारले. हेडस्चे काही प्रयोग, Applied Physiology ला, एफ.आर.सी.एस. ला प्रथम वर्षाला असतात. त्याबद्दलही श्री गुरुदेवांनी विचारले व मला कळून चुकले की, श्री गुरुदेवांचे विज्ञानातील ज्ञानही हिमालयाएवढे आहे. इंडियन फिलॉसॉफिकल काँग्रेसच्या तेराव्या अधिवेशनाच्या उद्घाटनपर भाषणानंतर डिसेंबर १९३० मध्ये नागपूरला हा प्रसंग घडला. येथेच श्री गुरुदेवांनी, फिलॉसॉफी, बायॉलॉजी, न्यूरॉलॉजी वगैरे सर्वांतून अवगाहन केले व 'स्पिरीटॉन' हा नवीन शब्द शोधून काढला. (श्री ज्ञानेश्वरांच्या 'बिंदुले' साठी.) एवढेच नव्हे तर श्री गुरुदेवांनी डेक्कन कॉलेजातील आपली जागा देऊ केली व तेथे राहून मी संशोधन कार्य करावे व मेंदूतील व्हेंट्रीकल्स व आत्मानुभव यांचा काय संबंध आहे, तो शोधावा, असे सुचविले. अशा तऱ्हेचा हा प्रसंग मी यासाठी वर्णन करून सांगितला की, श्री गुरुदेवांचे विचार असे होते - ज्या ज्या मज काही होतील बा शक्ती । त्यांही हा श्रीपती अळंकारू ।।

# ९२. सद्‌गुणांवरील ध्यान

श्री गुरुदेव एकदा म्हणाले, "काही वेळा सद्‌गुणांसाठीसुद्धा ध्यान करतात. उदा. अभय, सत्वसंशुद्धी इत्यादीसाठी थिऑसॉफिस्टस्‌ ध्यान करतात. 'आजपासून मी निर्भय होणार, उदार होणार, सरळमार्गी होणार इत्यादी गोष्टींची स्वयंसूचना तो तो गुण विकसित होईपर्यंत स्वतःस देत राहतात. ॲरिस्टॉटलचे म्हणणे आहे - वारंवार केलेल्या कृतीतून शील संपादन होते. अध्यात्माच्या अंतिम ध्येयासाठी असे सद्‌गुण-वृद्धी चिंतन उपयुक्त आहे. यापेक्षा त्याला जास्त महत्त्व नाही.

आपण सर्व भूतमात्रात देव पाहिला पाहिजे. आपल्याला तो डोळे मिटून तसेच डोळे उघडून दिसला पाहिजे. त्याचे ज्ञान इंद्रियातीत आहे. आंधळ्याला तर जास्तच स्पष्ट 'वस्तू' दिसेल. कारण त्याच्या दर्शनात त्याला अन्य अडथळाच नाही.

परमेश्वर दर्शनाशिवाय मात्र सद्‌गुण संपादन खऱ्या अर्थाने होत नाही. उलट सद्‌गुण असतील तर परमेश्वर दर्शन सोपे होते. अशा रीतीने नीती व साक्षात्कार यांचा संबंध आहे. प्रत्यक्षात ते अनंतात मिळतात, जशा समांतर रेखा अनंतात मिळतात.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

# ९३. नामस्मरण, एकमेव मार्ग

एका सिटींगमध्ये एका साधकाने असा प्रश्न विचारला, "ध्यानयोग, ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तीयोग हे ईश्वरसाक्षात्काराचे चार स्वतंत्र मार्ग आहेत का ? असल्यास, साक्षात्कारासाठी ते साधकाला कसे उपयोगी पडतात ?" यावर श्री गुरुदेवांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले, "हे चार योग स्वतंत्र तर नाहीतच, पण पुढे जाऊन असे म्हणता येईल की, हे साक्षात्काराप्रत प्रत्यक्ष नेणारे मार्ग नाहीत. केवळ त्या मार्गाने गेल्यास साक्षात्काराच्या गाभाऱ्यातसुद्धा पोहोचता येणार नाही. फारतर आपण प्रवेशद्वारापर्यंत पोहोचू शकू. ईश्वरापर्यंत नेणारा केवळ एक आणि एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे नामस्मरणाचा मार्ग. फक्त या मार्गाने गेल्यासच साक्षात्काराच्या गाभाऱ्यात पोहोचून, साधक आत्मानंदाचा अत्युच्च स्वाद घेऊ शकेल. 'नान्यः पंथाः विद्यते अयनाय ।' जगातील सर्व संतांनी नामस्मरणाचाच मार्ग चोखाळला आणि साक्षात्काराचे अत्युच्च शिखर ते गाठू शकले. कर्मयोग आणि भक्तीयोग नामस्मरणाला पूरक आहेत. त्यांच्यामुळे चित्तशुद्धी होते, श्रद्धा दृढ होते, संशय दूर होतात व अशा रीतीने परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग सुकर होतो. एवढाच त्या मार्गाचा उपयोग. प्रत्येकाचा स्वभाव निराळा असल्याने, त्याला जो रुचेल त्या,

चार योगांपैकी एकाचा उपयोग करून, तो साधना सुरू करतो. परंतु, साधन मार्गात पुढे पुढे गेल्यावर साधकाला नामस्मरण हाच मुख्य मार्ग म्हणून निवडला पाहिजे. अन्यथा ईश्वरसाक्षात्कार शक्य नाही. नामस्मरण हाच एकमेव मार्ग आहे. श्री ज्ञानेश्वरांसारख्या संतांनीही हाच एकमेव मार्ग प्रतिपादिला आहे.

## ९४. नामाचे स्वरूप

"नामाचे आंतरिक ध्यान कसे करावे ?" असा प्रश्न डॉ. के यांनी एका संध्याकाळी विचारला असता श्री गुरुदेव म्हणाले, "नामासारखे साध्य नाही, असे काहीजणांचे मत आहे, तर काहीजण म्हणतात, नामासारखे साधन नाही. दोन्ही मते सारखीच बरोबर आहेत. नाम हे साध्यही आहे आणि साधनही आहे. नामामुळे रूप दिसते म्हणून येथे ते साधन आहे. परंतु जे (देवाच्या) रुपाची अपेक्षा न धरता केवळ नाम हेच अंतिम ध्येय मानून, नाम, नाम, नाम घेतात, त्यांना नाम हेच साध्य आहे. श्री. तात्यासाहेब रानडे यांना श्री महाराजांनी नाम दिले आणि १९०४ मध्ये दुपारी चार वाजता इंचगिरीच्या देवळाच्या शिखरावर त्यांना मोतियांची जाळी दिसली. त्यानंतर ते रूप दिसेल की नाही याचा विचार न करता, ते नाम घेत राहिले. त्यांना नाम हेच साध्य होय. नेम हा अत्यंत प्रामाणिकपणे केला पाहिजे व तो नियमित पाहिजे. नाम हे अंतिम सत्याचे साधन आहे. ओमित्येकाक्षरं ब्रह्म । (भ.गी. ८.१३) आपल्याला मंत्राचे महत्त्व कळले पाहिजे. नाम केवळ पुटपुटत राहून उपयोगी नाही. नाम, रूप आणि भाव यातील संबंध आपल्या लक्षात आला पाहिजे. रूप हे त्याचे (नामाचे) आध्यात्मिक अंग, भाव हे त्याचे मानसिक किंवा नैतिक अंग, नाम स्वतः हे गुप्त अंग आहे की ज्यात रूप व भाव दोन्ही समाविष्ट आहेत. बऱ्याच वेळेला आपल्याला रूप दिसताच नाम आठवते. शेवटी नाम व रूप एक होतात. 'नाम तेंचि रूप' हे कळणे फार अवघड आहे. अनंताचा शोध भक्तिभावाने केला पाहिजे.. पण असा आंतरिक भाव निर्माण होणे फार फार कठीण आहे. देवाबद्दल कळवळा निर्माण होणे फार अवघड आहे. तो केवळ संत संगतीतच निर्माण होऊ शकतो."

## ९५. आसनापेक्षा एकाग्रता अधिक महत्त्वाची

एक दिवस चर्चेचा विषय, 'नेम कसा करावा ?' हा होता. जमलेल्या साधक मंडळींना हे समजून घ्यायचे होते की, नेमासाठी महत्त्वाचे घटक कोणते ?सगळेच घटक

सारखेच महत्त्वाचे असतात का ? श्री गुरुदेवांनी यावर पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले - "दृष्टी नासाग्री (नाकाचे वरील किंवा खालील टोक) ठेवणे, श्वास व उच्छ्वास यावर लक्ष ठेवणे, श्वासाबरोबर मनात स्पष्टपणे नाम घेणे, या सर्व गोष्टी निश्चितच निःसंशय महत्त्वाच्या आहेत. या सर्व बाबी खरोखरच एकाग्रतेला उपयुक्त आहेत. परंतु, नाम जर साक्षात्कारी सद्‌गुरूकडून मिळाले नसेल तर साधकाला आत्मसाक्षात्कार कधीच होणार नाही. नामाचे सामर्थ्य, सद्‌गुरूंनी तीव्रतेने नामस्मरण करून जो आत्मसाक्षात्कार करून घेतलेला असतो, त्यावर अवलंबून असते. नाम हे ईश्वराची प्रत्यक्ष कृपा आणि सामर्थ्य यांचे वाहक असते. सद्‌गुरूकडून मिळालेले असे नाम जर आपण एकाग्रतेने, आपल्याला उपयुक्त अशा आसनात घेत राहिलो तर निश्चितच परमेश्वराचा साक्षात्कार झाल्यावाचून राहणार नाही." श्री गुरुदेव पुढे म्हणाले, "तुम्हाला माहीत नाही का की, श्री बाबा डोळे मिटून नेम करीत होते. मीही तसेच करतो. नासाग्र दृष्टी ठेवल्याने अंधारी येऊन डोळ्यापुढे वलये येऊ लागली, म्हणून मी डोळे मिटून नेम करू लागलो. पण हे सर्वांनाच सारखे लागू पडेल असे नाही."

## ९६. एकाग्रता कशी वाढवावी ?

एकाग्रता कशी वाढवावी, असा प्रश्न एका साधकाने विचारला असता श्री गुरुदेव उत्तरले, "पतंजलींनी योग या शब्दाची व्याख्या, 'चित्तवृत्तीनिरोध' अशी केली आहे. हे सत्य आहे की, प्राण (श्वास) याचे नियमन सरावाने केले म्हणजे, प्राणायामाने किंवा श्वास निरोधाने मन स्थिर होते. पण या पद्धतीने मनाची गुणवत्ता वाढत नाही. ही खरोखर तळापासून सुरुवात करण्याची प्रक्रिया आहे. त्राटक आदी बाह्य प्रक्रिया आहेत. परंतु, वरून सुरू होणारी एक प्रक्रिया आहे, ती जास्त महत्त्वाची आहे. भावात्मक एकाग्रता जास्त महत्त्वाची आहे. साधक नेमात असताना त्याचे अंतःकरण भावाने ओसंडून वाहू लागते. अशा वेळी त्याला देवाचे रूप दिसते. हठयोग इत्यादीसाठी आपले शरीर बळकट पाहिजे. पण भावपूर्ण नेमासाठी आणि एकाग्रतेसाठी सामान्य शरीर चालते. योग्य काळ व जागा यांचेही एकाग्रतेसाठी महत्त्व आहे. सर्वांत जास्त महत्त्व मनाच्या शुद्धीकरणाला आहे. तीव्र संवेगानाम् आसनः । (योगसूत्र १.२१). आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आपला देवाविषयी अंतःकरणातील कळवळा एखाद्या कारंज्याप्रमाणे जोराने उसळी मारून वर आला पाहिजे. अशी आत्यंतिक तीव्रता, आवेग पुढील बाबींनी साध्य होतो - १) सदसद्विवेक, २)सत्संग. संतांनी लिहून ठेवलेल्या पारमार्थिक साहित्याच्या वाचनाने सदसद्विवेक वाढेल पण त्याबरोबरच नेम वाढविला पाहिजे. नाहीतर त्या साहित्यातील मर्म

आपल्याला कळणार नाही. ज्यांना अनुभव आला असेल, त्यांनाच तो अनुभव कळो येईल. मा. कृष्णरावांनी, 'कृष्णा हाल का रे', हा अभंग परवा म्हटला. हा फक्त तीन ओळींचा अभंग, तीनशे विद्वानांनाही कळणार नाही. आत्मानुभवातील खरे सौंदर्य जाणून घ्यायला, ते संत साहित्य नीटपणे अभ्यासले पाहिजे. तो अनुभव सर्व संतांना सारखाच होता याची खात्री करून घेतली पाहिजे. सत्संग - सत्संगात विवेक वाढतो. त्यामुळे भाव वाढीस लागून नेमाला हुरूप येतो. जेव्हा नामाची तीव्र ओढ लागून साधक देवासाठी वाटेल त्या गोष्टीचा त्याग करण्यास सिद्ध होतो, तेव्हाच त्याला अध्यात्मशक्तीचे आकलन होते. श्री ज्ञानेश्वरांसारख्यांपासून आत्मशक्ती खाली उतरते. त्यांच्यामध्ये आत्मशक्तीचा साठा असतो, ती बाहेर झिरपू लागते. अशा संतांच्या सहवासात भाव वाढीस लागतो. त्यांच्याशी फक्त एका विचाराचे आदान-प्रदान केले तरी पुरे. त्यांची केवळ उपस्थितीही पुरे. त्यांची केवळ एक कूर्मदृष्टीही पुरे. तीच महामौल्यवान आहे. पण हे व्यवहार्य नाही. स्वप्रयत्नानेच सर्व साध्य होते.

✵✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ९७. आध्यात्मिक जीवनाविषयीचे प्रेम कसे वाढवावे ?

एकदा एका साधकाने श्री गुरुदेवांना विचारले, "आपण आध्यात्मिक जीवनाविषयीचे प्रेम कसे बरे वाढवावे ?" श्री गुरुदेव उत्तरले, "आध्यात्मिक जीवनाबद्दल प्रेमाची जागृती व वृद्धी यासाठी सत्संगाची आवश्यकता आहे. त्याच्यापेक्षा दुसरा मार्ग नाही. सत्संगानेच आपली पावले परमार्थ पथावर निश्चित दृढपणे पडू लागतील. त्याबरोबरच सत्श्रवणाची जरुरी आहे. पण असे श्रवण पूर्ण एकाग्रतेने घडले पाहिजे. आपले लक्ष पूर्णपणे श्रवणावर केंद्रित झालेले असावे. वाचनाच्यावेळी ध्यानाची पद्धत अवलंबली पाहिजे. थोडेसेच वाचन केले तरी चालेल. आपले प्रतिबिंब वाचनात पडावे. त्यातील कल्पना हृदयात ठसली पाहिजे. नुसतेच पानामागून पान उलटून वाचण्यात काही अर्थ नाही. वाचत असताना नामस्मरण करावे. त्याचा वाचनाच्या गाभ्यापर्यंत जाण्यास उपयोग होतो. या सर्व बाबींमुळे भक्तिभाव निर्माण होतो. या भक्तिभावानेच आपले परमार्थाविषयीचे प्रेम जागृत होऊन वाढीस लागते.

✵✵✵✵✵✵✵✵✵✵✵

## ९८. ध्यान (नेम) आणि शारीरिक वेदना

एक दिवस श्री गुरुदेव म्हणाले, "शारीरिक वेदना सुसह्य असतील तोपर्यंतच नेम

शक्य आहे. पण त्या सहनशक्तीच्या पलीकडे गेल्यास नेम शक्य नाही. म्हणून आपली प्रकृती चांगली आहे, तोवरच आपला नेम साधून घ्यावा. त्याचवेळी आपण देवाला प्रार्थना करावी की, देवा ! जेव्हा शारीरिक वेदना सहन करण्याच्या पलीकडे जातील, तेव्हा तुझ्या कृपेने, तुझ्या नामाचे स्मरण मनात जागृत ठेव. असह्य शारीरिक वेदना होत असताना दुसरा काही मार्गच नाही. श्री बाबांच्या अंतकाळाकडे पाहिले असता, असे दिसते की त्यांनी शारीरिक वेदनांवर विजय मिळवला होता.

## ९९. आध्यात्मिक जीवन म्हणजे सुखाची शय्या नव्हे

**जे. व्ही. परुळेकर,**
**बेळगाव**

१९५३ मधील ही घटना आहे. मी निंबाळला गेलो होतो. आमच्या खोलीत डॉ. पत्की, श्री. सोंडूर आणि भाऊ आरोसकर (बहुधा वेंगुर्ल्याहून प्रथमच आले होते) असे राहिलो होतो. संध्याकाळचे सातचे जेवण झाले. सर्वांना, 'नुच्चू' वाढण्यात आले. दुसरे काहीच नव्हते. श्री. आरोसकर, जे माझ्या बाजूला बसले होते, ते म्हणाले की, "भाकरी मिळणार आहे का ?" पण भाकरी नव्हती आणि नुच्चू दुसऱ्यांदा वाढले. श्री. आरोसकर आणि मी ते घेतले नाही. कारण ते आवडले नव्हते. आम्ही हात धुण्यास बाहेर आलो तेव्हा आरोसकर म्हणाले, "जर भात मिळणार नसेल तर मला इथे राहणे कठीण जाईल." मी त्यांना म्हटले, "मलाही नुच्चू आवडले नाही." दुसऱ्या दिवशी पहाटे मी आणि सोंडूर पहाटे साडेतीन वाजता नेमाला बसलो. पत्की मात्र सहा वाजेपर्यंत झोपून राहिले. जेव्हा आमचा नेम संपला, तेव्हा डॉ. पत्कींनी सांगितले की, डास व ढेकूण यामुळे नीट झोप झाली नाही. त्यांनी आम्हाला विचारले, "तुमचा कसा काय नेम झाला बुवा ?" मी म्हणालो, "आमचा नेम साडेतीन पासून चांगला झाला." "मग नशीबवान आहात बुवा !" असे ते म्हणाले.

त्या दिवशी दुपारी ध्यान मंदिरात 'सिटींग' झाले. श्री गुरुदेव स्वतः होते. प्रो. दामल्यांसह सुमारे पंचवीस साधक होते. दुपारचे दोन वाजले होते. श्री गुरुदेवांनी दोन जुन्या साधकांकडे बोट दाखवून म्हटले, "तुम्ही नेहमी महाराजांच्या बरोबर फिरत होता. आम्हाला महाराजांच्या काही आठवणी सांगा ना." श्री हणमंतराव कण्णूर यांनी पुढील गोष्ट सांगितली.

१९०४ साल होते. एक दिवस सकाळी श्री महाराज तांब्या घेऊन बहिर्दिशेस निघाले होते. नेहमीप्रमाणे ते मोकळ्या रानात निघाले. आम्ही दोघेही पाठीमागे होतो.

वाटेमध्ये निवडुंग पसरला होता. अचानक महाराज एका दगडावर नेमाला बसले आणि त्यांची समाधी लागली. तेवढ्यात एक विंचू महाराजांच्या अंगावर चढला. आमची छाती धडधडू लागली आणि आम्हाला घाम फुटला. महाराजांना विंचू चावला तर ? महाराजांना नेमातून तर उठवायचे नाही, असा त्यांचा दंडक होता. त्यामुळे विंचू हाकलावा तर महाराजांना नेमातून जाग येईल. काय करावे ? पण विंचूच तेवढ्यात दुसऱ्या बाजूने निघून गेला. महाराज नेमातून उठल्यावर त्यांना आम्ही विचारले, "अशा जागी का नेमाला बसलात ? महाराज म्हणाले, "मी तरी काय करू ? मला देवाने एकदम प्रेरणा दिली, त्यामुळे इथेच नेमाला बसावे लागले." आम्ही महाराजांना त्या विंचवाबद्दल आणि सर्व सांगितले. तेव्हा महाराज हसून म्हणाले, "मी नेमात असताना माझे शरीर का माझे राहिले होते ? ते तर देवाचे झाले होते. मग देवाला विंचू कसा चावेल?

ह्या क्षणी गुरुदेवांनी डॉ. पत्कींकडे पहात म्हटले, "बघा, बघा ! इथे काही लोक असे आहेत की डास आणि ढेकूण चावतात म्हणून नेम होत नाही म्हणतात. नेमाला उठून बसायचीही तसदी घेत नाहीत. अहो खऱ्या नेमात विंचूही चावत नाही, डासांचे काय घेऊन बसलात !" डॉ. पत्कींना कळून चुकले की हे सर्व त्यांच्यासाठी होते. त्यांना फार वाईट वाटले व त्यापुढे ते नेमाला नियमित व वेळेवर बसू लागले आणि त्यांची साधनेत खूप प्रगती झाली. यानंतर श्री गुरुदेवांनी पद म्हणण्यास सांगितलेल्या पदात सुदामा पोह्यांची पुरचुंडी कृष्णाकडे घेऊन जातो. श्रीकृष्ण ते पोहे मोठ्या प्रेमाने घेतो आणि सुदाम्याला खूप मानाने वागवतो. या मुद्दयावर श्री गुरुदेवांनी श्री. आरोसकरांकडे पाहून सांगितले, "तुम्हाला येथे येऊन जर परमार्थात प्रगती करून घ्यायची असेल तर तुम्हाला सुदाम्याचे पोहेच येथे मिळतील. नुच्चूच मिळेल. श्रीकृष्णाने जसे सुदाम्याचे पोहे मोठ्या चवीने खाल्ले, तसे तुम्ही नुच्चूच गोड मानून नेम केला पाहिजे. तुम्ही येथे नेमासाठी आला आहात, चविष्ट जेवणासाठी नाही." संध्याकाळी पाच वाजता सिटींग संपले आणि श्री गुरुदेव स्नानासाठी उठले.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋

## १००. मनःशांतीसाठी एका साधकाची प्रार्थना

(१८-१२-१९५१ रोजी सांगली येथे श्री. गंगाधरराव देशपांडे यांनी केलेले भाषण)

"जेव्हा मला काल रात्री गुरुदेव रानडे यांनी उद्या सकाळी छोटेसे भाषण करा असे सांगितले तेव्हा बराच गोंधळून गेलो. मी कशावर बोलावे हे काही मला सुचेचना. गेल्या पंचावन्न वर्षांच्या सार्वजनिक जीवनात मी अनेक व्याख्याने दिली आहेत. दोन-दोन तास प्रचंड सभा गाजवल्या आहेत. पण आज मला असे व्याख्यान

द्यावयाचे नाही. मला केवळ हृदय मोकळे करावयाचे आहे. अधिकार किंवा प्रेरणा असल्याशिवाय बोलणे मी पाप मानतो. पण आपल्या गुरूची आज्ञा मोडणे हे त्याहीपेक्षा मोठे पाप होईल. म्हणून मी छोटे पाप करावयाचे ठरविले व माझे अंतःकरण गुरुदेवांच्या आज्ञेनुसार मोकळे करावयाचे ठरविले."

"मी गेली पंचावन्न वर्षे राष्ट्रीय कार्यांत, देशसेवेत घालविली. प्रथम लो. टिळकांचा अनुयायी म्हणून व नंतर महात्माजींचा अनुयायी म्हणून कार्य केले. लो. टिळकांनंतर महात्माजी व टिळक यांच्या मतांमध्ये कोणते खरे व श्रेष्ठ याबद्दल वाद होते. पण मी इतरांसारखी त्यावर डोकेफोड केली नाही. मी असे मानले की महात्माजी फक्त लो. टिळकांच्या बॅनरखाली कार्य करीत आहेत व फक्त त्यांचे अनुयायित्व करावयाचे मी ठरविले."

"गेली पंचावन्न वर्षे मी प्रामाणिकपणे कार्य व सेवा केली आहे. मी पुष्कळ चांगली कार्ये केलीं आहेत. कदाचित काही वाईटही ! माझ्यात सद्गुण व दुर्गुण दोन्ही आहेत - इतरांत असतात तसे ! थोड्याफार अभिमानाने मी सांगेन की सद्गुणांचे पारडे माझ्यात जड होईल. असे सर्व असेल तरी गेली चार पाच वर्षे मला मनःशांतीची गरज भासू लागली आहे. आयुष्याच्या संध्याकाळी खरोखर कशाची तीव्र गरज असेल तर ती म्हणजे मनःशांती ! ह्या मनःशांतीच्या अभावी माझ्या जीवनात हल्ली पोकळी निर्माण झाली आहे. मला रात्री शांत झोप लागत नाही. मला असा प्रश्न पडला आहे की, राष्ट्राच्या कार्यात झोकून दिल्यावेळी लोकमान्यांना मनःशांती होती, महात्माजींना होती, मग मलाच ती का नसावी बरे? मी जेव्हा या प्रश्नावर विचार करू लागलो तेव्हा माझ्या असे ध्यानात आले की, लोकमान्यांना जी मनःशांती होती ती परमेश्वरावरील दृढ श्रद्धेमुळे. ते बरेचदा आपल्या व्याख्यानात, 'जर देवाची इच्छा असेल तर, जर देवाची कृपा होईल तर' असे शब्द उच्चारीत. कित्येकदा त्यांच्या व्याख्यानाचा शेवट, 'देवाने असे कार्य करण्यास तुम्हास प्रवृत्त करावे', अशा शब्दात होई. मला पूर्वी ही एक व्याख्यानाची पद्धत (style) वाटत असे. पण मी जेव्हा लोकमान्यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, 'असे पहा ! सर्व कर्मांचा कर्ता देवच आहे. त्याच्या इच्छेनेच सर्व घडते. आपण कितीही प्रयत्न केले तरी देवाच्या कृपेशिवाय काहीही घडणे शक्य नाही.'. त्यावेळी मला त्यांच्या शब्दांचे महत्त्व कळले नव्हते. महात्माजींची सुद्धा परमेश्वरावर अशीच श्रद्धा होती. अर्थात ते सत्य आणि अहिंसेला देव मानत. त्यांचीही परमेश्वराच्या

शक्तीवर श्रद्धा होती. मला असे वाटते, म्हणूनच मी महात्माजींचा अनुयायी झालो. कोणतेही नवीन कार्य सुरू करताना मी स्वतःला विचारीत असे - जर लोकमान्य असते तर त्यांनी काय केले असते? मला लोकमान्य व महात्माजी यांच्यात कधीच फरक वाटला नाही."

"लोकमान्यांची ईश्वरावर दृढ श्रद्धा होती. एकदा मी त्यांना विचारले, 'स्वातंत्र्य मिळाल्यावर तुम्ही काय कराल ?' त्यांनी उत्तर दिले, 'जर माझ्यात आयुष्यात स्वातंत्र्य मिळाले तर गंगेच्या काठी जाऊन मी माझ्या आजोबांप्रमाणे संन्यास घेऊन परमेश्वराचे ध्यान करण्यात शेष जीवन व्यतीत करेन. पण दुर्दैवाने ते स्वराज्य मिळण्यापूर्वीच गेले. माझे पुष्कळ सहकारीसुद्धा तसेच गेले. पण मी भाग्यवान आहे की, माझ्या आयुष्यातच स्वराज्यात मी श्वास घेत आहे. माझी सांपत्तिक स्थितीही वाईट नाही. मी पुष्कळ कीर्ती मिळवली, समाजात स्थान मिळवले आणि वृत्तपत्रातून मी रोज लिहू शकेन. परंतु, मला वाईट वाटते की, मला मनःशांती नाही आणि याबद्दल मला आश्चर्यही वाटते. म्हणून मी शांती व समाधानाच्या शोधात आहे. मी जेव्हा माझे गुणदोष छाननीसाठी घेतो, तेव्हा माझे दोष हे गुणांपेक्षा जास्त आहेत. मी हे केवळ नम्रता म्हणून सांगत नाही, तर मला माझ्या मनावरचे ओझे आज दूर करावयाचे आहे. माझी मनःशांती त्यामुळेच ढळली आहे."

"सुदैवाने दोन तीन आठवड्यांपूर्वी, बेळगावला गुरुदेव रानडे मला भेटायला आले. यापूर्वी आमचा परिचय नव्हता. मला त्यांच्या विद्वत्ता, शुद्ध आचरण, साक्षात्कार इत्यादी बद्दल ऐकून माहीत होते, पण प्रत्यक्ष परिचय नव्हता. ते जेव्हा बेळगावला येणार असे मला कळले तेव्हा त्यांनी थोडावेळ माझ्यासाठी काढावा, अशी विनंती करणारे पत्र मी त्यांना लिहिले आणि त्याला त्यांचे होकारात्मक उत्तरही आले. त्यांनी असे सांगितले की, ते सांगलीला जाणार आहेत, तेव्हा मी त्यांना पुन्हा मिरजेला भेटेन. त्याप्रमाणे मिरजेच्या राजेसाहेबांना पत्र लिहून त्यांची तारीख घेतली. त्याप्रमाणे मी मिरजेला गेलो. तेथे मी त्यांची पारमार्थिक व्याख्याने ऐकली. या सर्व घटना गेल्या तीन आठवड्यात घडल्या आहेत आणि त्यामुळे मला हळुहळू मनःशाती प्राप्त होत आहे. मी आता हळुहळू शांतीपथावर येत आहे. महात्माजी म्हणत, 'मी देव पाहिला नाही, पण मी त्याला पाहण्याचा मार्ग पाहू शकलो आहे.' तोच समाधानाचा मार्ग आता मला मिळाला आहे."

"आज जेव्हा मी तरुण पिढीची स्थिती पाहतो, तेव्हा मला अतिशय वाईट वाटते. मी या तरुण पिढीत पुष्कळवेळा समरस झालो आहे. प्रथम मी त्यांना, बॉंब, पिस्तूल तयार करा, असे आवाहन केले. नंतर मी त्यांना सत्याग्रहात भाग घेण्याचा सल्ला दिला. पण हल्ली या तरुण पिढीची उच्च ध्येयावरील श्रद्धा कमी झालेली दिसते. खरेतर या तरुणांपुढे काही ध्येयच नाही. अगदी मी बी. ए., एम. ए. च्या हुशार विद्यार्थ्यांना विचारले की, तुमच्या आयुष्याचे ध्येय कोणते ? तर त्यांना सांगता येत नाही. असे का घडले ? त्यांच्या क्षितीजावरील ध्येयसूर्य अस्तास जाऊन अंधार का झाला ? यावद्दल पंडितजी म्हणाले, 'मला हिंदू संस्कृती म्हणजे काय, तेच कळत नाही.' मला फार दुःख झाले. लोकमान्य, महात्माजी अशा थोर पुढाऱ्यांनी हिंदू संस्कृतीबद्दल थोर भावना बाळगल्या. जर हिंदू संस्कृती म्हणजे काय, असे जर विचारायला लागले तर, आपल्या राष्ट्राचे काय होणार ? मी असे मानत नाही की, इतर धर्म, संस्कृती यांना काहीच महत्त्व नाही. त्यांचे श्रेष्ठत्वही मी मानतो. पण आजच्या पिढीपुढे कोणतेही ध्येयच नसेल तर राष्ट्र पुढे कसे येणार ? आपण सर्वजण ज्ञानाने, अनुभवाने सुज्ञ आहात. आपणास मी सांगावे असे नाही. पण आजच्या तरुण पिढीला मी ठासून आज्ञा करीन, 'मित्रहो, ध्येयहीन आयुष्य जगू नका.' जर आज तुम्हाला त्याचे महत्त्व कळले नाही तर तुमच्या आयुष्याच्या संध्याकाळी तुम्हीही माझ्यासारखे अस्वस्थ व्हाल. त्यावेळी तुम्हाला शांतीचा मार्ग कोण दाखविल ? मला सुदैवाने आयुष्यात, शेवटच्या दिवसात तरी हा मार्ग सापडला. तुमची अवस्था काय होईल ? म्हणून माझे म्हणणे एवढेच आहे की, उच्च ध्येयाची आतापासूनच जोपासना करा व तुमचे जीवन उजळा, प्रकाशमान करा."

## १०१. श्री गुरुदेवांचे आश्वासन

इतक्या सुंदर व्याख्यानानंतर खरे तर मी बोलू नयेच. श्री. गंगाधरराव देशपांडे माझ्यापेक्षा जवळ जवळ सोळा वर्षांनी ज्येष्ठ आहेत. त्यांच्या व्याख्यानानंतर मी बोलणे उचित नाही. तरीही मी माझ्या भावना व्यक्त करतो. मी तरुण असताना मुंबईला नेने चाळीत, श्री. लक्ष्मणराव छत्रे नावाचे माझे एक परिचित राहात. तेथे श्री. गंगाधरराव व लोकमान्य येत असत. तेव्हापासून माझ्या मनात गंगाधररावांबद्दल उच्च आदर वसत आहे. नंतर ते राजकारणात शिरले आणि मी तत्त्वज्ञानात. त्यामुळे आमचे संबंध राहिले नाहीत.

खरोखर ईश्वर साक्षात्कार काही केवळ दीर्घ साधनेवर अवलंबून नसतो. पंचवीस कोटी जप केल्यानेही देव दिसेल याची खात्री नाही. ईश्वर साक्षात्कारासाठी अंतःकरणाचा मृदूपणा आणि देवाबद्दलची तीव्र ओढ असल्यावर देव दूर नाही. या वयामध्ये गंगाधररावांची देवाविषयी तीव्र ओढ वाखाणण्यासारखी आहे. म्हातारपणात सहसा अंतःकरणाचा मृदूपणा नसतो. तो असला म्हणजे देव दूर नाही.

श्री. गंगाधररावांनी पंडितजींच्या उद्‌गारांबद्दल सांगितले. 'निधर्मी' हा शब्द द्वयर्थी आहे. याचा अर्थ, अधार्मिक किंवा धर्मातीत असा होऊ शकतो. पंडितजींनी तो अधार्मिक या अर्थीच वापरला. पण अलीकडे माता आनंदमयी आणि न्या. एस. के. दार यांच्याशी संबंध आल्यामुळे त्यांचे विचार बदलले आहेत. खरे तर निधर्मी या शब्दाचा अर्थ, धर्मातीत असाच घेतला पाहिजे. विश्वधर्म ही कल्पना सर्व धर्म व जाती यांच्या पलीकडे जाऊन अंमलात आली पाहिजे. १९३६ मध्ये श्री. र. पु. परांजपे यांनी नागपूरला, लिबरेशन फेडरेशनच्या अध्यक्ष पदावरून बोलताना सांगितले होते की, सर्व धर्मांवर बंदी घाला. मी त्यावेळी उत्तरादाखल सांगितले होते की, धर्म व जाती यातील मतमतांतरातून वैमनस्य टाळण्याचे दोन मार्ग आहेत - १) सर्व धर्मांवर बंदी घाला, २) विश्वधर्माची स्थापना करा. विश्वधर्मामुळेच विश्वामध्ये शांतीची स्थापना होऊ शकेल, असा माझा दृढ विश्वास आहे.

आजच्या तरुण पिढीला नुकताच श्री. गंगाधररावांनी जो अंतःकरणापासून संदेश दिला आहे, तो ऐकून मला आनंद झाला. भगवद्‌गीतेतही असाच संदेश आहे - कौमार्यादाचरेत्प्राज्ञा । धर्मान्भागवतान् ही तान । पण हा संदेश कितपत परिणामकारक होईल हे सांगता येत नाही. ऐहिक जीवनाविषयी विरक्ती आणि पारमार्थिक जीवनाविषयी आसक्ती निर्माण झाल्याशिवाय अशा उपदेशाला फळे येणार नाहीत. विरक्ती हृदयात उदय पावल्याबरोबर आपण सर्व सोडून पारमार्थिक जीवनाकडे वळले पाहिजे, असे उपनिषद सांगते - यदहरेव विरजेत् तदहरवेव प्रव्रजेत । (जाबालोपनिषद - ४)

प्रत्येकाने पारमार्थिक साधना सुरू केली पाहिजे. जरी उतारवयात विरक्ती उत्पन्न झाली तरी हरकत नाही. जर आपली साधना अंतःकरणापासून असेल तर देव आपल्यावर निदान उतारवयात कृपा केल्याशिवाय राहणार नाही. जर गंगाधररावांनी ज्या उत्साहात राष्ट्रसेवा केली, त्याच उत्साहाने आणि उमेदीने एक दोन वर्षे जरी नामस्मरण केले तरी, परमेश्वर त्यांच्यावर कृपा केल्याशिवाय राहणार नाही.

# परिशिष्ट

## दोन घटनांवरील टिपणे

(१) श्री. अल्लाप्पा शिखरेप्पा धडूती हा चिम्मडचा श्री भाऊसाहेब महाराजांचा एक शिष्य होता. त्याला मूलबाळ नव्हते. एकदा श्री महाराज चिम्मडला आल्यावेळी, अल्लाप्पाची आई महाराजांकडे नम्रपणे सांगू लागली, "घरात मूलबाळ नाही. कृपा करून घरात संतान होईल, असा आशीर्वाद द्या." "तसे होईल जा. काळजी करू नको." महाराज म्हणाले. घरी गेल्यावर तिच्या मनात एक विचार आला, आपण महाराजांना मूल होण्यासाठी आशीर्वाद मागितला आणि त्यांनी तो दिला, पण मला जर मूल झाले आणि सुनेला झाले नाही तर काय ? "मला मूल नको आहे, सुनेला पाहिजे, असा आशीर्वाद पाहिजे." महाराज म्हणाले, "तुम्हा दोघींना एकेक होईल, जा." "नको, नको महाराज, मला नको. तिलाच होऊ दे." "ठीक आहे. तसेच होईल." महाराज म्हणाले. मग त्यांनी अल्लाप्पांना एक युक्ती सांगितली. त्याला खडीसाखर, बदाम, पांढरी साखर इ. सर्व घालून मुगाचे लाडू करण्यास सांगितले होते. त्याला पोळी, भाकरी, तूप, साखर पाहिजे तेवढे खाण्यास सांगितले होते. खीर खाण्यासही सांगितले होते. त्या जोडप्याला एकवीस दिवस एकत्र राहण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे सर्व अल्लाप्पाने केले. त्याच्या बायकोला दिवस गेले. श्रावणामध्ये अल्लाप्पा सप्ताहासाठी इंचगिरीस निघाला. त्याची आई म्हणाली, "तुझी बायको बाळंतीण होणार आहे. तू इंचगिरीस जातोसच आहेस, तर महाराजांना विचार की, मुलाचे नाव काय ठेवावे ?" इंचगिरीस गेल्यावर अल्लाप्पाने आईचा निरोप महाराजांना सांगितल्यावर महाराज म्हणाले, "हुशार आहेस हं ! मुलगा की मुलगी हे आताच समजायला पाहिजे होय ? ठीक आहे, उद्या नेम झाल्यावर सांगतो. तेव्हा खोलीबाहेर थांब म्हणजे कळेल." दुसऱ्या दिवशी अल्लाप्पा अंघोळ करून महाराजांची वाट पहात खोलीबाहेर थांबला. महाराजांचा नेम झाला. ते बाहेर आले. अल्लाप्पाने महाराजांच्या पायावर डोके ठेवले. "गुरुसिद्धा असे नाव ठेव," महाराज म्हणाले. म्हणजे मुलगाच होणार हे कळून चुकले.

❋❋❋❋❋❋❋❋❋❋❋

(२) महाराज जेव्हा जेव्हा जमखंडीला जात, तेव्हा बहुधा पाच दिवसांचा सप्ताह होई. गुरुद्वादशीला सुरू होऊन पाडव्याला समाप्ती होई. या सप्ताहामध्ये पाच दिवसात

संपूर्ण दासबोध वाचण्याची पद्धत होती. दोन दोन तास एक साधक याप्रमाणे दिवसभर दासबोध वाचत व बाकीचे नेम करत. रात्री मात्र एकच साधक वाचन करी व दुसरा त्याच्याबरोबर नेम करीत बसे. एकदा श्री. महादेवभटजी व लक्ष्मणभटजी यांना रात्री दासबोध वाचन करण्यास सांगितले होते. पहाटे दोन किंवा तीन वाजता महाराज बाहेर गेले. महादेव भटजींनी वाचन थांबवले आणि ते लक्ष्मणभटजींना म्हणाले, "लखू, महाराज कोठे जातात ते तुला माहीत आहे का ? ये मी तुला दाखवतो." महाराज गावाबाहेर जाताना हे दोघेही हळूच त्यांच्या मागोमाग गेले. महाराज एका निवडुंगाच्या जाळीत अगदी छोट्याश्या जागेत नेमाला बसले. अशा जागी, अशा वेळी नेमाला बसणे म्हणजे काही चेष्टा नव्हती. दोघेही परत फिरले आणि दासबोध वाचत बसले. दुसऱ्या दिवशी त्यांनी महाराजांना विचारले, "महाराज, एवढ्या मध्यरात्री, दाट काळोख असताना, जेथे साप, विंचू असतात, अशा निवडुंगाच्या जाळीत तुम्ही कसे काय नेमाला बसता ? बाहेर तर दाट काळोख असतो, तुम्ही दिवाही घेत नाही." "अरे, तो माझ्यासमोर चालत असतो ना - 'वो एक सिपाही'" महाराज म्हणाले. नंतर त्या दोघांनी विचारले, "लांडगे कोल्हे जर त्या ठिकाणी आले तर ?" महाराजांनी उत्तर दिले, "तेही येतात, माझ्याकडे बघत बसतात आणि थोड्यावेळाने निघून जातात."

************